Most courses are the missing link between industries and academia, so students must take up those that will enhance their capability. They have a global certification and can come in handy during hiring. While 80% of the students enrolled are from IT or engineering, the university officials hope students from traditional fields will also participate.

Students can register on the official website of SPPU, and click on DegreePlus or log on to http://degreeplus.in. They can view the list of courses and training providers, complete an application form and submit it.

Once their eligibility is verified, a confirmation email along with a payment link of Rs 300 will be received on the registered email id. The student has to pay the fee and then access the free learning resources.

A student needs to pay by accessing the training provider portal through the DegreePlus login to access the paid courses

## LEARNING AT A DISCOUNT

- AWS Academy provides six free ready-to-teach cloud computing courses
- Simplilearn has 72 courses with about a 60% discount, while Harvard Business School online is providing 16 courses at a special fee
- Celebrity School will provide 11 courses with up to 75% discount
- University of Chicago's Harris School of Public Policy is offering a degree with an $800 scholarship
- Monjin and DeakinCo are also offering courses at 70% and 80% discounted fees

EDX is providing 100 courses without any fees



The Times of India 1.10.2022

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# Now, enrol for online courses through SPPU's 'Degree Plus' programme

**HT Correspondent**

puneletters@htlive.com

**PUNE:** Students can now enrol for the 'Degree Plus' programme started by Savitribai Phule Pune University (SPPU) along with regular BA, B.Com and B.Sc programmes. Launched on a pilot basis last year, the initiative has now made 300 to 350 world-class courses available to students at less than the original fee.

As per the information given by SPPU, the 'Degree Plus' initiative was started in November 2021 under the leadership of the then vice-chancellor Prof Nitin Karamalkar. These courses have been made available in the university by signing agreements with various world-class educational and social organisations. These include Harvard Business Online, AWS, Simply Learn, and Celebrity School courses of many renowned companies like IBM, and Stanford University included through the agreement with EDX. All these courses are online and some of these courses are free of cost. The course schedule for the year 2022-23 has also been released on the website. Whereas all the certificates will also be given to the students on completion of the course.

Initially started on a pilot basis, nearly 26,000 students had enrolled for it and 5,000 students had taken admissions.

"Through 'Degree Plus', students of the university will be able to get updated knowledge in information technology, artificial intelligence, cloud computing, economics, culture etc. The maximum number of students should avail this opportunity," said SPPU vice-chancellor Prof Karbhari Kale.

Prof Sanjeev Sonawane, pro-vice-chancellor of SPPU, said, "Our university is probably the only public university in the state to provide world-class courses through 'Degree Plus.' Students should take advantage of this opportunity and colleges should also inform students about this."

**COURSE DETAILS**

- **Where to apply for the course?**
  http://degreeplus.in
- **Who can opt for the courses?**
  All students pursuing degrees from Savitribai Phule Pune University and its affiliated colleges.
- **What is the admission period for the course?**
  These courses are conducted throughout the year. The schedule is announced on the website.

Hindustan Times 1.10.2022

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# अकरावी प्रवेशांसाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

## दैनंदिन गुणवत्ता फेरीला अपेक्षित प्रतिसाद नाही

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील सातवी फेरी अर्थात दैनंदिन गुणवत्ता फेरीला विद्यार्थ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे दैनंदिन गुणवत्ता फेरीअंतर्गत प्रवेशांसाठी मुदतवाढ देण्यात आली असून, आता विद्यार्थ्यांना १५ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश घेता येईल.

राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील अकरावीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत आहेत.

प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत तीन नियमित, तीन विशेष प्रवेश फेऱ्या राबवण्यात आल्या. मात्र काही विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत




असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी दैनंदिन गुणवत्ता फेरी अर्थात सतत विशेष फेरी सुरू करण्यात आली आहे. या फेरीअंतर्गत प्रवेशासाठी २० सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र विद्यार्थ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने आता १५ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश फेरी सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांना संध्याकाळी सात ते सकाळी नऊ दरम्यान अर्ज करता येईल. तर सकाळी १० ते संध्याकाळी पाच दरम्यान प्रवेश घेता येईल. प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांचा पुढील दिवसाच्या फेरीसाठी आपोआप विचार केला जाईल. प्रवेशासाठी निवड होऊनही प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयासाठी पूर्ण फेरीदरम्यान प्रतिबंधित केले जाईल. प्रवेश नाकारलेल्या विद्यार्थ्यांनाही त्या महाविद्यालयासाठी प्रतिबंधित केले जाईल. यापुढे प्रवेश रद्द करण्याची परवानगी असणार नाही. नवीन विद्यार्थी नोंदणी, नवीन अर्ज भाग एक भरणे आणि त्यामध्ये बदल करण्यासाठी अर्ज अनलॉक करण्याची प्रक्रिया ४ ऑक्टोबरपासून बंद होईल. अर्ज पडताळणी फक्त शिक्षण उपसंचालक लॉग इनवरूनच केली जाऊ शकेल. ४ ऑक्टोबरपासून मार्गदर्शन केंद्र लॉग इन बंद होतील. कोणताही नवीन अर्ज आपोआप प्रमाणित होणार नाही. प्रत्येक नवीन नोंदणी शिक्षण उपसंचालकांनी तपासणी केल्यानंतरच पूर्ण होईल. ही फेरी दिनांक १५ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहील. कोटा आणि द्विलक्ष्यी प्रवेश प्रक्रिया नेहमीप्रमाणे सुरू असतील. दुबार प्रवेश घेतल्याचे किंवा जाणीवपूर्वक जागा अडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत कडक कारवाई केली जाईल, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले.

लोकसत्ता Tue, 04 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70397318

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# विद्यापीठात आता एनसीसीची तुकडी

## शंभर विद्यार्थ्यांना संधी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांतील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासह राष्ट्रीय छात्र सेनेचे (एनसीसी) प्रशिक्षण घेता येणार आहे. विद्यापीठाला शंभर विद्यार्थ्यांच्या एनसीसी तुकडीला मान्यता मिळाली असून, या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांना चार क्रेडिट श्रेयांक मिळतील.

विद्यापीठाला स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावर तुकडीला मान्यता देण्यात आली. पुढील तीन वर्षे साधारण ३५ विद्यार्थ्यांना एनसीसीला प्रवेश घेता येणार आहे. यामध्ये ३३ टक्के मुलींचा समावेश असेल. महाराष्ट्र एनसीसीचे संचालनालयांतर्गत सहा गटांतील एक मुख्यालय पुण्यात आहे. त्यामुळे या युनिटअंतर्गत विद्यापीठातील तुकडीला मान्यता देण्यात आली.

या तुकडीचा सर्व खर्च विद्यापीठालाच करावा लागणार आहे. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी विद्यापीठाकडून एनसीसी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार आहे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना ब आणि क प्रमाणपत्र दिले जाते, राष्ट्रीय निवासी शिबिरासाठीही निवड होते.

राष्ट्रीय छात्र सेना म्हणजे काय, शस्त्र प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, आपत्ती व्यवस्थापन, जीवनावश्यक कौशल्ये, वेळेचे व्यवस्थापन, नेतृत्वगुण विकास, सामाजिक जागरूकता आणि सामुदायिक विकास, पर्यावरणीय जागरूकता, साहसी कृत्ये आदी १२ विषयांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना तीन वर्षात दिले जाणार असल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली.

> **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संकुलात एनसीसीचे प्रशिक्षण केंद्र नसल्याची खंत होती. त्यामुळे प्र-कुलगुरू म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर एनसीसीचे केंद्र सुरू होण्यासाठी प्रयत्न केले. या केंद्राला मान्यता मिळाल्याने आता विद्यापीठात केंद्र सुरू होईल. या केंद्राद्वारे पदवीस्तरावरील विद्यार्थ्यांना एनसीसीचे प्रशिक्षण घेण्याची संधी मिळेल.**
>
> **- डॉ. संजीव सोनवणे,** प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Tue, 04 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70395693

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# तीनशेहून अधिक अभ्यासक्रम

## 'डिग्री प्लस'अंतर्गत प्रवेश प्रक्रिया सुरू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'डिग्री प्लस' या उपक्रमाअंतर्गत तीनशेहून अधिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हार्वर्ड बिझनेस ऑनलाईन, एडब्लूएस, सिंपली लर्न, सेलिब्रिटी स्कूल, ईडीएक्स यांच्याशी केलेल्या कराराच्या माध्यमातून आयबीएम, स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीसारख्या अनेक नामांकित कंपन्या-संस्थांच्या अभ्यासक्रमांचा यात समावेश असून, त्यातील काही अभ्यासक्रमांना मोफत प्रवेश मिळणार आहे.

गेल्या वर्षी तत्कालीन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या पुढाकाराने विद्यापीठातर्फे विविध ऑनलाइन अभ्यासक्रमांचा समावेश असलेला 'डिग्री प्लस' हा उपक्रम सुरू करून प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात आला. विद्यार्थ्यांना शिकतानाच रोजगारक्षम करण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. पहिल्या वर्षी जवळपास २६ हजार विद्यार्थ्यांनी नावनोंदणी केली, तर पाच हजार विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतला. आता २०२२-२३ या वर्षासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वेगवेगळ्या मुदतीचे, वेगवेगळ्या विद्याशाखांचे अभ्यासक्रम या उपक्रमात विद्यार्थ्यांना शिकता येतील. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाईल. उपक्रमात जागतिक पातळीवरील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना कमी शुल्कात उपलब्ध केले आहेत. अभ्यासक्रम, नावनोंदणीची प्रक्रिया या बाबतची माहिती http://degreeplus.in या संकेतस्थळावर नमूद करण्यात आली आहे.



### अद्ययावत ज्ञान

डिग्री प्लसच्या माध्यमातून विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, अर्थशास्त्र, संस्कृती आदी विषयातील अद्ययावत ज्ञान घेणे शक्य होणार असल्याचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी सांगितले. तर, डिग्री प्लसच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम उपलब्ध करून देणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे राज्यातले बहुदा एकमेव सार्वजनिक विद्यापीठ आहे, असे प्र कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे यांनी नमूद केले.

लोकसत्ता Tue, 04 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70391982

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

पुढारी

# पीएच.डी. करणाऱ्यांना दुसऱ्या अभ्यासक्रमाची संधी नाही

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**



विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एकाच वेळी दोन पदवी अभ्यासक्रम करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार एकाच वेळी दोन पदवी अभ्यासक्रम करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना पीएच. डी. वगळता अन्य अभ्यासक्रमांना लागू असतील, असे यूजीसीने स्पष्ट केले आहे. त्यामुळे पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचवेळी दुसऱ्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येणार नाही.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'मध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणिक प्रक्रिया अनुभवाधिष्ठित, सर्वसमावेशक, संशोधनाधिष्ठित आणि विद्यार्थीकेंद्रित होण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखून त्या वृद्धिंगत करण्यासाठी सोयीसुविधा निर्माण करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन पूर्णवेळ शैक्षणिक अभ्यासक्रम करण्याची मुभा देण्याचा निर्णय यूजीसीने एप्रिलमध्ये घेतला होता. त्यानंतर आता या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या रचनेत आवश्यक ते बदल करण्याच्या सूचना यूजीसीने मार्गदर्शक सूचनांद्वारे दिल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना दोन्ही अभ्यासक्रमांना उपस्थित राहता येण्यासाठी, दोन्ही अभ्यासक्रमांच्या वेळा अडचणीच्या ठरणार नाहीत याची दक्षता घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

**एकाच वेळी दोन पदव्यांसाठी यूजीसीच्या मार्गदर्शक सूचना जाहीर**

विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन पूर्णवेळेचे अभ्यासक्रम करून पदव्या घेता येऊ शकतात. मात्र, अभ्यासक्रमांमध्ये वेळेची अडचण होऊ नये या दृष्टीने एकाच वेळी दोन पदवी अभ्यासक्रम करताना एक प्रत्यक्ष पदवी अभ्यासक्रम, तर दुसरा दूरशिक्षण किंवा ऑनलाइन पदवी अभ्यासक्रम किंवा एकाचवेळी दोन ऑनलाइन किंवा दूरशिक्षण अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल.

दूरशिक्षण किंवा ऑनलाइन पद्धतीने पदवी अभ्यासक्रम करण्यासाठी संबंधित संस्थेकडे तो अभ्यासक्रम राबवण्यासाठी यूजीसी किंवा नियामक परिषद किंवा केंद्र सरकारची मान्यता असणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### पूर्वलक्ष्यी प्रभावाने लाभ नाही...

एकाच वेळी दोन पदवी अभ्यासक्रमांसंदर्भातील मार्गदर्शक सूचना हे परिपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून लागू होतील. विद्यार्थ्यांनी परिपत्रक प्रसिद्ध होण्यापूर्वी दोन अभ्यासक्रम केले असल्यास पूर्वलक्ष्यी प्रभावाने त्याचे लाभ घेता येणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

My Pune Edition
Oct 4, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During October 2022

## Section: Education

### पीएच.डी. प्रवेश परीक्षेच्या अर्जासाठी मुदतवाढ

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेअंतर्गत ऑनलाइन अर्ज करण्यास मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना येत्या शुक्रवारपर्यंत (ता. ७) पीएच.डी. च्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करता येणार आहे. विद्यापीठासह संलग्न महाविद्यालयीन संशोधन केंद्रांमध्ये पीएच.डी. प्रवेशासाठी ही प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. पदव्युत्तर पदवीच्या शेवटच्या वर्षाला असलेले किंवा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या परीक्षेसाठी अर्ज करू शकतात. या अभ्यासक्रमासाठी ६ नोव्हेंबर रोजी प्रवेश परीक्षा होणार आहे. 'पीएच.डी'साठी किती जागा विभागनिहाय उपलब्ध आहेत, याची सविस्तर माहिती विद्यापीठाने यापूर्वीच परिपत्रकाद्वारे जाहीर केली आहे. त्यानुसार एकूण तीन हजार १८७ जागा उपलब्ध आहेत. या जागांसाठी सुरवातीला उमेदवारांनी अर्ज करणे आवश्यक आहे. अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांची १०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल, त्यानंतर मुलाखत घेऊन उमेदवारांची निवड केली जाईल. एम.फिल, नेट, पेट २०२१ परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना ही परीक्षा देण्याची सवलत देण्यात आली आहे. या विषयी अधिक माहिती 'https://bcud.unipune.ac.in/phd_entrance/applicant/login.aspx' या लिंकवर उपलब्ध आहे.

Sakaal 5.10.2022

पुणे

# विद्यापीठ फंडातून भरती

## १३२ कंत्राटी प्राध्यापकांची नियुक्ती; राज्य सरकारकडून बघ्याची भूमिका

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अनेक विभागांमध्ये पुरेसे प्राध्यापक नसल्याने १३२ प्राध्यापक कंत्राटी पद्धतीने भरण्याची वेळ विद्यापीठावर आली आहे. 'विद्यापीठ फंडा'तून या प्राध्यापकांचे दरमहा ४० हजार याप्रमाणे वेतन दिले जाणार असल्याने विद्यापीठाच्या तिजोरीवर ताण येणार आहे. 'खासगी अनुदानित महाविद्यालयांमधील प्राध्यापकांचे वेतन आम्ही देऊ,' अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांकडून केली जात असताना सरकारी विद्यापीठामधील प्राध्यापकांच्या वेतनाचा भार सरकार कधी उचलणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये सुमारे निम्म्याहून अधिक प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत. पदभरती गेल्या अनेक वर्षांपासून रखडल्याने विद्यापीठाला प्राध्यापक मिळत नसल्याचे चित्र आहे. यामुळे

> "राज्यातील प्राध्यापक भरतीबाबत दर महिन्याला काहीतरी नवे निर्णय, सूचना जाहीर केल्या जातात. त्यामुळे प्राध्यापक भरती रखडली असून, ही प्रक्रिया पुढे सरकत नसल्याचे चित्र आहे. त्यातच राज्यातील सरकारी विद्यापीठांचा प्राध्यापक भरतीबाबतचा आकृतिबंध मंजूर झालेला नाही. ही शोकांतिका असून, प्राध्यापक भरतीबाबत राज्य सरकारची अनास्था यातून दिसून येते.
>
> – संदीप पाथ्रीकर, नवमहाराष्ट्र प्राध्यापक संघटना

> विद्यापीठ प्रशासनाने १३२ प्राध्यापकांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाच्या विभागात प्राध्यापकांची संख्या अतिशय कमी आहे. यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी विद्यापीठ फंडातून प्राध्यापकांची नियुक्ती केली जात आहे.
>
> – डॉ. संजीव सोनावणे, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

१३२ प्राध्यापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला असून, हे प्राध्यापक कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात येणार आहेत. त्यासाठीचे वेतन विद्यापीठ फंडातून देण्यात येईल, असे स्पष्टीकरण विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आले आहे. हे असेच सुरू राहिले तर विद्यापीठ फंडाची रक्कम पुढील काही वर्षांत संपून जाईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही महिन्यांपासून विद्यापीठात कार्यरत असलेल्या प्राध्यापक, कर्मचाऱ्यांचे वेतनही अनिश्चित पद्धतीने होत आहे. काही प्राध्यापकांचे अनेक महिन्यांचे वेतन थकले आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री खासगी अनुदानित महाविद्यालयांमधील प्राध्यापकांचे वेतन देऊ, अशा घोषणा करीत आहेत. या घोषणा लोकप्रिय असल्या तरी सरकारी विद्यापीठामध्ये प्राध्यापकांच्या संख्येच्या कमतरतेमुळे, अनिश्चित वेतनामुळे जो गोंधळ सुरू आहे, त्यावर लक्ष कोण देणार, असा प्रश्न या निमित्ताने उभा राहिला आहे.

**सप्टेंबरपर्यंत प्राध्यापक**

विद्यापीठाची माहिती, कंत्राटी पदे भरणार



**प्राध्यापक भरतीचे काय?**

राज्यातील तेरा सरकारी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये गेल्या चार ते पाच वर्षांपासून प्राध्यापकांची भरती रखडली आहे. करोनाचे कारण देऊन दोन वर्षे प्राध्यापक भरती थांबविण्यात आली होती. करोना जाऊन आता वर्ष झाले. शिवाय सरकारही बदलले. नव्या सरकारकडून विद्यापीठांना मोठ्या आशा होत्या. मात्र, या सरकारनेही अजून प्राध्यापक भरतीविषयी साधी चर्चाही सुरू केलेली नाही. वेतन देण्यातच विद्यापीठाचा फंड खर्च होत असल्याने शैक्षणिक उपक्रम कसे करायचे, असा पेच विद्यापीठ प्रशासनासमोर उभा ठाकला आहे.

Maharashtra Times 5.10.2022

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

# पीएच.डी.बरोबरच दुसऱ्या पदवी अभ्यासक्रमास परवानगी नाही

## एकाचवेळी दोन पदवी अभ्यासक्रमाबाबत यूजीसीकडून मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एकाचवेळी दोन पदवी अभ्यासक्रम करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यानुसार एकाचवेळी दोन पदवी अभ्यासक्रम करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना पीएच.डी. वगळता अन्य अभ्यासक्रमांना लागू असतील असे यूजीसीने स्पष्ट केले आहे. त्यामुळे पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचवेळी दुसऱ्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येणार नाही.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'मध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणिक प्रक्रिया अनुभवाधिष्ठित, सर्वसमावेशक, संशोधनाधिष्ठित आणि विद्यार्थीकेंद्रित होण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखून त्या वृद्धिंगत करण्यासाठी सोयीसुविधा निर्माण करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन पूर्णवेळ शैक्षणिक अभ्यासक्रम करण्याची मुभा देण्याचा निर्णय यूजीसीने एप्रिलमध्ये घेतला होता. त्यानंतर आता या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या रचनेत आवश्यक ते बदल करण्याच्या सूचना यूजीसीने मार्गदर्शक सूचनांद्वारे दिल्या. तसेच विद्यार्थ्यांना दोन्ही अभ्यासक्रमांना उपस्थित राहता येण्यासाठी, दोन्ही अभ्यासक्रमांच्या वेळा अडचणीच्या ठरणार नाहीत याची दक्षता घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना एकाचवेळी दोन पूर्णवेळाचे अभ्यासक्रम करून पदव्या घेता येऊ शकतात. मात्र अभ्यासक्रमांमध्ये वेळेची अडचण होऊ नये या दृष्टीने एकाएच वेळी दोन पदवी अभ्यासक्रम करताना एक प्रत्यक्ष पदवी अभ्यासक्रम, तर दुसरा दूरशिक्षण किंवा ऑनलाइन पदवी अभ्यासक्रम किंवा एकाचवेळी दोन ऑनलाइन किंवा दूरशिक्षण अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येईल. दूरशिक्षण किंवा ऑनलाइन पद्धतीने पदवी अभ्यासक्रम करण्यासाठी संबंधित संस्थेकडे तो अभ्यासक्रम राबवण्यासाठी यूजीसी किंवा नियामक परिषद किंवा केंद्र सरकारची मान्यता असणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Fri, 07 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70421895

# महाविद्यालयांच्या स्वायत्ततेसाठी मार्गदर्शक कक्षाची निर्मिती

## नॅकची घोषणा; राष्ट्रीय मान्यता परिषद बांधणीला सुरुवात

**पुणे, ता. ८ :** विद्यापीठांचे विकेंद्रीकरण आणि उच्च शैक्षणिक संस्थांच्या स्वायत्ततेसाठी नवीन शैक्षणिक धोरणात (एनईपी) राष्ट्रीय मान्यता परिषदेचा (एनएसी) प्रस्ताव मांडण्यात आला आहे. महाविद्यालयांना मूल्यांकन आणि स्वायत्ततेसंबंधीच्या बदलांची माहिती व्हावी, यासाठी मार्गदर्शक कक्षाची (हॅन्डहोल्डींग अॅण्ड मेंटरींग सेल) निर्मिती करण्यात आली आहे.

राष्ट्रीय मान्यता परिषदेच्या निर्मितीसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणन परिषद (नॅक), नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रीडेशन आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ रँकींग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) या संस्थांद्वारे रोडमॅप तयार करण्यास सांगितला आहे. एनईपीमध्ये दर्जेदार महाविद्यालयांना टप्प्याटप्प्याने स्वायत्तता देण्याचा विचार मांडण्यात आला आहे. दीर्घकाळ चालणारीही प्रक्रिया दुहेरी चालणार असून, यासाठी उच्च शिक्षणसंस्थांना प्राथमिक निकष, दर्जा, स्वयंशासन आणि स्वायत्ततेसाठी काही मानके (बेंचमार्क) गाठावे लागणार आहे. नव्या धोरणात मूल्यांकन आणि मान्यता प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल सुचविले आहेत. या बदलांसंबंधी उच्च शिक्षण संस्था जागरूक व्हाव्यात, यासाठी मार्गदर्शन कक्षाची स्थापना केल्याची माहिती नॅकच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी दिली.

### कक्षाचे फायदे

- नवीन शैक्षणिक धोरणातील येऊ घातलेले बदल महाविद्यालयांना टिपता येतील
- मूल्यांकनातील बदलांची माहिती आणि समुपदेशन मिळणार
- मूल्यांकन, स्वायत्ततेसाठी आवश्यक पूर्ततेची माहिती मिळणार
- दुहेरी आणि दीर्घकालीन प्रक्रिया असल्यामुळे उच्च शिक्षण संस्थांना कक्षाकडून वेळोवेळी आवश्यक मदत पुरवली जाणार
- नोंदणीसाठीचे संकेतस्थळ : http://naac.gov.in/

Sakaal 9.10.2022

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

पुढारी



पदवी प्रदान सोहळ्यानंतर विश्वशांती घुमटासमोर सर्वच विद्यार्थ्यांचे छायाचित्र काढण्यात आले. या वेळी पदवी प्रदान सोहळ्यासाठी आलेले सर्व उपस्थित मान्यवर.

# शिक्षण धोरण 'गेम चेंजर' ठरेल

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'केंद्र सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० जाहीर केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासह समाजातील विविध समस्यांचे निराकरण, संशोधनातून विकास घडविता येईल. उच्च गुणवत्तापूर्ण संशोधनात्मक शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना मिळावे. ज्ञानाची उत्पत्ती आणि संशोधनाच्या वातावरणनिर्मितीसाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० गेम चेंजर ठरेल,' असे मत केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजकुमार रंजन सिंग यांनी व्यक्त केले.

**केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजकुमार रंजन सिंग यांचे मत**

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचा चौथा दीक्षान्त समारंभ शनिवारी पार पडला. या वेळी विद्यापीठाच्या ४५७६ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे अध्यक्ष डॉ. के. कस्तुरीरंगन हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड होते. या वेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल कराड, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, प्र-कुलगुरू प्रा. तपन पांडा, डॉ. प्रसाद खांडेकर, कुलसचिव डॉ. प्रशांत दवे आणि परीक्षा नियंत्रक प्रा. गणेश पोकळे आदी उपस्थित होते.

या दीक्षान्त समारंभात बी. टेक.मधील केवल पद्मवार याला फाउंडर प्रेसिडेंट मेडल व बॅचलर ऑफ एज्युकेशनच्या मिनू कलिता यांचा एक्झिक्युटिव्ह प्रेसिडेंट मेडलने गौरव करण्यात आला. डॉ. सिंग म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या जीवनातील ध्येय साध्य करण्यासाठीचा हा दिवस महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि बदलत्या काळानुसार शिक्षण द्यावे. शिक्षणातून विज्ञान आणि तंत्रज्ञानासोबत अध्यात्माची सांगड घालता यावी. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या माध्यमातून भारतीय शिक्षणपद्धतीला उच्चपातळीवर घेऊन जाण्याचे कार्य होईल. बहुशाखांच्या अभ्यासक्रमातून होलिस्टिक डेव्हलपमेंट आणि संशोधनात्मक वृत्ती निर्माण करण्याचे साधन हे धोरण ठरेल. कौशल्य शिक्षण प्राथमिकपासून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.'

डॉ. के. कस्तुरीरंगन म्हणाले, 'समाज आणि व्यक्तिमत्त्वविकासासाठी गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षण प्रदान करण्याचे कार्य एमआयटीच्या माध्यमातून होत आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील हा अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. भारत हा सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक संशोधनात्मक वृत्ती जोपासणारा देश आहे.'

प्रा. डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, 'मूल्यात्मक शिक्षण देण्याचा आमचा मानस आहे. पालकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ ज्ञानाचे दालन म्हणून उदयाला येईल. मूल्याधिष्ठित शिक्षणपद्धतीनेच विद्यार्थ्यांचे सर्वगुणसंपन्न असा नागरिक निर्माण होईल.'

Pune Edition
Oct 9, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# राष्ट्रीय शिक्षण धोरण 'गेम चेंजर' ठरेल

## केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजकुमार सिंग यांचे मत

**पुणे, ता. ८ :** समाजाच्या विकासासाठी आणि गुणवत्तापुरक शिक्षण प्रदान करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण महत्त्वाचे ठरत असते. केंद्र सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरण जाहीर केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासह समाजातील विविध समस्यांचे निराकरण, संशोधनातून विकास घडविता येईल. उच्च गुणवत्तापूर्ण संशोधनात्मक शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना मिळावे. ज्ञानाची उत्पत्ती आणि संशोधनाचे वातावरण निर्मितीसाठी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' गेम चेंजर ठरेल, असे मत केंद्रीय परराष्ट्र व्यवहार व शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजकुमार रंजन सिंग यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचा चौथा दीक्षांत समारंभ शनिवारी लोणी-काळभोर येथे पार पाडला. यावेळी विद्यापीठाच्या चार हजार ५७६ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सिंग बोलत होते. यावेळी इस्त्रोचे माजी अध्यक्ष व 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'चे अध्यक्ष डॉ. के. कस्तुरींगन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ कराड हे होते. यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, प्र-कुलगुरू प्रा. तपन पांडा, डॉ. प्रसाद खांडेकर, कुलसचिव डॉ. प्रशांत दवे आणि परिक्षा नियंत्रक प्रा. गणेश पोकळे आदी उपस्थित होते.

या समारंभात 'बीटेक'मधील केवल पद्मवार याला फाउंडर प्रेसिडेंट मेडल व बॅचलर ऑफ एज्युकेशनचे मिनू कलिता यांचा एक्जीकेटीव्ह प्रेसिडेंट मेडलने गौरव करण्यात आला. तसेच विविध शाखांतील विद्यार्थ्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदक देण्यात आले.

Sakaal 9.10.2022

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाद्वारे सर्वांगीण विकास

## केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजकुमार रंजन सिंग यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या माध्यमातून भारतीय शिक्षण पद्धतीला उच्च पातळीवर घेऊन जाण्याचे कार्य होईल. हे धोरण बहुशाखांच्या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण विकास आणि संशोधनात्मक वृत्ती निर्माण करण्याचे साधन ठरेल, असे मत केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजकुमार रंजन सिंग यांनी मांडले.

एमआयटी विश्वशांती चौथ्या दीक्षांत समारंभात डॉ. सिंग बोलत होते. इस्रोचे माजी अध्यक्ष डॉ. के. कस्तुरीरंगन, विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, कार्याध्यक्ष राहुल कराड, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, कुलसचिव डॉ. प्रशांत दवे आदी या वेळी उपस्थित होते. विद्यापीठाच्या चार हजार ५७६ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. बीटेकमधील केवल पद्मवारला संस्थापक अध्यक्ष पदक, बॅचलर ऑफ एज्युकेशनची मिनू कलिता यांना कार्याध्यक्ष पदकाने गौरवण्यात आले.

ज्ञान निर्मिती आणि संशोधनाच्या वातावरण निर्मितीसाठी शिक्षण धोरण महत्त्वाचे ठरेल. तसेच डिजिटल युगात हे शिक्षण धोरण डिजिटल शिक्षणाचे वातावरण तयार करेल, असे डॉ. सिंग म्हणाले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर नव्या धोरणात भर आहे. भारतीय अवकाश तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पुढील काही वर्षांत भारत अवकाशात जाऊ शकतो. हे केवळ भारतीय युवकांमुळे घडू शकते. भारतामध्ये मोठ्या प्रमाणात संधी वाट पाहत असल्याचे डॉ. कस्तुरीरंगन यांनी नमूद केले.

लोकसत्ता Sun, 09 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70449491

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# राष्ट्रीय शिक्षण धोरण कलाटणी देणारे ठरेल

## केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजकुमार रंजन सिंग यांचे मत



**पुणे** : ज्ञानाची उत्पत्ती आणि संशोधनाचे वातावरण निर्मितीसाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण कलाटणी देणारे ठरेल, असे मत परराष्ट्र व्यवहार व शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजकुमार रंजन सिंग यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचा चौथा दीक्षांत समारंभ शनिवारी लोणी काळभोर येथे विश्व सभामंडपात पार पाडला. ४५७६ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सिंग बोलत होते. इस्रोचे माजी अध्यक्ष डॉ. के. कस्तुरीरंगन, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल कराड, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, डॉ. मिलिंद पांडे, प्रा. तपन पांडा, डॉ. प्रसाद खांडेकर, डॉ. प्रशांत दवे उपस्थित होते.

डॉ. राजकुमार रंजन सिंग म्हणाले, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या माध्यमातून भारतीय शिक्षण पद्धतीला उच्च पातळीवर घेऊन जाण्याचे कार्य होईल. बहुशाखांच्या अभ्यासक्रमातून संशोधनात्मक वृत्ती निर्माण करण्याचे साधन हे धोरण ठरेल.

डॉ. के. कस्तुरीरंगन म्हणाले, समाजाच्या विकासासाठी आणि व्यक्तिमत्व विकासासाठी गुणवत्ता-पूर्ण आणि आधुनिक शिक्षण प्रदान करण्याचे कार्य एमआयटीच्या माध्यमातून होत आहे. भारत हा सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक, संशोधनात्मक वृत्ती जोपासणारा देश आहे. भारतीय मुल्यात्मक शिक्षण हेच ध्येय साध्य करण्याचे साधन आहे.

प्रा. डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, मूल्यात्मक शिक्षण देण्याचा आमचा मानस आहे. पालकांना आपेक्षा पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ ज्ञानाचे दालन म्हणून उदयाला येईल. डॉ. आर. एम. चिटणीस यांनी प्रस्ताविक केले. प्रा. गौतम बापट, प्रा. चायनिका बसू व प्रा. पौर्णिमा बागची यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. गणेश पोकळे यांनी आभार मानले.

Kesari 9.10.2022

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

# हिंदी किंवा स्थानिक भाषांमध्ये उच्च तंत्रशिक्षण द्या!

## संसदीय समितीची शिफारस, अहवाल राष्ट्रपतींना सादर

**पीटीआय, नवी दिल्ली :**

**उच्चशिक्षण देणाऱ्या** संस्थांमध्ये हिंदी किंवा स्थानिक भाषांमधून शिक्षण दिले जावे, अशी शिफारस संसदीय समितीने केली आहे. हिंदीभाषिक राज्यांमधील संस्थांमध्ये हिंदीत, तर अन्य राज्यांतील संस्थांमध्ये तिथल्या भाषेमध्ये शिक्षण दिले गेले पाहिजे, असे संसदीय समितीचे मत आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखालील अधिकृत भाषाविषयक संसदीय समितीचा ११वा अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सादर करण्यात आला. आयआयटीसारख्या तंत्रशिक्षण देणाऱ्या प्रतिष्ठित संस्थांसह अन्य उच्चशिक्षण हे हिंदी किंवा स्थानिक भाषेत व्हावे, असा आग्रह या अहवालात धरण्यात आला आहे. तसेच सर्व राज्यांमध्ये इंग्रजीऐवजी स्थानिक भाषांना अधिक प्राधान्य दिले गेले पाहिजे, अशी भूमिकाही मांडली आहे. संयुक्त राष्ट्रांमध्ये हिंदी ही अधिकृत भाषा व्हावी, अशी शिफारस अहवालात करण्यात आली आहे. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाला अनुसरून सूचना करण्यात आल्याचे संसदीय समितीचे उपाध्यक्ष भर्तृहारी महताब (बिजू जनता दल) यांनी सांगितले.

लोकसत्ता Mon, 10 October 2022
https://epaper.loksatta.com/c/7

## News Paper Clippings During October 2022

### Section: Education

पुढारी

# शैक्षणिक धोरणाचा नुसताच खळखळाट

## बदलांबाबत लेखी आदेश नसतानाही अंमलबजावणी सुरू झाल्याचे शिक्षणमंत्र्यांचे स्पष्टीकरण

गणेश खळदकर

**पुणे : राज्यात सध्या नवीन शैक्षणिक धोरणाची (एनईपी) अंमलबजावणी सुरू आहे, असे थेट स्पष्टीकरण शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी पुण्यातील एका शालेय कार्यक्रमात दिले. प्रत्यक्षात मात्र धोरणाची अंमलबजावणी कागदावरच आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागात तर एनईपी म्हणजे काय रे भाऊ अशी परिस्थिती आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात नवीन शैक्षणिक धोरणाचा नुसताच खळखळाट आहे.**



देशात कर्नाटक हे नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणारे पहिले राज्य ठरले आहे, तर महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षांपासून नवीन शैक्षणिक धोरणाचा मसुदा आणि त्यातील वेगवेगळ्या घटकांवर केवळ चर्चेचे गुऱ्हाळ सुरू आहे. काही राज्यांचा धोरण राबविण्यासच नकार आहे. त्यामुळे २०४० पर्यंत पूर्व प्राथमिक ते पदवीपर्यंत प्रत्येक वर्गात अंमलबजावणी होणे अपेक्षित असलेल्या नवीन शैक्षणिक धोरणातील बदल प्रत्यक्षात कधी अंमलात येणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

नवीन शैक्षणिक धोरण अद्याप शिक्षकांपर्यंत पोहोचलेलेच नाही. धोरणासंदर्भात आत्ता कुठे विद्यापीठाकडून कार्यशाळा घेण्यात येत असून दहा मुद्द्यांवर सध्या चर्चा सुरू आहे. केंद्रशासनाकडून काही ऑनलाइन वेबिनार घेण्यात आले, परंतु याचा फारसा परिणाम झालेला नाही. तसेच नवीन शैक्षणिक धोरणानुसार नेमके कोणते बदल करावचे आहेत, याची कोणतीही परिपत्रके महाविद्यालयांपर्यंत पोहचलेली नाहीत. त्यामुळे पारंपरिक पध्दतीनेच शिक्षण सुरू आहे. त्यामुळे धोरणात नेमके कोणते बदल करायचे आहेत, त्यासंदर्भात कागदपत्रे महाविद्यालयांना पाठविणे आवश्यक आहे. नवीन शैक्षणिक धोरणाबाबत सध्या विद्यार्थी अनभिज्ञ आहेतच, त्याचबरोबर अनेक प्राध्यापकदेखील अनभिज्ञ आहेत. अशा परिस्थितीत नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे आव्हानात्मक ठरणार आहे.

एनईपी म्हणजे काय रे भाऊ?

भाग - १

पुढारी विशेष



"नवीन शैक्षणिक धोरण न तपासलेल्या गृहितंकावर अवलंबून असल्यामुळे सर्वच स्तरातील लोकांना कार्यशाळा घेऊन धोरणाचा दृष्टिकोन समजावून सांगणे अत्यंत गरजेचे आहे, तरच धोरण गांभियाने घेतले जाईल.

- **डॉ. अरुण अडसूळ,** माजी कुलगुरू

### नवीन शैक्षणिक धोरणाची प्रशिक्षणे तालुकापातळीवर व्हावीत

नवीन शैक्षणिक धोरण नेमके काय आहे, त्याची अंमलबजावणी कशी करायची याची प्रशिक्षणे तालुका पातळीवर घेणे गरजेचे आहे. त्यासाठी तालुका पातळीवरील शाळा-महाविद्यालयांचा गट करावा, याची जबाबदारी एखाद्या महाविद्यालयाकडे द्यावी, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विभागीय संचालक यांनी त्याची जबाबदारी घेणे गरजेचे आहे, तरच धोरण तळागाळापर्यंत पोहचण्यास मदत होईल.

"नवीन शैक्षणिक धोरण ग्रामीण-आदिवासी भागांपर्यंत पोहचण्यासाठी जास्तीत जास्त मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. त्यासाठी तालुका पातळीवर छोटे-छोटे गट करून प्रशिक्षणाची व्यवस्था केली तर धोरण प्रभावीपणे पोहचण्यास मदत होणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची माहिती आहे, परंतु अंमलबजावणीचा कोणताही आदेश नसल्यामुळे जुन्याच पध्दतीने शिक्षणाचे कार्य सुरू आहे.

- **डॉ. नंदकुमार जाधव,** प्राचार्य, सुभाष बाबूराव कुल, कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय.

Pune Edition
Oct 10, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# उच्चशिक्षणासाठी 'सारथी'ची शिष्यवृत्ती

**पुणे, ता.९ :** मराठा व कुणबी समाजातील विद्यार्थ्यांना देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेण्यासाठी एक नामी संधी उपलब्ध झाली आहे. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) वतीने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

### अशा आहेत अटी...

- राज्य बोर्डातून परीक्षा उत्तीर्ण असावी
- बारावीच्या परीक्षेत किमान ५५ टक्के गुण
- पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी पदवीचे गुण तर पदवीच्या अभ्यासक्रमासाठी बारावीचे गुणांनुसार क्रमवारी
- पदवीसाठी २५ तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ३०ची कमाल वयोमर्यादा
- इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेणारा नसावा

### हे लक्षात ठेवा

- अर्ज करण्याची शेवटची मुदत : २१ सप्टेंबर
- सारथी संस्थेत कागदपत्र सादर करण्याची मुदत : ३० सप्टेंबर
- संकेतस्थळ : https://www.sarthi-maharashtragov.in/

Sakaal 10.10.2022

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याकरिता नोंदवा मत

## शिक्षणातील अपेक्षित बदलांबाबत 'एनसीईआरटी'ने मागविल्या नागरिकांच्या सूचना

**पुणे, ता. ९ :** इयत्ता पहिलीपासून शाळेत विद्यार्थ्यांना कोणत्या भाषा शिकवायला पाहिजेत, तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना कोणते विषय शिकवावेत, शिक्षण भविष्यवेधी होण्यासाठी काय करायला हवे, अशा प्रश्नांवर तुम्हीही तुमचे मत मांडू शकता आणि त्याद्वारे 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा' विकसित करण्यासाठी तुमच्या सूचना देऊ शकता.

आश्चर्य वाटतंय ना! अहो, पण हे खरे आहे. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'च्या प्रयत्न अंमलबजावणीसाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत (एनसीईआरटी) 'राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा' निर्मितीसाठी सर्वेक्षणाद्वारे देशभरातील नागरिकांच्या सूचना आणि अभिप्राय मागविण्यात आले आहेत. या सर्वेक्षणात विशेषत: शालेय शिक्षणात कोणते बदल करणे अपेक्षित आहेत, यावर दहा प्रश्न विचारण्यात आले आहेत. त्याला बहुपर्यायी दिली उत्तरे असून, त्या प्रत्येकाला पाच पर्याय दिले आहेत.

### तुम्हीही असे सहभागी व्हा!

- या डिजिटल सर्वेक्षणाद्वारे तुम्हालाही तुमचे अभिप्राय कळवायचे असतील, तर 'https://ncfsurvey.ncert.gov.in/' या संकेतस्थळाला भेट द्या.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा' विकसित करताना सर्वसामान्य नागरिकांची मते जाणून घेणे, हे निश्चितच चांगले आहे. यात देशभरातील नागरिकांचा भरपूर प्रतिसाद मिळेल. अभ्यासक्रम निश्चित करताना तज्ज्ञांना या सर्वेक्षणातील निष्कर्ष नक्कीच पूरक ठरणार आहेत. तसेच हा अभ्यासक्रम आराखडा तयार केल्यानंतर तो सूचना मांडण्यासाठी उपलब्ध करून दिल्यास, त्यावर अधिक चांगल्याप्रकारे मते मांडली जातील.

\- डॉ. वसंत काळपांडे, माजी शिक्षण संचालक

Sakaal 10.10.2022

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

# NEP 2020: Prep review of varsities from today

TIMES NEWS NETWORK

**Aurangabad:** The state education (higher) department will soon start reviewing preparations of the state universities regarding implementation of the National Education Policy (NEP) 2020 that outlines the vision of the country's new education system.

While the necessary preparedness of 14 state non-agricultural universities will be assessed in a phased manner, three such varsities in the region — Dr Babasaheb Ambedkar Marathwada University (Bamu) in Aurangabad, Swami Ramanand Teerth Marathwada University (SRTMU) in Nanded and Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University in Jalgaon — will undergo the necessary scrutiny on Monday.

Public relations officer of Bamu Sanjay Shinde said the university has taken some key decisions as a precursor to roll out the NEP 2020. "The joint board of vice-chancellors (JBVC) of all state universities in Maharashtra had decided on some reforms at a meeting in 2018. Review of NEP preparations as well as progress of reforms involving JBVC would be taken at Monday's meeting," he said.

The Times of India 10.10.2022

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# स्वायत्ततेसाठी महाविद्यालयांना आता थेट अर्ज करणे शक्य

### यूजीसीकडून नवी नियमावली प्रसिद्ध; हरकती-सूचनांसाठी २५ ऑक्टोबरची मुदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : देशभरातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या स्वायत्त दर्जाच्या नियमांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) बदल केला आहे. त्या अंतर्गत आता संलग्न महाविद्यालये शैक्षणिक आणि प्रशासकीय स्वायत्ततेसाठी यूजीसीकडे थेट अर्ज करू शकणार असून, स्वायत्ततेच्या नव्या नियमावलीवर २५ ऑक्टोबरपर्यंत हरकती-सूचना नोंदवता येतील.

महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याबाबतच्या नव्या नियमावलीला यूजीसीकडून मान्यता देण्यात आली. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोग (महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा देणे आणि स्वायत्त महाविद्यालयांमध्ये मानके राखण्यासाठीचे उपाय) नियमावली २०२२ हा नव्या नियमावलीचा मसुदा यूजीसीकडून प्रसिद्ध करण्यात आला. स्वायत्ततेसाठी महाविद्यालयांच्या पात्रता निकषांमध्ये बदल करण्यात आलेला नाही. अनुदानित, विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित, खासगी असे कोणतेही महाविद्यालय स्वायत्ततेसाठी अर्ज करू शकते. मात्र महाविद्यालयाला किमान दहा वर्षे झालेली असणे आवश्यक आहे. तसेच महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेची (नॅक) किमान 'अ' श्रेणी, किमान तीन अभ्यासक्रमांचे किमान ६७५ गुणांसह राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून (नॅब) मूल्यांकन झालेले असणे बंधनकारक आहे, असे नमूद करण्यात आले आहे.

स्वायत्ततेच्या निकषांची पूर्तता करत असलेल्या आणि स्वायत्त दर्जा घेऊ इच्छित असलेली महाविद्यालये यूजीसीच्या संकेतस्थळावरील अर्ज वर्षभरात केव्हाही भरू शकतात. त्यानंतर पालक विद्यापीठाकडून तीस दिवसांत त्या अर्जाची पडताळणी करून शिफारशी सादर करू शकते. संबंधित विद्यापीठाने तीस दिवसांत शिफारशी न कळवल्यास विद्यापीठाला काहीही आक्षेप नसल्याचे गृहीत धरले जाईल, असे नियमावलीत स्पष्ट करण्यात आले आहे. २०१८च्या नियमावलीमध्ये महाविद्यालयाला विद्यापीठाकडे अर्ज करावा लागत होता, तो अर्ज विद्यापीठाकडून यूजीसीला सादर केला जात होता.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मुळे देशातील उच्च शिक्षणात आमूलाग्र बदल होत आहेत. त्यामुळे स्वायत्ततेबाबतच्या नियमावलीचा पुर्नआढावा घेऊन या धोरणातील शिफारशीशी सुसंगत असे नवे नियम तज्ज्ञ समितीच्या मदतीने करण्यात आल्याचे यूजीसीकडून स्पष्ट करण्यात आले.




लोकसत्ता Tue, 11 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70469116

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# धोरण राबवणाऱ्यांचीच वानवा!

**गणेश खळदकर**

**पुणे : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी पुढील वर्षापासून करण्यात येणार आहे. हे धोरण राबविण्याची जबाबदारी विद्यापीठांची आहे, परंतु विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये अनुभवी प्राध्यापक निवृत्त तर नवीन प्राध्यापकांची भरतीच नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे ज्यांच्या जिवावर या धोरणाची अंमलबजावणी करणार आहे, त्या कुशल मनुष्यबळाचीच सध्या वानवा असल्यामुळे धोरणाची प्रभावी अंमलबजावणी कशी होणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

- **अनुभवी प्राध्यापक निवृत्त तर नवीन प्राध्यापकांची भरतीच नाही**
- **धोरण राबविण्याची घाई विद्यार्थ्यांना संकटात ओढणारी**

तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राध्यापकांची भरतीच नसल्यामुळे विद्यापीठे तसेच महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या निम्म्याहून अधिक जागा रिक्त आहेत, तर तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांची काम जास्त आणि पगार कमी अशी अवस्था आहे. महाविद्यालयांमध्ये मंजूर प्राध्यापकांचा आराखडा वर्षानुवर्षे तसाच आहे. एखाद्या महाविद्यालयात मराठी विषयाची चार पदे मंजूर असतील तर त्या महाविद्यालयात मराठी विषयाला विद्यार्थ्यांनी प्रवेश नाही घेतला तरी त्या पदांवर प्राध्यापक तसेच कार्यरत राहतात. धोरण राबण्यास सुरुवात केल्यानंतर आर्थिक भार वाढणार आहे. राज्य सरकार केवळ वेतन अनुदान देते, त्याव्यतिरिक्त शासनाकडून कोणतीही अर्थिक मदत नसते. महाविद्यालये, विद्यापीठांना उत्पन्न म्हणजे विद्यार्थ्यांचे शुल्क. मात्र, वर्षानुवर्षे शुल्कवाढ केली जात नाही, त्यामुळे उत्पन्न घटल्यामुळे धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यास अडचणी येणार आहेत.




औद्योगिक क्षेत्रातून नवीन प्राध्यापक घेण्यात येणार आहेत, त्यांची पात्रता कोण तपासणार, मल्टीपल एन्ट्री आणि मल्टीपल एक्झीटमध्ये अभ्यासक्रमांची सांगड कशी घालणार हा देखील महत्त्वाचा विषय आहे.

धोरणातील संकल्पना चांगल्या आहेत, परंतु त्याची घाईगडबडीत अंमलबजावणी केली आणि काही चुका झाल्या तर प्रचंड गोंधळ निर्माण होईल आणि युवा वर्गाच्या शैक्षणिक भवितव्याचा खेळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे धोरणातील संकल्पना प्रत्येक घटकाला पटवून मगच धोरणाची अंमलबजावणी करावी, अशी तज्ज्ञांची मागणी आहे.

**(समाप्त)**



### महाविद्यालयांचे क्लस्टर व्यवहार्य आहे का ?

राज्यातील ४५ हजार महाविद्यालयांची संख्या १५ हजार करण्याची योजना आहे. त्यासाठी महाविद्यालयांचे क्लस्टर करण्यात येणार आहे, परंतु एकाच तालुक्यात वेगवेगळ्या विचारांच्या संस्थाचालकांची महाविद्यालये असल्यास संबंधित संस्थाचालक एकत्र येण्याची शक्यता केवळ दुरापास्त आहे. त्यामुळे महाविद्यालयांचे क्लस्टरदेखील शक्य होणार नसल्याचे चित्र आहे.

" धोरणाची अंमलबजावणी पुढील वर्षापासून करणे केवळ अशक्य आहे. संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांची कार्यशाळा घेणे आवश्यक आहे. यांच्यामध्ये एकवाक्यता असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा गोंधळ होऊ नये म्हणून धोरणकर्त्यांनी त्यांच्या अपेक्षा समाजाला समजाव्यात यासाठी माध्यमांचा वापर करून धोरण स्पष्ट करावे. धोरण राबविण्याची घाई केली तर गोंधळ उडून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येण्याची शक्यता आहे.

**- डॉ. अरुण अडसूळ,** माजी कुलगुरू.

" २१ व्या शतकाच्या अपेक्षेनुसार योग्य धोरण तयार करण्यात आले आहे, परंतु धोरणाच्या अंमलबजावणीबाबत दोन गट तयार झाले आहेत. एका गटाने शैक्षणिक धोरणातील काही विषयांची अंमलबजावणी सुरू केली आहे, तर दुसरा गट याकडे सपशेल दुर्लक्ष करत आहे. त्यातच शासनाचे देखील याकडे अपेक्षित लक्ष नाही. त्यामुळे शासनानेच पुढाकार घेऊन धोरणाचे महत्त्व पटवून देण्याची गरज आहे.

**- डॉ. पंडित विद्यासागर,** माजी कुलगुरू.

Pudhari 11.10.2022

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# बनावटांची सद्दी; निबंधांची रद्दी

■ डॉ. शुभदा नगरकर



दर्जेदार व नैतिकतेने केलेले संशोधन मानवाच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरते. त्याचा संशोधकास वेगळाच आनंद मिळतो. एखाद्या विद्यापीठातील वा संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञांकडून समाजाभिमुख शोध लावला जातो, तेव्हा त्यामागे त्यांचे अथक परिश्रम, सखोल मूलभूत संशोधन, विविध प्रयोगांतून काढलेले निष्कर्ष, पूर्वीच्या संदर्भांची सखोल पडताळणी आणि संशोधनातील वेगळेपण या गोष्टी असतात. असे संशोधन प्रथितयश जर्नल्समधून (नियतकालिके) संपादक व विषय तज्ज्ञांनी बारकाईने पुनरावलोकन (पीअर रीव्ह्यू) केल्यावर रिसर्च पेपर्सच्या स्वरुपात प्रसिद्ध होते. त्यानंतरच त्या संशोधकाला त्याचे श्रेय मिळते.

म्हणजेच दर्जा हा संशोधनाचा आत्मा आहे; परंतु काही दशकांपासून संशोधनाचा संबंध संशोधकांच्या वा शिक्षकांच्या नियुक्ती-पदोन्नतीसाठी लावला गेला आहे. त्यामुळे संशोधनाचे सखोल मूल्यमापन न होता संशोधकाने फक्त किती रीसर्च पेपर्स प्रकाशित केले, याला महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे आजमितीला हजारो जर्नल्समधून मोठ्या प्रमाणात संशोधन प्रसिद्ध होत आहे; तसेच जर्नल्सचा दर्जाही अंकात म्हणजेच 'इम्पॅक्ट फॅक्टर'च्या स्वरुपात मोजला जाऊ लागला. म्हणजेच संशोधन व जर्नल हे कळीचे मुद्दे ठरले. संशोधन मोजमापनाची संख्यात्मक पद्धती, त्याचा वापर व गैरवापर यांचा ऊहापोह यामुळे आवश्यक ठरतो.

विसाव्या शतकात साठीच्या दशकात युजिन गारफील्ड या अमेरिकन भाषाशास्त्रज्ञाने जर्नलचा 'इम्पॅक्ट फॅक्टर' संख्यात्मक रीतीने मोजण्याचे तंत्र शोधले. रिसर्च पेपरमधील संदर्भ यादीचा (रेफरन्सेस) त्यांनी उपयोग केला. एक रेफरन्स म्हणजे आधीच्या पेपरला मिळालेले एक उद्धरण म्हणजे 'सायटेशन' असा होतो. एखाद्या जर्नलमधील दोन वर्षांत प्रसिद्ध झालेल्या पेपरना मिळणाऱ्या सायटेशन्सच्या आधारे जर्नलचा 'इम्पॅक्ट फॅक्टर' ठरवला गेला. याचा अर्थ असा, की ज्या जर्नलमधील पेपरना जितके जास्त सायटेशन, तितका त्या नियतकालिकाचा 'इम्पॅक्ट फॅक्टर' जास्त. म्हणजेच पेपरमध्ये खूप रेफरन्स असणे महत्वाचे ठरते. गारफील्ड हे उत्तम व्यवसायिकही होते. त्यांनी शास्त्र, कला, मानवविद्या आणि समाजशास्त्र या विषयांतील वरील पद्धतीने स्वतंत्र ईंडेक्स तयार केले जे आज क्लॅरिव्हेट ॲनालिटिक्स ही कंपनी वेब ऑफ सायन्स / नॉलेज या डेटाबेसच्या रूपात जगभरातील संशोधकांसाठी प्रकाशित करते. 'जर्नल सायटेशन रिपोर्ट' (जेसीआर) ही कंपनी दर वर्षी जून महिन्यात सुमारे १४ हजार जर्नल्सचा 'इम्पॅक्ट फॅक्टर' प्रसिद्ध करते.

या विश्लेषणातून एखाद्या संशोधकाचे, संस्थेचे; तसेच देशाचे संशोधनातील योगदान सांख्यिकी स्वरूपात मोजले जाते. विद्यापीठे व संस्थांची क्रमवारी लावण्यात याचा उपयोग केला जातो. गारफील्ड यांच्या मते या अभ्यासाचा मुख्य उपयोग ग्रंथालयात उत्तम जर्नल्स निवडण्यासाठी करता येतो. मात्र ऐंशीच्या दशकातच अशा प्रकारच्या सांख्यिकी मोजणीचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होईल असे भाकीत त्यांनी केले होते. नेमके हेच सध्या घडताना दिसत आहे. संशोधकांना व शिक्षकांना सायटेशन डेटाबेसेसची आणि जर्नल्सच्या 'इम्पॅक्ट फॅक्टर' बद्दल पुरेशी माहितीच नसते किंवा माहिती करून घ्यायचीही नसते. याचा फायदा घेऊन बोगस प्रीडेटरी जर्नल्सचा सुळसुळाट झाला. अगदी छापील जर्नल्सनाही 'इम्पॅक्ट फॅक्टर' लावला गेला. तो असूच शकत नाही; कारण अशा जर्नल्समध्ये छापून आलेल्या पेपरची सायटेशन्स मोजताच येत नाहीत. मग संशोधकांच्या अज्ञानाचा (?) फायदा उठवत बोगस कंपन्यांनी २५ पेक्षा जास्त बनावट 'इम्पॅक्ट फॅक्टर' बाजारात आणले. पैसे भरून हवा तो 'इम्पॅक्ट फॅक्टर' मिळू लागला.

> **संशोधनाचा संबंध संशोधकांच्या वा शिक्षकांच्या नियुक्तीसाठी व पदोन्नतीसाठी लावल्याने संशोधनाचे व्यापारीकरण झाले आहे. दर्जाहीन आत्मा हरवलेले संशोधन प्रसिद्ध करणारी बोगस जर्नल्स, खोटी सायटेशन्स आणि 'इम्पॅक्ट फॅक्टर' हे मानवाच्या अधोगतीचे लक्षण आहे.**

एकूणच काय तर जास्त सायटेशन्स मिळवण्यासाठी लेखक, संशोधक, प्रकाशक यांच्यात चुरस लागली. प्रकाशकांनी आपल्या अंकात प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधांना 'साइट' करण्यासाठी पैसे देण्यास सुरुवात केली. संपादकीय मंडळावरील सदस्य संशोधकांना त्यांचे पेपर्स संदर्भयादीत समाविष्ट करावेत असा आग्रह धरू लागले. संशोधकांनी एकमेकांचे शोधनिबंध बादरायण संबंध लावून संदर्भयादीत द्यायला सुरवात केली. उद्देश एकच, जास्त सायटेशन्स मिळवणे! उत्तम दर्जा असलेल्या जर्नल्समधूनही कळत नकळत बनावट माहितीच्या आधारे तयार केलेले पेपर्स प्रसिद्ध होतात व हे उघडकीस आल्यानंतर मागे (रिट्रॅक्ट) घेतले जातात; परंतु अशा शोधनिबंधांनाही सायटेशन्स मिळतात!

लवकरात लवकर पेपर प्रसिद्ध करण्यासाठी कम्प्युटरचा वापर अनिवार्यच. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून रिसर्च पेपर्स तयार होऊ लागले. तर काही तज्ज्ञांचा कंपू भरपूर पैसे घेऊन असे पेपर लिहून देतो. रिसर्च पेपर तयार करून देणाऱ्या अनेक कंपन्या जगभरात अवतरल्या आहेत. या सर्वांना 'पेपर मिल्स' म्हणतात. 'पेपर मिल्स'नी तयार केलेले रिसर्च पेपर्स प्रथितयश सायटेशन डेटाबेसमध्ये इंडेक्स असलेल्या जर्नलमध्येही प्रकाशित झालेले आढळून येतात. असे पेपर वाचले तर लक्षात येते, की यात असंबद्ध असे काहीही छापलेले असते.

प्रथितयश प्रकाशकांनी गेल्या दोन दशकांपासून 'गोल्ड ओपन ॲक्सेस' असे प्रकाशनाचे मॉडेल बाजारात आणले आहे. यात संशोधकाला पेपर प्रकाशित करण्यासाठी लेख प्रक्रिया शुल्क द्यावे लागते. हे शुल्क जरी पेपरचे 'पीअर रिव्ह्यू' झाल्यानंतरच स्वीकारलेले असले, तरी ते खूपच म्हणजे दीड ते वीस लाख रुपये किंवा याहून अधिक असते. यात वाचकांना पेपर विनासायास वाचायला मिळतात व त्यामुळे असे वाटते की पेपर्सना खूप सायटेशन्स मिळतील आणि जर्नलचा 'इम्पॅक्ट फॅक्टर' वाढेल; अजून हे पुरेसे सिद्ध झालेले नाही. मात्र, यामुळे संशोधनाचे व्यापारीकरण होते हे नक्की. या सर्वांत कला, भाषा, समाजशात्र या विषयांतील संशोधकांची अडचण होते; कारण या विषयातील जर्नल्स विज्ञान विद्याशाखेपेक्षा कमीच असतात. शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक जे ललित कला शिकवतात त्यांची कला, सादरीकरण, शिष्यांना घडवणे याला महत्त्व न देता त्यांनादेखील पदोन्नतीसाठी पेपर्स लिहावे लागतात. मग बनावट नियतकालिके असतातच. खरे तर या विषयातील संशोधकांच्या कलाकृतींसाठी वेगळे निकष असावेत.

वास्तविक गरज ही संशोधनाची जननी आहे. करोनाकाळ आपण सर्वांनी अनुभवला. रोज नव्या शोधाबद्दल माहिती मिळत होती. हजारो पेपर अनेक जर्नल्समधून प्रसिद्ध झाले. बरेच बोगस संशोधन प्रसिद्ध झाल्यानंतर मागे घेतले गेले. मानवाच्या आरोग्यास यांचा धोका तर आहेत; परंतु अशा लिखित संशोधनातून पुढील पिढ्यांसाठी काय जतन केले जाते, याचा विचार करायला हवा. त्यामुळे संशोधनाचा दर्जा महत्त्वाचा. दर्जाहीन आत्मा हरवलेले संशोधन व ते छापणारी बोगस जर्नल्स, मुद्दाम तयार केलेली सायटेशन्स व खोटे 'इम्पॅक्ट फॅक्टर' हे सर्व मानवाच्या प्रगतीचे नव्हे, तर अधोगतीचे लक्षण आहे.

**(लेखिका सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयशास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापक आहेत.)**

Maharashtra Times 12.10.2022

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

पुढारी

# महाविद्यालयांना स्वायत्ततेसाठी आता थेट अर्ज करता येणार

## हरकती-सूचनांसाठी २५ ऑक्टोबरची मुदत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशभरातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या स्वायत्त दर्जाच्या नियमांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) बदल केला आहे. त्याअंतर्गत आता संलग्न महाविद्यालये शैक्षणिक आणि प्रशासकीय स्वायत्ततेसाठी यूजीसीकडे थेट अर्ज करू शकणार असून, स्वायत्ततेच्या नव्या नियमावलीवर २५ ऑक्टोबरपर्यंत हरकती-सूचना नोंदवता येणार आहेत.

महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याबाबतच्या नव्या नियमावलीला यूजीसीकडून मान्यता देण्यात आली. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोग (महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा देणे आणि स्वायत्त महाविद्यालयांमध्ये मानके राखण्यासाठीचे उपाय) नियमावली २०२२ हा नव्या नियमावलीचा मसुदा यूजीसीकडून प्रसिद्ध करण्यात आला. स्वायत्ततेसाठीच्या पात्रतेमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. अनुदानित, विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित, खासगी असे कोणतेही महाविद्यालय स्वायत्ततेसाठी अर्ज करू शकते. मात्र महाविद्यालयाला किमान दहा वर्षे झालेली असणे आवश्यक आहे. तसेच महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेची (नॅक) किमान 'अ' श्रेणी, किमान तीन अभ्यासक्रमांचे किमान ६७५ गुणांसह राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून (नॅब) मूल्यांकन झालेले असणे बंधनकारक आहे. स्वायत्ततेच्या निकषांची पूर्तता करत असलेल्या आणि स्वायत्त दर्जा घेऊ इच्छित असलेली महाविद्यालये यूजीसीच्या संकेतस्थळावरील अर्ज वर्षभरात केव्हाही भरू शकतात, असे नियमावलीत स्पष्ट करण्यात आले आहे. २०१८च्या नियमावलीमध्ये महाविद्यालयाला विद्यापीठाकडे अर्ज करावा लागत होता, तो अर्ज विद्यापीठाकडून यूजीसीला सादर केला जात होता.

Pune Edition
Oct 12, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# तासिका तत्त्वावरील अध्यापकांचे मानधन दिवाळीपूर्वी मिळणार

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे निर्देश

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील तासिका तत्त्वावर कार्यरत अध्यापकांचे मानधन दिवाळीपूर्वीच द्यावे, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी दिले. येत्या २१ ऑक्टोबरच्या अगोदर थकीत मानधान द्यावे, असे त्यांनी सांगितले आहे.

राज्यातील तासिका तत्त्वावर कार्यरत अध्यापकांचे मानधन वेळेत देणे आवश्यक आहे. परंतु काही महाविद्यालय त्यांचे मानधन वेळेत देत नाहीत अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारीची तातडीने दखल घेऊन दिवाळीपूर्वी २१ ऑक्टोबर२०२२ पर्यत त्यांच्या थकीत मानधन देण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले. संबंधित उच्च व तंत्र शिक्षण विभागीय सहसंचालक यांनी आढावा घेऊन अध्यापकांचे मानधन दिवाळीपूर्वी मिळेल याकडे लक्ष द्यावे, असेही पाटील यांनी म्हटले आहे.

Pune Edition
Oct 12, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

लोकमत

### आता महाविद्यालयेच ठरविणार अभ्यासक्रम

#### सुधारित नियमांना यूजीसीची मंजुरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**जयपूर** : महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याविषयीच्या सुधारित नियमांना केंद्रीय विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता देशभरातील मान्यताप्राप्त महविद्यालये नवीन अभ्यासक्रम तयार करणे, सध्याच्या अभ्यासक्रमांचे पुनरावलोकन करून पुनर्रचना करणे, परीक्षा निकाल आणि विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनासाठी नवीन पद्धती अवलंबणे, आदी गोष्टी आपल्या स्तरावर करू शकतील. याशिवाय आरक्षणाच्या नियमानुसार प्रवेशाचे नियमही तयार करू शकतील.

शुल्क ठरविण्याचा अधिकारही महाविद्यालयांनाच देण्यात आला आहे. त्याअंतर्गत आता संलग्न महाविद्यालये शैक्षणिक आणि प्रशासकीय स्वायत्ततेसाठी यूजीसीकडे थेट अर्ज करू शकणार असून, स्वायत्ततेच्या

> सुधारित नियमांमुळे महाविद्यालयांना स्वतंत्र कामकाज करण्यात मदत मिळेल. नव्या शिक्षणविषयक धोरणांचे उद्दिष्ट साध्य करण्यासही मदत होणार आहे. सर्व संबंधितांचा अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर या नियमांना अंतिम रूप देण्यात येईल.
>
> \- **प्रा. एम. जगदीशकुमार,** अध्यक्ष, यूजीसी

नव्या नियमावलीवर २५ ऑक्टोबरपर्यं हरकती- सूचना नोंदवता येतील सुधारित नियमांमुळे महाविद्याल आणि विद्यार्थ्यांना फायदा होईल, अस दावा करण्यात आला आहे.

स्वायत्त महाविद्यालयांची देखरेख करण्यासाठी आयक्यूएसी से बनविण्यात येईल. त्याच अहवाल वेबसाइटवर जाहीर करण्या येणार आहे.

Pune Main
Page No. 9 Oct 12, 2022
Powered by: erelego.com

### पाच उच्च शिक्षण संस्था जागतिक विद्यापीठ क्रमवारीत

**पुणे** : 'टाइम्स हायर एज्युकेशन'तर्फे जागतिक विद्यापीठ क्रमवारी २०२३ जाहीर करण्यात आली. क्रमवारीतील पहिल्या पाचशे विद्यापीठांमध्ये देशातील केवळ पाच संस्थांनाच स्थान मिळवता आले आहे. तर राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबईतील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (आयसर पुणे), पुण्यातील सिम्बायोसिस विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ यांचा पहिल्या दीड हजार उच्च शिक्षण संस्थांमध्ये समावेश आहे.

'टाइम्स हायर एज्युकेशन'ची जागतिक विद्यापीठ क्रमवारी ही प्रतिष्ठेची मानली जाते. यंदा या क्रमवारीसाठी १०४ देशांतील १ हजार ७९९ विद्यापीठांनी सहभाग घेतला. क्रमवारीमध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठ पहिल्या स्थानी, हार्वर्ड विद्यापीठ दुसऱ्या स्थानी आणि केंब्रिज विद्यापीठ आणि स्टॅनफर्ड विद्यापीठ संयुक्तरीत्या तिसऱ्या स्थानी आहेत. बेंगळुरूची इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ही देशातील एकमेव संस्था पहिल्या ३५० संस्थांमध्ये स्थान मिळवू शकली. तर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्ससह जेएसएस ॲकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन अँड रीसर्च, शूलिनी जैवतंत्रज्ञान आणि व्यवस्थापनशास्त्र विद्यापीठ, अलगप्पा विद्यापीठ, महात्मा गांधी विद्यापीठ या पाच संस्थांनाच पहिल्या पाचशे संस्थांमध्ये स्थान मिळाले.

**पुणे विद्यापीठाचे स्थान उंचावले...**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्थान गेल्या वर्षीच्या तुलनेत उंचावले. गेल्यावर्षी ८०० ते १००० या गटात असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ६०१ ते ८०० या गटात स्थान मिळवले. मुंबई विद्यापीठ गेल्यावर्षीच्या १००० ते १२०० या गटातून घसरून यंदा १२०१ ते १५०० या गटात गेले.

लोकसत्ता Thu, 13 October 2022
https://epaper.loksatta.com/c/7

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

लोकमत

# अकरावी प्रवेशासाठी उरले तीन दिवस

## अद्याप ३३ हजार जागा रिक्त : सहा फेऱ्या पूर्ण; शनिवारी अखेरची संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अकरावीच्या आतापर्यंत सहा प्रवेश फेऱ्या झाल्या आहेत. आताच्या दैनंदिन गुणवत्ता फेरी अर्थात सतत विशेष फेरीला येत्या १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरीही आत्तापर्यंत ७८ हजार ४९६ विद्यार्थ्यांनी विविध महाविद्यालयात आपले प्रवेश निश्चित केले आहेत. तर प्रवेशासाठी अद्यापही ३३ हजार २५४ जागा उपलब्ध आहेत. प्रवेशासाठी तीन दिवस उरले असून विद्यार्थ्यांना १५ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

पुणे, पिंपरी- चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील अकरावीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत आहेत. आतापर्यंत तीन नियमित व तीन विशेष प्रवेश फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले. तरीही अजून काही विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतिक्षेत आहेत. या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी दैनंदिन गुणवत्ता फेरी अर्थात सतत विशेष फेरी सुरू करण्यात आली आहे. सुरुवातीला फेरीला ३० सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती; परंतु, विद्यार्थ्यांनी अपेक्षित प्रतिसाद दिला नसल्याने ही मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत वाढवली. प्रवेशासाठी निवड होऊनही प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयासाठी पूर्ण फेरीदरम्यान प्रतिबंधित केले जाते. प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांचा पुढील दिवसाच्या फेरीसाठी विचार केला जातो. त्याचबरोबर प्रवेश नाकारलेल्या विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयासाठी प्रतिबंधित केले जाणार आहे. तसेच त्यांना यापुढे प्रवेश रद्द करण्याची परवानगी असणार नाही.

विशेष फेरी १५ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहील. सुट्टीचे दिवस केवळ अर्ज करण्यासाठी वापरले जाणार असून कोटा आणि द्विलक्षी प्रवेश प्रक्रिया नेहमीप्रमाणे सुरू आहे.




### अकरावी प्रवेश प्रक्रिया दृष्टीक्षेपात

| | |
|---|---|
| एकूण महाविद्यालये | ३१८ |
| एकूण प्रवेशक्षमता | १,११,७५० |
| एकूण नोंदणी | १,०७,८४३ |
| कोटा प्रवेशक्षमता | १५,४४३ |
| कोटांतर्गत प्रवेश | १०,१५१ |
| कॅप प्रवेशक्षमता | ९६,३१७ |
| कॅपअंतर्गत अर्ज | ७६,०४९ |
| एकूण प्रवेश | ७८,४९६ |
| **रिक्त जागा** | ३३,२५४ |

### ...तर कारवाई

दुबार प्रवेश घेणारे अथवा जाणीवपूर्वक जागा अडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत कडक कारवाई केली जाईल, असेदेखील उपसंचालक कार्यालयातून सांगण्यात आले आहे.

Pune Main
Page No. 4 Oct 13, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

सकाळ

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग : महाविद्यालयांना सूचना

# 'नॅक' मूल्यांकन करावे

पुणे, ता. १२ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालय स्तरावर मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करण्याच्या सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे देण्यात आल्या आहेत. शैक्षणिक गुणवत्ता आणि दर्जा धारण करण्यासाठी दर पाच वर्षांनी राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेकडून (नॅक) मूल्यांकन करून घेण्यात येते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानेही महाविद्यालयांना यासंबंधीचा अहवाल विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता व सिद्धताकक्षाकडे तसेच शासनाकडे सादर करण्याचे आवाहन केले आहे. एनईपी २०२०च्या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावरील अभ्यासक्रम, बहुविद्याशाखीय शिक्षण, कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम, परीक्षा मूल्यमापन, अध्ययन अध्यापन आणि स्वायतत्ता आदी विषयांच्या बाबतीत आमूलाग्र बदल आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून महाविद्यालयांचे हे मूल्यांकन होणार आहे. पुढील सहा महिन्यात मूल्याकनांनुसार अपेक्षीत दर्जा प्राप्त करून घेणे महाविद्यालयांना बंधनकारक आहे.



"शासनाने प्राध्यापकांची रिक्त पदे भरली आणि आर्थिक बाजूवर महाविद्यालयांना बळ पुरविले तर निश्चितच नॅक मूल्यांकनाला त्याचा फायदा होईल. नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर प्राचार्यांपासून ते सेवकांपर्यंत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने दिशानिर्देशन वजा सूचना परिपत्रके आल्यास महाविद्यालये मुल्यांकनात भरीव कामगिरी करतील.

- डॉ. एन. एस. उमराणी, प्राचार्य,
गरवारे वाणिज्य महाविद्यालय (माजी प्र-कुलगुरू, एसपीपीयू)

### काय असते नॅक?

शैक्षणिक संस्थेचा दर्जा आणि गुणवत्ता ओळखण्यासाठी मूल्यांकन महत्त्वाचे मानले जाते. हे मूल्यांकन कोणत्याही शैक्षणिक संस्था किंवा विद्यापीठ प्रमाणन एजन्सीद्वारे निश्चित केलेल्या गुणवत्तेची पातळी ठरवते. संस्थेची शैक्षणिक कामगिरी, अभ्यासक्रमाची निवड आणि अंमलबजावणी, शैक्षणिक दर्जा आणि मूल्यमापन, विद्यार्थ्यांचे निकाल, संशोधन कार्य आणि विद्याशाखा सदस्यांचे प्रकाशन, मूलभूत सुविधा आणि संसाधनांची स्थिती, संस्था, प्रशासन, आर्थिक स्थिती आणि विद्यार्थी सेवा इत्यादीची नोंद घेतली जाते.

### नॅकची उद्दीष्टे

1. शैक्षणिक संस्थांचे मूल्यमापन आणि दर्जा निश्चित करणे
2. अध्यापन शिक्षण, संशोधनाला प्रोत्साहन देणे
3. स्वयंमूल्यमापनावर आधारित नवकल्पनांना प्रोत्साहन देणे, प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे

Pune, Main
13/10/2022 Page No. 2

सकाळ

# पुणे विद्यापीठाची क्रमवारी सुधारली

पुणे, ता. १२ : द टाइम्स हायर एज्युकेशन क्रमवारीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यंदा सुधारणा केली आहे. गेल्या वर्षी ८०१ ते १००० व्या क्रमवारीत असलेल्या विद्यापीठाने यंदा ६०१-८०० या क्रमवारीच्या गटात स्थान मिळविले आहे. यंदाही बेंगळूरच्या भारतीय विज्ञान संस्थेने (आयआयएससी) पहिल्या ३०० क्रमांकामध्ये स्थान पटकावले आहे.

भारतीय तंत्रज्ञान संस्था आर्थात आयआयटींपैकी काही नामांकित संस्थांनी सहभागी होण्यास नकार दिल्याने, आयआयटी रोपरला ५०१-६०० या क्रमवारीत स्थान मिळाले आहे. द टाइम्स हायर एज्युकेशन रँकिंग जाहीर झाली असून, त्यात पुणे विद्यापीठाच्या गुणांकनामध्ये वाढ झाली आहे. या पूर्वी, २०१९ सालामध्ये विद्यापीठाला ५०१-६०० या क्रमवारीत स्थान मिळाले आहे. भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था पुणेचे (आयसर) गुणांकन घसरले असून, यंदा आयसर पुणेला १००१-१२०० या क्रमवारीत स्थान मिळाले आहे. गेल्या वर्षी आयसरला ८०१-१००० या क्रमवारीत स्थान मिळाले होते.

पुणे विद्यापीठाने बनारस हिंदू युनिव्हर्सिटी, दिल्ली टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी, ग्राफिक एरा युनिव्हर्सिटी, आयआयटी इंदूर, इंद्रप्रस्थ इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, जामिया हमदर्द युनिव्हर्सिटी, जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अशा विद्यापीठांच्या श्रेणीत स्थान मिळवले आहे. पुणे विद्यापीठानंतर अण्णा युनिव्हर्सिटी आणि अलिगड मुस्लिम विद्यापीठाचा क्रमांक आहे.

### द टाइम्स उच्च शिक्षण क्रमवारी

- स्थान पटकाविणाऱ्या देशातील शिक्षणसंस्था : ७५
- जगातील पहिल्या पाच शैक्षणिक संस्था : युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफोर्ड, हॉवर्ड युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिटी ऑफ केंब्रिज, स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी, एमआयटी (अमेरिका)
- भारतीय विज्ञान संस्था बंगळूरची क्रमवारी : २५१-३००

Pune, Main
13/10/2022 Page No. 2

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

**सामना**

# टाइम्स रँकिंगमध्ये विद्यापीठ सहाशे ते आठशेच्या गटात

## कोविडनंतर विद्यापीठाचे रँकिंग पूर्वपदावर; २०० रँकिंगने अलीकडचे स्थान

पुणे, दि. १३ (प्रतिनिधी) – 'द टाइम्स हायर एज्युकेशन २०२३' क्रमवारीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दोनशे क्रमांकाने अलीकडचे स्थान मिळवत ६०१ ते ८०० गटात स्थान मिळवले आहे.

'द टाइम्स हायर एज्युकेशन' या क्रमवारीत दरवर्षी जगातील अनेक विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन करून त्यांची क्रमवारी जाहीर करण्यात येते. २०२३ या वर्षात जगातील १०४ देशांतील २ हजारांपेक्षा जास्त विद्यापीठांचे मूल्यांकन करत १७९९ विद्यापीठांची क्रमवारी जाहीर करण्यात आली आहे. या मूल्यांकनात प्रामुख्याने अध्यापन, संशोधन, ज्ञानप्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभाग आदी निकष तपासले जातात.

कोविड काळात आजाराची भीती, आंतरराष्ट्रीय वाहतूक आदी कारणांमुळे विद्यापीठांतील परदेशी विद्यार्थी संख्येवर परिणाम झाला होता. मात्र, आता कोविड नंतर परिस्थिती पुन्हा पूर्वपदावर आली असून, विद्यापीठाने आपले स्थान पुन्हा प्राप्त केले आहे.

**आजवरचे वर्ष आणि रँकिंग**

| | |
|---|---|
| २०२० | ६०१-८०० |
| २०२१ | ६०१-८०० |
| २०२२ | ८०१-१००० |
| २०२३ | ६०१-८०० |

"सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची क्रमवारी उंचवण्यात विद्यापीठातील संशोधक, प्राध्यापक, सर्व कर्मचारी यांचे परिश्रम आहेत, हे सामुदायिक योगदान आहे. भविष्यातील विद्यापीठाच्या वाटचालीचा आराखडा तयार केला असून, सर्वांनी मिळून भविष्यातील उद्दिष्टे गाठण्यास प्रयत्न सुरू केले आहेत. भविष्यातही विद्यापीठ अशीच प्रगती करेल, अशी मला खात्री आहे.

**– डॉ. कारभारी काळे,**
कुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

"विद्यापीठाच्या कामाला मिळालेली ही पावती आहे असे मला वाटते. विद्यापीठात मोठ्या प्रमाणात संशोधनाचे काम करणारे प्राध्यापक, विद्यार्थी, यापूर्वीचे कुलगुरू आणि अधिकार मंडळे, प्रशासनातील सहकारी या सर्वांच्या मेहनतीचे हे फळ आहे. पुढील काळात अधिक प्रगती करण्यासाठी आपण सर्वच प्रयत्नशील आहोत.

**– डॉ. संजीव सोनवणे,**
प्र- कुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.



Pune Edition
Oct 14, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

### SPPU ranks 601-800 in 'Times Higher Education 2023' evaluation

*Pune:* The Savitribai Phule Pune University (SPPU) has been ranked 601-800 group in the latest 'Times Higher Education 2023' evaluation. The number of foreign students in the University was affected due to the pandemic, international transport etc. The situation is back to normal and the university has regained its position.

SPPU was placed in same ranking group in 2020 and 2021. In 2022, it slipped in the 800-1,000 group. "The efforts of the researchers, professors and all the employees of the university in raising the ranking of SPPU is a community contribution. A plan has been prepared for the future course of the university and everyone has started efforts to achieve the goals," said Karbhari Kale, Vice-Chancellor at SPPU. **ENS**

Hindustan Times 14.10.2022

### History paper did not leak, says UGC

| Yashpal Sonkamble yashpal@punemirror.com

TWEET @YashPune_Mirror

The University Grant Commission (UGC) and National Testing Agency (NTA) have officially announced that the NET history shift-II paper did not leak, bringing a huge relief to the aspirants. Clearing the test qualifies the candidates for PhD, besides making them eligible for assistant professors' posts.

The exam was conducted on October 10 and the candidates launched a protest two days later, as rumours about the paper leak spread like wildfire on social media.

Mirror had also sent a query on the official e-mail address of UGC and NTA on Wednesday, but did not receive any reply till going to the press. However, the NTA published a circular on the UGC official Twitter handle later at night.

The NTA circular has stated that people should be careful about fake messages circulating on social media and not believe in them without confirming things.

The affected parties say that the NTA-UGC clarification came a little too late. Thanking *Mirror* for highlighting the issue, professor Nitin Ghope, state coordinator of Shikshan Kranti Organisation, said, "If a candidate takes a dangerous step, who will be responsible?," he said.

Professor Suresh Deodhe-Patil, state coordinator, NET-SET, PhD Holder Sangharsh Committee Maharashtra State, said, "Had these officials taken serious cognisance and immediately issued a clarification, the fake news would not have gone viral."

Dr Sadhana Parashar, senior director of UGC Exams, said the UGC has clarified that all fake tweets and YouTube videos are circulating on social media regarding leakage of history (06) paper shift-II. "The NTA vehemently denies these allegations. The format was circulated on social media well after the conduct of the examination." Parashar added.

Pune Mirror 14.10.2022

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

### संपूर्ण शुल्कमाफी निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करावी

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोनामुळे आईवडील, पालक गमावल्याने अनाथ झालेल्या विद्यार्थ्यांना संपूर्ण शुल्कमाफी देण्याच्या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. त्यामुळे शासनाच्या निर्णयाची अंमबजावणी करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संस्थांना आता शुल्कमाफीबाबत कार्यवाही करावी लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

करोनामुळे आई-वडील, पालकांचा मृत्यू झाला झालेल्या अशा विद्यार्थ्यांचे पदवी/पदव्युत्तर शिक्षण अर्धवट राहू नये किंवा ते विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांचे संपूर्ण शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. मात्र काही संस्थांकडून शुल्कमाफी देण्यास टाळाटाळ करत असल्याचे प्रकार निदर्शनास आले होते.

या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकात पाटील यांनी संपूर्ण शुल्कमाफीच्या निर्णयाची यावर्षीही काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. विद्यार्थिहित लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडू नये किंवा त्याचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, या दृष्टीने विद्यापीठे, अनुदानित महाविद्यालय यांनी विशेष लक्ष देण्याबाबत पाटील यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता Fri, 14 October 2022 https://epaper.loksatta.com

पुढारी

### यंदा अकरावीच्या ३३ हजारांवर जागा राहणार रिक्त

प्रवेशाचा आज शेवट ; ७८ हजार ६२७ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

दैनंदिन गुणवत्ता फेरी अर्थात सतत विशेष फेरीचा आज (दि. १५) शेवटचा दिवस आहे. त्यामुळे अकरावी प्रवेशाचा आजच शेवट होण्याची शक्यता आहे. आत्तापर्यंत ७८ हजार ६२७ विद्यार्थ्यांनी विविध महाविद्यालयात आपले प्रवेश निश्चित केले आहेत. तरी देखील यंदा ३३ हजारांवर जागा रिक्तच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.




राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र, तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील अकरावीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आले. प्रवेशासाठी तीन नियमित व तीन विशेष प्रवेश फेऱ्या राबविण्यात आल्यानंतर प्रवेशासापासून वंचित विद्यार्थ्यांसाठी दैनंदिन गुणवत्ता फेरी, अर्थात सतत विशेष फेरी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांना दररोज प्रवेश घेण्याची संधी देण्यात आली. त्यासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु अकरावी प्रवेशाला यंदा विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यातुलनेत यंदा आयटीआय आणि दहावीनंतरच्या तंत्रशिक्षण डिप्लोमाला विद्यार्थ्यांचे प्रवेश वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.

**अकरावी प्रवेश प्रक्रिया दृष्टिक्षेपात**

**एकूण महाविद्यालये** - ३१८
**एकूण प्रवेशक्षमता** - १११७५०
**एकूण नोंदणी** - १०७८४३
**कोटा प्रवेशक्षमता** - १५४१८
**कोटांतर्गत प्रवेश** - १०१७२
**कॅप प्रवेशक्षमता** - ९६३३२
**कॅप अंतर्गत अर्ज** - ७६०४९
**एकूण प्रवेश** - ७८६२७
**रिक्त जागा** - ३३१२३

My Pune Edition
Oct 15, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

# स्वायत्त विभागाचीच शुल्कवाढ

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाचे स्पष्टीकरण

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात असलेल्या स्वायत्त विभागांचे परीक्षा शुल्क वाढवण्यात आले आहे. या शुल्कवाढीचा विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाशी कोणताही संबंध नाही,' असे स्पष्टीकरण विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून देण्यात आले आहे. परीक्षा मंडळाच्या अंतर्गत असलेले विभाग आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये परीक्षेचे कसलेही शुल्क वाढलेले नाही, असेही परीक्षा मंडळाकडून अधोरेखित करण्यात आले आहे.



**"परीक्षा व मूल्यमापन मंडळाने गेल्या पाच वर्षांपासून परीक्षा शुल्कामध्ये एकही रुपयाची वाढ केलेली नाही. या वर्षीही वाढ होणार नाही. शुल्कवाढ परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या अधिकारात नसलेल्या विभागांकडून करण्यात आली आहे. यामुळे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी संघटनांनी याची दखल घ्यावी.**

– **डॉ. महेश काकडे**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**शुल्कवाढ न करण्याच्या सूचना**

'परीक्षा मंडळाने परिपत्रक काढून याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. परीक्षा मंडळांतर्गत येणाऱ्या सर्व विभाग आणि संलग्न महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये आकारण्यात आलेले परीक्षा शुल्कच आकारावे,' असे या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. 'कोणत्याही प्रकारची शुल्कवाढ करू नये,' अशा सूचनाही देण्यात आल्याने आता परीक्षा मंडळांतर्गत येणारी महाविद्यालये आणि विद्यापीठातील काही विभागांमध्ये शुल्कवाढ होणार नाही.

**यामुळे शुल्कवाढीचा तिढा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अनेक विभागांनी स्वायत्ततेचा दर्जा प्राप्त केला आहे. या विभागांमधील शुल्कनियमन हे परीक्षा मंडळाकडे नसून, संबंधित विभागच शुल्क निश्चिती करतात. त्यामुळे सध्या शुल्कवाढीचा तिढा निर्माण झाला आहे. या विभागांच्या वाढलेल्या शुल्काशी परीक्षा मंडळाचा कसलाही संबंध नाही, असेदेखील परीक्षा मंडळाने स्पष्ट केले आहे.

**शुल्कवाढीविरोधात 'मनविसे'चे आंदोलन**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेल्या शुल्कवाढीच्या विरोधात सातत्याने आंदोलने सुरू आहेत. शुक्रवारी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेतर्फेही शुल्कवाढीच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. 'मागेल त्या विद्यार्थ्याला वसतिगृह तातडीने देण्यात यावे,' अशीही मागणीही या वेळी 'मनविसे'कडून करण्यात आली. 'मनविसे' शहराध्यक्ष अमोल शिंदे आणि उपशहराध्यक्ष धनंजय दळवी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले.

**अनेक विभागांवर नियंत्रण नाही**

परीक्षा मंडळाच्या या स्पष्टीकरणामुळे आता विद्यापीठातील अनेक विभागांवर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचा कोणतेही नियंत्रण राहिले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यापीठाच्या घटनेत परीक्षा मंडळानेच सर्व विभागांच्या परीक्षा घेणे आणि त्यांचे शुल्क ठरवणे, असा नियम असतानाही केवळ स्वायत्ततेच्या नावाखाली अनेक विभागांनी शुल्कनिश्चिती नव्याने केली असून, यामुळे विद्यार्थ्यांच्या खिशाला कात्री बसत आहे.

Maharashtra Times 15.10.2022

**पुढारी**

# प्राध्यापक भरतीच्या हालचाली गतिमान

**मुंबई :** राज्यातील प्राध्यापकांच्या ८ हजार ९४९ रिक्त पदांपैकी ४० टक्के रिक्त पदे भरण्याबाबत उच्च शिक्षण संचालकांनी आवश्यक सर्व कागदपत्रांसह पदभरती ना हरकत प्रमाणपत्रासाठीचे प्रस्ताव विहित पद्धतीने सादर करण्याचे आदेश सर्व विभागीय संचालकांना दिले आहेत. गेल्या ३ नोव्हेंबर २०१८ रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शासन निर्णय जारी करत अनुदानित महाविद्यालयामधील एकूण ८ हजार ९४९ रिक्त पदांपैकी ४० टक्के म्हणजेच ३ हजार ५८० पदे भरण्यास मान्यता दिली होती. त्यानुसार संपूर्ण राज्यात नोव्हेंबर २०१८ ते सप्टेंबर २०१९ या काळात १ हजार ४९२ पदे भरण्यात आली. त्यानंतर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पदभरतीवर निर्बंध आणले गेले होते.

Pune Edition
Oct 17, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

सकाळ

### शिक्षण विभाग : तासिका तत्त्वावरील अध्यापकांबाबत निर्णय

# नियुक्तीची कार्यपद्धत निश्चित

पुणे, ता. १७ : बहुप्रतीक्षित असणारी तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीसाठीची कार्यपद्धती राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निश्चित केली आहे. त्यानुसार, या अध्यापकांना त्यांचे मानधन संबंधित महाविद्यालयामार्फत थेट बँक खात्यात जमा करण्याचे आणि पूर्णवेळ रिक्त पदासाठी दोनच तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नेमणुका करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत.

नेट-सेट, पीएच.डी धारक संघर्ष समितीच्या विविध मागण्यांबाबत तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली २७ जून २०२१ रोजी पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली होती. त्यात 'तासिका तत्त्वाच्या धोरणात सुधारणा करण्यासाठी उच्च शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात यावी,' असे आदेश मंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार या धोरणाचा आढावा घेऊन, नवीन पर्यायी धोरणाबाबत सरकारला शिफारस करण्यासाठी १० ऑगस्ट २०२१च्या शासन निर्णयानुसार उच्च शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली. या समितीने राज्य सरकारसमोर २१ फेब्रुवारी २०२२ ला अहवाल सादर केला. त्यात तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या धोरणासंदर्भात नऊ शिफारशी करण्यात आल्या. त्यात या अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या शैक्षणिक अर्हता धारण करणे आणि तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीसाठी कार्यपद्धती करणे, या शिफारशी सरकारने मान्य केल्या आहेत. त्यानुसार कार्यपद्धती संदर्भातील अध्यादेश शिक्षण विभागाने काढला आहे.

यामध्ये शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासून या अध्यापकांच्या सेवा उपलब्ध होऊन शैक्षणिक कामकाज सुरळितपणे पार पाडता यावे, यासाठी या अध्यापकांची प्रत्येक वर्षी नियुक्ती करण्यासंदर्भात कार्यपद्धती निश्चित केली आहे.

### अशी असेल कार्यपद्धती

- मानधन वेळेवर देण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता आवश्यक
- मानधन संबंधित महाविद्यालयामार्फत थेट बँक खात्यात जमा होणार
- एका अध्यापकाकडे जास्तीत जास्त नऊ तासिकांचा सोपविणार कार्यभार
- अध्यापक म्हणून नियुक्तीसाठी विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य सरकारनुसार अर्हता बंधनकारक
- नियुक्ती ही शैक्षणिक वर्षासाठी मर्यादित

**तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी कार्यपद्धती निश्चित करण्यासंदर्भात निर्णय जाहीर झाला. निर्णयात प्राध्यापकांना निश्चित रक्कमेचे दरमहा मानधन मिळण्याची शाश्वती अपेक्षित होती. पण त्याबाबत स्पष्टता करण्यात आलेली नाही. त्याशिवाय तासिका ही नेमकी कशाप्रकारे ग्राह्य धरण्यात येणार, हेही सांगण्यात आलेले नाही. या प्राध्यापकांची त्याच महाविद्यालयांमध्ये पुनर्नियुक्ती करायची असल्यास नव्याने कार्यपद्धती राबविण्यात येऊ नये, असे म्हणणे होते, परंतु ते नाकारण्यात आले आहे.**

**– प्रा. सुरेश देवढे पाटील,** राज्य समन्वयक, नेट-सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समिती

Pune, Main
18/10/2022 Page No. 2

# News Paper Clippings During October 2022

## Section: Education

सकाळ

# 'तासिका' अध्यापकांची दरवर्षी नियुक्ती

### उच्च व तंत्र शिक्षण विभागाची कार्यपद्धती निश्चित; आरक्षण असणार नाही

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १७ : तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीसाठी राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाने सोमवारी कार्यपद्धती निश्चिती केली. त्यानुसार तासिका तत्त्वावरील अध्यापकांची नियुक्ती प्रत्येक वर्षी होणार आहे. मात्र महाराष्ट्र राज्य लोकसेवा अधिनियम २००१ तासिका तत्त्वावरील नियुक्त्यांना लागू नसल्याने अध्यापकांच्या नियुक्तीला आरक्षण लागू होणार नाही.

नेट-सेट, पीएच. डी. धारक संघर्ष समितीच्या विविध मागण्यांसाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात २७ जून २०२१ रोजी बैठक झाली होती. त्यामध्ये तासिका तत्त्वाच्या धोरणात सुधारणा करण्यासाठी उच्च शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार सहा सदस्यीय समितीने २१ फेब्रुवारी २०२२ रोजी अहवाल सादर केला.

### तासिका तत्त्व धोरण समितीच्या शिफारशी

- मानधनात वाढ करणे
- नियमित अध्यापकांप्रमाणे मानधन थेट बँक खात्यात जमा करणे
- शिल्लक कार्यभारावर तासिका तत्त्वानुसार नियुक्ती करणे
- विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणे
- तासिका तत्त्वाच्या सेवेच्या अनुभवाचे प्रमाणपत्र देणे

Pune, Main
18/10/2022 Page No. 8

सकाळ

# बारावीसाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**पुणे, ता. १७ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेसाठी नियमित विद्यार्थ्यांना सरल डेटाबेसवरून ऑनलाइन पद्धतीने नियमित शुल्काने अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. आता विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज ५ नोव्हेंबरपर्यंत भरता येणार आहेत.



राज्य शिक्षण मंडळाची बारावीची परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची 'www. mahahsscboard.in' या संकेतस्थळावर अर्ज भरण्याची कार्यवाही सध्या सुरू आहे. तसेच व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, आयटीआयचे विषय घेऊन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेचा अर्ज (आवेदनपत्रे) ऑनलाइन भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. नियमित विद्यार्थ्यांचा ऑनलाइन अर्ज सादर करण्याची मुदत २१ ऑक्टोबर रोजी संपत आहे. आता त्याला मुदतवाढ दिली आहे.

शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची नियमित विद्यार्थ्यांचे अर्ज सरल डेटाबेसवरून ऑनलाइन अर्ज उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत भरण्यात येतील. शाळा-महाविद्यालयांना चलन डाऊनलोड करून शुल्क भरण्यासाठी १९ ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबरपर्यंत मुदत दिली आहे. तर परीक्षा शुल्क आरटीजीएस/एनईएफटीद्वारे भरणा केल्याची पावती किंवा चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रीलिस्ट जमा करण्यासाठी शाळा-महाविद्यालयांना ११ नोव्हेंबरपर्यंत मुदत दिली आहे, असे राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी नमूद केले आहे.

Pune, Pune-Today
18/10/2022 Page No. 1

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

सकाळ

### प्रवेशप्रक्रिया : पुणे, पिंपरी-चिंचवडमधील १६,५०० विद्यार्थी प्रतीक्षेत

# अजूनही अकरावीच्या ३३ हजार जागा रिक्त

**पुणे, ता. १६ :** इयत्ता अकरावीची प्रवेशप्रक्रिया अंतिम टप्प्यात असतानाही प्रवेशाच्या तब्बल ३३ हजार ५८ जागा रिक्त असल्याचे दिसून येत आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील ३१८ कनिष्ठ महाविद्यालयांतील एक लाख ११ हजार ७५० जागांवर आतापर्यंत ७८ हजार ६९२ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत तर तब्बल १६ हजार ५७९ विद्यार्थ्यांनी अद्याप प्रवेश घेतलेला नसल्याची माहिती समोर येत आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील महाविद्यालयांमध्ये अकरावीच्या प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत एक लाख सात हजार ८५८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. परंतु प्रत्यक्षात ८२.५९ टक्के विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. उर्वरित १६ हजार ५७९ विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेत नोंदणी करूनही अद्याप प्रवेश निश्चित केलेला नाही.

या प्रवेश प्रक्रियेतील अंतिम टप्पा सध्या सुरू आहे. त्या अंतर्गत २७ सप्टेंबरपासून दैनंदिन गुणवत्ता फेरी सुरू झाली आहे. गेल्या सोळा दिवसांत दररोज विद्यार्थ्यांना महाविद्यालये मिळत होती आणि प्रवेश निश्चितीसाठी त्याचदिवसाची मुदत देण्यात येत होती. त्यानुसार या फेरीत आतापर्यंत तीन हजार १८० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

**जागा रिक्त राहण्यामागील कारणे**

- नोंदणी केलेल्या संख्येच्या तुलनेत प्रवेशासाठी उपलब्ध जागांची संख्या अधिक
- विद्यार्थ्यांचा आयटीआय प्रवेशाकडे वाढता कल
- पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांची पसंती

**मंडळनिहाय प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या**

| मंडळ | | प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| एसएससी | : | ६७,८९९ |
| सीबीएसई | : | ८,०९३ |
| आयसीएसई | : | २,१०६ |
| अन्य मंडळे | : | ५९४ |

**फेऱ्यांनिहाय प्रवेशाचा आढावा**

| फेऱ्या | उपलब्ध जागा | पात्र ठरलेले विद्यार्थी | महाविद्यालय मिळालेले विद्यार्थी | प्रवेश घेतलेले विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| नियमित फेरी | | | | |
| पहिली | ९६,३३९ | ६५,५१९ | ४२,६३८ | २४,९०४ |
| दुसरी | ७१,४२० | ४१,११५ | १७,०६२ | ७,२८० |
| तिसरी | ६४,१४० | ३८,६१५ | १२,२५३ | ४,५१७ |
| विशेष फेरी | | | | |
| पहिली | ५९,६२३ | २१,४१६ | २४,६२३ | ११,५०७ |
| दुसरी | ४०,११६ | ९,४१५ | ६,७३७ | ४,९५६ |
| तिसरी | ३५,१६० | ७,२२९ | ५,३९२ | ४,९५६ |

Pune, Main
17/10/2022 Page No. 2

सकाळ

# अकरावीसाठी गुरुवारपर्यंतच प्रवेश

**पुणे, ता. १६ :** इयत्ता अकरावीच्या प्रवेशप्रक्रियेत अजूनही काही विद्यार्थी प्रतीक्षेत असल्याचे दिसून येते. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी येत्या गुरुवारपर्यंत (ता. २०) दैनंदिन गुणवत्ता फेरी म्हणजेच सतत विशेष फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावीमध्ये प्रवेशासाठी ही अंतिम संधी असणार आहे.

राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयातर्फे पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह मुंबई, नाशिक, अमरावती, नागपूर महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या अंतर्गत प्रवेशाचा सध्या शेवटचा टप्पा सुरू आहे. इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या, तीन विशेष फेऱ्या आणि २६ सप्टेंबरपासून दैनंदिन गुणवत्ता विशेष फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. तरीही आणखी काही निवडक विद्यार्थी प्रवेशासाठी प्रतीक्षेत असल्याचे दिसून येत आहे. अकरावीचे प्रथम सत्र संपत आले असताना प्रवेशाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशाची अखेरची संधी मिळावी, म्हणून ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्याचे शिक्षण संचालनालयाने सांगितले आहे.

विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावीमध्ये प्रवेशासाठी ही अंतिम संधी असेल. त्याअंतर्गत कार्यवाहीचे टप्पेही संचालनालयाने प्रवेशाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केले आहे. यानंतर २०२२-२३ मधील प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईल आणि नवीन प्रवेशाची कार्यवाही बंद करण्यात येईल, असे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी स्पष्ट केले आहे.

**विद्यार्थी-पालकांसाठी सूचना**

- नवीन विद्यार्थ्यांसाठी स्टुडंट रजिस्ट्रेशन /नवीन नोंदणी सुरू असेल, पण ती केवळ १७ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहील.
- प्रवेश अर्जाचा भाग एक भरून प्रमाणित झालेल्या विद्यार्थ्यांना भाग दोन आणि महाविद्यालयांना पसंती देऊन फेरीमध्ये सहभागी होता येईल.
- विद्यार्थ्याने आपली प्रतीक्षा यादीतील रँक तपासून दररोज भाग दोनमध्ये पसंती नोंदविणे आवश्यक आहे.

Pune, Main
17/10/2022 Page No. 2

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

सकाळ

### नव्या शैक्षणिक धोरणासाठी विद्यापीठात स्वतंत्र कक्ष

पुणे, ता. १७ : 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'ची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टिकोनातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात स्वतंत्र अंमलबजावणी कक्ष स्थापन होणार, अशी घोषणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी आज विद्या परिषदेच्या बैठकीदरम्यान केली.

विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात डॉ. काळे यांच्या अध्यक्षतेखाली आज ही बैठक पार पडली. यावेळी प्र- कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांच्यासह अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता, अभ्यास मंडळाचे सदस्य, शैक्षणिक विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. काळे म्हणाले, ''विद्यापीठ अनुदान आयोग आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांनी शैक्षणिक धोरणाबाबत वेळोवेळी अधिसूचना तसेच मार्गदर्शक सूचनाही दिल्या आहेत. त्या अनुषंगाने हा कक्ष स्थापन करणार आहे. यासाठी स्वतंत्र संचालकांची नेमणूकही करणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्याच्या दृष्टीने ''टास्क फोर्स'' स्थापन करणार आहे. या 'टास्क फोर्स'च्या मार्गदर्शक सूचनेनुसार कक्षाचे कामकाज चालणार आहे.''

Pune, Main
18/10/2022 Page No. 2

### तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या दरवर्षी नियुक्त्या बंधनकारक

#### मानधन थेट बॅंकेत

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई** : राज्यातील महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्त्यांसंबंधी राज्य शासनाने नवीन कार्यपद्धती जाहीर केली आहे. अशा प्रकारच्या नियुक्त्या दर वर्षी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासंबंधीचे वेळापत्रकही निश्चित करून देण्यात आले आहे. आता तासिका तत्त्वावरील अध्यापकांचे मानधन त्यांच्या बॅंक खात्यात थेट जमा करण्याबाबतही शासनाने निर्णय घेतला आहे. मानधनवाढीबाबतही लवकरच निर्णय घेतला जाणार आहे, असे सांगण्यात आले.

राज्यातील अकृषी विद्यापीठांशी सलग्न महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावर अध्यापकांच्या नेमणुका केल्या जातात. त्यांच्या काही मागण्यांबाबत अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी उच्चशिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती.

समितीने तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीच्या धोरणाचा आढावा घेऊन नवी कार्यपद्धती लागू करण्यासंबंधीचा अहवाल २१ फेब्रुवारी रोजी राज्य शासनास सादर केला. एखाद्या महाविद्यालयात तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या अध्यापकाची त्याच महाविद्यालयात पुनर्नियुक्ती करावयाची असल्यास नव्याने कार्यपद्धती राबविण्यात येऊ नये, ही समितीची शिफारस राज्य शासनाने अमान्य केली आहे. त्यामुळे या पुढे अशा प्रकारच्या नियुक्त्या दर वर्षी जाहिरात देऊनच करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने या संदर्भात एक शासन आदेश काढला असून, त्यात तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या नियुक्त्यांची नवी कार्यपद्धती जाहीर केली आहे. दर वर्षी शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी १५ फेब्रुवारीपासून नियुक्त्यांची प्रक्रिया सुरू करायची आहे.

**आरक्षण लागू नाही**

तासिका तत्त्वावरील नियुक्ती शैक्षणिक वर्षासाठी मर्यादित असून ती पूर्णवेळ नाही, त्यामुळे अशा नियुक्तीसाठी आरक्षण लागू करण्यात आलेले नाही. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) या कायद्यामध्येही तशी तरतूद नाही, असे राज्य शासनाने स्पष्ट केले आहे.

लोकसत्ता Wed, 19 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70580116

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

पुढारी

# सीएचबी प्राध्यापकांचे मानधन आता थेट बँकेत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्यातील महाविद्यालयांमध्ये घड्याळी तासिका तत्त्वावर (सीएचबी) प्राध्यापकांचे मानधन आता थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. तसेच, नियुक्ती तयार करण्यात आलेल्या कार्यपद्धतीने निश्चित करण्यात आली आहे. कालबद्ध वेळापत्रकानुसार १५ फेब्रुवारी ते १५ जून या कालावधीत नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. तसा शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्ध केला आहे.**



नेट, सेट, पीएचडी धारक संघर्ष समितीची विविध मागण्यांबाबत २०२१ मध्ये उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांबरोबर बैठक झाली होती. त्यानंतर तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांबाबत उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली.

**नियुक्ती १५ फेब्रुवारी ते १५ जूनदरम्यानच पूर्ण करावी लागणार**

डॉ. माने समितीने फेब्रुवारी २०२२ मध्ये अहवाल सादर केला. या अहवालामध्ये समितीने नऊ शिफारसी केल्या होत्या. त्यातील काही महत्त्वाच्या शिफारसी शासनाने मान्य केल्या आहेत.

तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी कालबद्ध वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. त्यानुसार कार्यभार तपासणीसाठी १५ फेब्रवारी, ना-हरकत प्रमाणपत्र मागणी नोंदवण्यासाठी १ मार्चपर्यंत, ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी १५ मार्च, जाहिरात प्रसिद्ध करण्यासाठी १ एप्रिल, अर्ज तपासणी, मुलाखत, उमेदवार निवडीसाठी १५ एप्रिल, नेमणूक आदेशासाठी ३० एप्रिल, विद्यापीठ मान्यतेसाठी ३१ मेपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. तर, १५ जूनपासून तासिका तत्त्वावरील प्राध्यापकाची सेवा उपलब्ध करून देण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. महाविद्यालयाने प्राध्यापकाची नियुक्ती निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार झाल्याची खात्री करून वेळेत मानधन दिले जाण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव सहसंचालकांकडे सादर करावा. सहसंचालकांनी प्रस्तावाची पडताळणी करून तासिका तत्त्वावरील प्राध्यापकाचे मानधन महाविद्यालयामार्फत थेट बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही करावी. एका पूर्णवेळ रिक्त पदासाठी दोनच तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांची नियुक्ती करता येईल. एका प्राध्यापकाकडे जास्तीत जास्त नऊ तासिकांचा कार्यभार सोपवता येईल. उर्वरित कार्यभार किमान नऊ तासिकांचा असल्यास तासिका तत्त्वावरील प्राध्यापकाची नियुक्ती करता येईल.

### या शिफारशींना नकार

तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना सेवेचे अनुभव प्रमाणपत्र देणे, परीक्षा संबंधित पर्यवेक्षण आणि मूल्यांकनाचे काम देणे, तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांची त्यात महाविद्यालयात पुनर्नियुक्ती करायची असल्यास नव्याने कार्यपद्धती राबवू नये, प्रचलित आरक्षण धोरणानुसार तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांची नियुक्ती करणे, या शिफारसी नाकारण्यात आल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

### आरक्षण लागू नाही

तासिका तत्त्वावरील नियुक्ती ही शैक्षणिक वर्षापुरती असल्याने पूर्णवेळाची नियुक्ती नाही, महाराष्ट्र लोकसेवा आयोग अधिनियम २००१नुसार तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना आरक्षण लागू असल्याची तरतूद नाही. त्यामुळे तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्तीला आरक्षण लागू राहणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Oct 19, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

# पदवी, पदव्युत्तर पदवी स्तरावर सायबर सुरक्षा अभ्यासक्रम राबवा

## विद्यापीठ अनुदान आयोगाकडून निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्याशाखांमध्ये सायबर सुरक्षा अभ्यासक्रम राबवण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयांना दिले. जागरूक, जबाबदार नागरिक घडवण्याच्या दृष्टीने सायबर सुरक्षा अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आल्याचेही यूजीसीने स्पष्ट केले.

यूजीसीने सायबर सुरक्षा अभ्यासक्रमासंबंधीचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले. यूजीसीकडून सायबर जागरुकता दिवसाच्या औचित्याने सायबर सुरक्षा अभ्यासक्रम सादर करण्यात आला आहे. उच्च शिक्षण संस्थांतील पदवी आणि पदव्युत्तर पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षेबाबत जागृती करण्यासाठी या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे नमूद करण्यात आले आहे.

सायबर सुरक्षा, सायबर गुन्हे, सायबर कायदा, समाजमाध्यमे आणि सुरक्षितता, ई कॉमर्स अँड डिजिटल पेमेंट्स, डिजिटल साधनांची सुरक्षितता, सायबर सुरक्षेची साधने आणि तंत्रज्ञान या घटकांचा पदवी स्तराच्या अभ्यासक्रमात समावेश आहे. तर सायबर सुरक्षा, सायबर गुन्हे, सायबर कायदा, विदा सुरक्षा आणि खासगी विदा, सायबर सुरक्षा व्यवस्थापन, पूर्तता आणि प्रशासन आदी घटक पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत.

लोकसत्ता Wed, 19 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70585633

पुढारी

# पदवी, पदव्युत्तर स्तरावर सायबर सुरक्षा अभ्यासक्रम राबवा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्या शाखांमध्ये सायबर सुरक्षा अभ्यासक्रम राबविण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांना दिले आहेत. जागरूक, जबाबदार नागरिक घडविण्याच्या दृष्टीने सायबर सुरक्षा अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आल्याचेही 'यूजीसी'ने स्पष्ट केले.

**यूजीसीच्या सूचना**

'यूजीसी'ने सायबर सुरक्षा अभ्यासक्रमासंबंधीचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. सायबर जागरूकता दिवसाच्या औचित्याने सायबर सुरक्षा अभ्यासक्रम सादर करण्यात आला आहे. उच्च शिक्षण संस्थांतील पदवी आणि पदव्युत्तर पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षेबाबत जागृती करण्यासाठी या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे नमूद करण्यात आले आहे.

सायबर सुरक्षा, सायबर गुन्हे, सायबर कायदा, समाजमाध्यमे आणि सुरक्षितता, ई-कॉमर्स अ‍ॅण्ड डिजिटल पेमेंट्स, डिजिटल साधनांची सुरक्षितता, सायबर सुरक्षेची साधने आणि तंत्रज्ञान या घटकांचा पदवी स्तराच्या अभ्यासक्रमात समावेश आहे, तर सायबर सुरक्षा, सायबर गुन्हे, सायबर कायदा, डाटा सुरक्षा आणि खासगी डाटा, सायबर सुरक्षा व्यवस्थापन, पूर्तता आणि प्रशासन आदी घटक पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले आहेत.

Pune Edition
Oct 19, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# Focus On PhD Quality, Not Publications

## We need to encourage scholars to become inquisitive explorers, papers will naturally follow

**Mamidala Jagadesh Kumar**



Does forcing students to mandatorily publish a research paper before thesis submission lead to a high-quality PhD thesis, or does high-quality PhD work lead to publications in good journals? This question is unlike the chicken or egg causality dilemma because we know that only high-quality PhD work can result in high-quality publication. But the 2016 PhD regulations issued by UGC prescribe that PhD scholars must publish at least one research paper in a refereed journal before submitting the thesis. This mandatory publication condition was introduced by UGC apparently because the doctoral thesis screening isn't rigorous enough.

**An unproductive rule**

Such a mandatory provision led university students to publish in predatory journals. A recent study by UGC confirms this. In a top university considered in this study, on average, during the three years (2017-19), about 25.2% of students published in Scopus-indexed journals. Only 19% published more than one journal paper. But because of the mandatory condition to publish a journal paper before PhD thesis submission, nearly 75% of the students were forced to publish in journals that are not Scopus-indexed.

- In STEM fields, journal publication is generally an accepted method of disseminating new knowledge.
- And in some disciplines, such as computer science, researchers prefer publishing in a conference over a journal.
- Social scientists routinely publish books and papers in journals, which could be why the Scopus index lists nearly 30,000 STEM journals as opposed to 14,000 humanities and social science journals.
- 14,000 journals are by no means a small number and therefore do not justify publishing in low-quality predatory journals.
- To say that university PhD scholars publish less in Scopus-indexed journals because of the lower number of humanities and social sciences journals is closing our eyes to reality.

The primary aim of PhD work is to make unique contributions to a chosen discipline by creating new knowledge. Publication of a research paper is a by-product of these efforts. We should not miss the wood for the trees.

**Maintaining PhD quality**

But how is the quality of PhD work maintained?

- First, the student and the supervisor are partners in maintaining the quality of PhD work. It starts with the mentoring provided by the supervisor to the student. The supervisor should advise the student to take appropriate courses and train in research methodology, teamwork and communication skills.
- Second, the student makes presentations to the Research Advisory Committee (RAC) every semester and gets feedback from the committee on maintaining the quality of research work. The members of the RAC need to play an active role.
- Third, the PhD thesis is sent to two external examiners who send their feedback suggesting minor or significant corrections to the thesis. The external examiners are chosen based on their research contributions from India and globally.
- Finally, the student has to defend the work before a viva-voce board, including one of the external examiners who reviewed the PhD thesis.

**Do the work**

What is required of universities is strengthening the monitoring process of PhD work at various levels. It will lead to high-quality publications and, more importantly, a well-trained researcher. As faculty members, PhD scholars who undergo this rigorous training will enhance the teaching-learning processes and the research ecosystem when absorbed in educational institutions.

We also need to understand that publication of a research paper is a serious activity. Universities should train students and encourage them to publish, present at conferences and apply for patents. It often takes time to publish a research paper in a peer-reviewed journal and, therefore, it should not be linked to submitting a PhD thesis.



**Undue pressure**

After submitting a manuscript to a journal, it may take four to six months to get the first review. Often, the paper may be rejected at this stage. It takes several months to revise and resubmit the manuscript to the same journal or another. It may again take several months to receive the decision from the editor. If you are lucky, the paper is accepted, or the reviewers may ask for further revisions.

Since the process is time-consuming, making it mandatory to publish a research paper before the submission of the thesis puts undue pressure on students and forces them to publish in fly-by-night journals.

Ultimately, a good PhD work will lead to good publications. We need to encourage students to become inquisitive explorers during their PhD work, and the publication of research papers, patent applications and conference papers will naturally result from this.

*The writer is chairman of UGC and AICTE. Views are personal*

The Times of India 19.10.2022

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# शिक्षण धोरणाबाबत शंका होणार दूर

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उद्या साधणार संवाद

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण पद्धतीत नेमके काय बदल होतील, परीक्षा पद्धतीत बदल केले जाणार का, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे काय होणार, कौशल्याभिमुख शिक्षणासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या जातील, शुल्कात वाढ होणार की शुल्क कमी होणार, अशा विद्यार्थी आणि पालकांच्या मनातल्या अनेक शंकांचे निरसन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील करणार आहेत.

'महाराष्ट्र टाइम्स'तर्फे 'पुणे सुपरफास्ट' या उपक्रमांतर्गत उद्या, गुरुवारी (२० ऑक्टोबर) विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी चंद्रकांत पाटील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनेक पैलूंवर कुलगुरू, कुलपतींसह शिक्षणतज्ज्ञांशी संवाद साधणार आहेत.

नव्या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत पुण्यातील शिक्षणतज्ज्ञांच्या मनात असलेल्या अनेक शंकांना पाटील यांच्यासमोर मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्राध्यापक, कुलगुरूंसह विद्यार्थी आणि पालकांच्या मनातल्या अनेक शंकाचे निरसन करण्याचा प्रयत्नही या कार्यक्रमाद्वारे केला जाईल. याशिवाय नवीन शैक्षणिक धोरणानुसार सरकारकडून महाविद्यालयांना विविध प्रकारचे अनुदान मिळू शकते का, महाविद्यालयांच्या स्वायत्ततेबाबतचे धोरण आणि त्यांना उद्भवणाऱ्या अडचणींवर अजूनही स्पष्टता आलेली नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची ध्येय आणि उद्दिष्टे अद्याप विद्यार्थी-पालकांपर्यंत पोहोचलेली नाहीत. अजूनही विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये शिक्षण पद्धतीत धोरणानुसार बदल करण्यात आलेले नाहीत; शिवाय महाविद्यालयांचे शुल्क, एकाच वेळी दोन पदवी मिळवण्यासाठीची व्यवस्था, प्रादेशिक भाषेतून शिक्षण, अशा अनेक मुद्द्यांवर या कार्यक्रमात चर्चा केली जाणार आहे.

महाराष्ट्र टाइम्स पुणे सुपरफास्ट

भविष्याकडे मदधाव !

**Education Special**

Partners

AKI Learning Skill India Pvt. Ltd.

MIT WORLD PEACE UNIVERSITY

Symbiosis Skills and Professional University (SSPU)

"भारतीय शिक्षण पद्धतीत द्रष्टेपणाचा अभाव होता. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे हा अनुशेष भरून निघणार आहे. एखादा विद्यार्थी काही कारणामुळे अभ्यासक्रमातून ड्रॉपआउट झाला, तर त्याचे नुकसान न होऊ देता, त्याला पुढे जाण्यासाठी प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामुळे भारतीय शिक्षण पद्धतील आमूलाग्र बदल करणाची क्षमता असणारे हे विस्तृत धोरण आहे. नवीन शैक्षणिक धोरण देशातील सामाजिक व्यवस्थेशी निगडित आहे. 'एमआयटी'ने नेहमीच धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पुढाकार घेतला असून, या उपक्रमात सहभागी होत असल्याचा आनंद आहे.

– डॉ. राहुल कराड, कार्याध्यक्ष, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी

"नवीन शैक्षणिक धोरण सर्वसमावेशक असल्याने, त्याला शैक्षणिक घटकांकडून पाठिंबा मिळत आहे. नवे धोरण राबवित असताना लोकांना काळजी वाटते. मात्र, त्यातूनही मार्ग निघेल. हे धोरण २१व्या शतकातील भारत निर्माण करण्यासाठी उपयोगी पडणार असून, त्यातून भावी पिढी घडणार आहे.

– प्रा. ह्रदयेश देशपांडे, कुलगुरू, अजिंक्य डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी

Maharashtra Times 19.10.2022

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

**लोकमत**

### पदवी, पदव्युत्तरसाठीही सायबर सुरक्षा अभ्यासक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्याचे युग हे डिजिटलचे युग आहे. त्याचे फायदे असले तरी, त्याचे तोटेही आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातच त्याचे धडे मिळावेत म्हणून पदवी, पदव्युत्तर स्तरावरील विद्या शाखांमध्ये सायबर सुरक्षा अभ्यासक्रम राबविण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले. देशभरातील विद्यापीठे, संलग्न महाविद्यालयांना हे निर्देश दिले आहेत.

केंद्रीय गृह मंत्रालयाने प्रत्येक महिन्याचा बुधवार हा सायबर जागरूकता दिवस म्हणून पाळण्याचे जाहीर केले. या दिवसाचे औचित्य साधत सायबर सुरक्षा अभ्यासक्रम सादर केला. 'यूजीसी'ने सायबर सुरक्षा अभ्यासक्रमासंबंधीचे परिपत्रकही संकेतस्थळावर प्रसिद्ध केले. त्यानुसार उच्च शिक्षण संस्थांतील पदवी, पदव्युत्तर पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षेबाबत जागृतीसाठी अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसाठी कार्यवाही करावी, असे नमूद करण्यात आले आहे.

जागरूक, जबाबदार नागरिक घडविण्याच्या दृष्टीने सायबर सुरक्षा अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. तंत्रज्ञान या घटकांचा पदवीत समावेशाची मागणी आहे.

Pune Main
Page No. 2 Oct 20, 2022
Powered by: erelego.com

**लोकमत**

### 'सीएचबी' प्राध्यापकांवर ९ तासिकांचा कार्यभार

**मुंबई :** महाविद्यालय किंवा विद्यापीठातील एका पूर्णवेळ पदाकरिता फक्त दोनच तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या (सीएचबी) नेमणुका यापुढे करण्यात येणार असून, एका प्राध्यापकाकडे जास्तीत जास्त ९ तासिकांचा कार्यभार सोपविण्याच्या नियमाचे पालन करा, अशी सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिल्या आहेत. तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्त्यांकरिता उच्च व तंत्रशिक्षण विभागाने कार्यपद्धती निश्चित केली आहे. याशिवाय त्यांचे मानधन थेट बँक खात्यात जमा होणार आहे.

नेट, सेट, पीएच.डी.धारक संघर्ष समितीची विविध मागण्यांबाबत २०२१ मध्ये उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांबरोबर बैठक झाली होती. त्यानंतर तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांबाबत उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने फेब्रुवारी २०२२ मध्ये अहवाल सादर केला. यात समितीने ९ शिफारशी केल्या होत्या. त्यातील तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने निश्चित केलेली पात्रता लागू करणे, प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी कार्यपद्धती निश्चित करण्यास तसेच अन्य ९ शिफारशींना मान्यता दिली आहे.

Pune Main
Page No. 11 Oct 20, 2022
Powered by: erelego.com

**लोकमत**

# विद्यापीठातील विद्यार्थ्यांची होतेय आर्थिक लूट !

## कागदावर एक प्रत्यक्षात मात्र दुप्पट शुल्कवाढ; कुलगुरूंनाच प्रशासनाने दिली खोटी माहिती; सर्वच अभ्यासक्रमांच्या शुल्कात वाढ

स्पेशल रिपोर्ट

**कमलाकर शेटे**

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शुल्कवाढ लागू केली. मात्र, विद्यापीठ प्रशासनाने विविध अभ्यासक्रमांची प्रत्यक्ष शुल्कवाढ आणि प्रत्यक्षात आकारलेले शुल्क यामध्येच प्रचंड तफावत दिसून आली आहे. विशेष म्हणजे कुलगुरूंना प्रत्यक्ष शुल्कवाढीचे आकडे न देता कमी शुल्क असलेली चुकीची आकडेवारी देत त्यांच्या डोळ्यातच धूळफेक करण्याचा प्रयत्न त्यांच्याच प्रशासनाने केला आहे. याप्रकरणी कुलगुरूंनी उच्चस्तरीय चौकशी समिती नेमली आहे.

प्रशासनाच्या आणि विद्यार्थ्यांना आकारलेल्या शुल्कात खूपच तफावत आहे. शुल्कात वाढ झाल्यानंतर प्रशासनाच्या आकडेवारी पेक्षा विद्यार्थ्यांना जास्त रकमेचे चलन आकारण्यात आलेले आहे. विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीने कुलगुरु व प्रशासकीय अधिकारी यांना पुराव्यानिशी हा प्रकार दाखवून दिला. त्यामुळे प्रशासनच विद्यापीठ, कुलगुरूंसह आणि विद्यार्थ्यांना खोटी माहिती देऊन फसवत आहे की काय? असा प्रश्न विद्यार्थी उपस्थित करत आहेत.

याबाबत कुलगुरूंनी गांभीर्याने दखल घेत आकडेवारी दुरुस्त करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच मागण्यांबाबत अभ्यास करून अधिकार मंडळांसमोर योग्य प्रस्ताव मांडण्यात येणार आहे. त्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती गठित करण्यात आली आहे.

पदव्युत्तर पदवी, डिप्लोमा, प्रमाणपत्र या सर्वच अभ्यासक्रमांची २८ फेब्रुवारी २०२० च्या आदेशानुसार शुल्कवाढ झाली आहे. विद्यार्थ्यांना आकारलेल्या चलनांमध्ये उपघटकांची संख्याही वाढविण्यात आली असून, त्याअंतर्गत विविध शुल्क आकारण्यात येत आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शुल्कवाढ लागू करण्यास स्थगिती दिल्याचे सांगण्यात येत होते. मात्र, २०२०-२१ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या चलनांमध्ये शुल्कवाढ लागू केल्याचे दिसून आले आहे. त्यानंतर प्रत्येक वर्षी वाढ केली आहे, त्यामुळे सर्वच शुल्कवाढ रद्द करण्याची मागणी कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे. अनेक विद्यार्थ्यांना शुल्क भरणे शक्य नसल्याने शुल्कवाढ मागे घेण्याची मागणी होत आहे.

**दोन शैक्षणिक वर्षातील तफावत**

| (एम.कॉम.) | २०१८-२० | २०२१-२३ |
|---|---|---|
| प्रवेश शुल्क | ३७८ | ८,१०० |
| ग्रंथालय अनामत | ५०० | ५०० |
| सत्र परीक्षा शुल्क | ११० | १,५१० |

**वसतिगृह शुल्क**

| वर्ष | सत्रानुसार शुल्क | अनामत शुल्क |
|---|---|---|
| २०२० (पर्यंत) | १,२३० | २५० |
| २०२० (नंतर) | ३,४५० | १,००० |

**ट्युशन शुल्क फरक (१ वर्ष)**

| अभ्यासक्रम | २०११ | २०२० | २०२२ |
|---|---|---|---|
| एम.एससी. | ११,००० | १४,३०० | २८,६०० |
| एम.कॉम. | ९,८०० | १४,००० | २९,००० |

प्रशासनाने २०२० मधील शुल्क आकारणे आवश्यक असताना २०२२मध्ये नवे, भरमसाठ शुल्क आकारले.



शिष्यवृत्ती लागू असलेल्या विद्यार्थ्यांकडून शुल्क घेतले जात नव्हते. मात्र २०२१ शैक्षणिक वर्षात सरसकट ५ हजार रुपये घेतले. कृती समितीच्या आंदोलनाची दखल घेऊन (१० जुलै) परिपत्रक काढून ९५० कमी केले. मात्र ३ महिने उलटूनही परतावा मिळाला नाही. ती रक्कम तत्काळ जमा करण्याच्या सूचना कुलगुरूंनी दिलेल्या आहेत.

सर्वच घटकांमध्ये अतिरिक्त शुल्कवाढ केली आहे. विद्यार्थ्यांना एकाच वेळी सर्व शुल्कांचा भार पडत आहे. कोरोना प्रादुर्भावाचा विचार करुन तसेच सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे हित लक्षात घ्यावे. विद्यापीठ प्रशासनाने नेमलेल्या उच्चस्तरीय समितीने शुल्कवाढ रद्द करावी.

\- विद्यार्थिनी

उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्यात आलेली आहे. सर्वांचे म्हणणे रीतसर ऐकून घेण्याच्या सूचना समितीला देण्यात आलेल्या आहेत. विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती व विविध संघटनांनी दिलेली माहिती विचारात घेऊन सर्वसमावेशक अहवाल तयार करण्यात येईल. फॅक्ट फाइंडिंग अहवाल संबंधित अधिकार मंडळांसमोर ठेवण्यात येईल. त्यानुसार निर्णय घेण्यात येईल.

\- डॉ. कारभारी काळे, प्रभारी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Main
Page No. 2 Oct 20, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

सकाळ

### प्रक्रिया रखडली : शारीरिक शिक्षण संचालकपदाच्या उमेदवारांतही असंतोष

# राज्यातील ग्रंथपाल भरतीच्या प्रतीक्षेत

पुणे, ता. १९ : अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांतील प्राध्यापक संवर्गातील ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक पदांची भरती प्रक्रिया अनेक दिवसांपासून रखडली आहे. त्यात राज्यातील दोन हजार ८८ प्राध्यापकांच्या भरतीत ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालकांच्या पदांचा समावेश नसल्याने पात्रताधारकांमध्ये असंतोष आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघाचे सचिव ज्ञानेश्वर हिलाले सांगतात, "शैक्षणिक मुल्यांकनाच्या दृष्टीने महाविद्यालयात कायमस्वरूपी ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक ही पदे असणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते; मात्र महाविद्यालयातील एवढे महत्त्वाचे पद चुकीच्या धोरणामुळे रिक्त राहिले आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघाने मागील काही वर्षांपासून अनेक आंदोलनेही केली आहेत. या पदांची भरतीप्रक्रिया तातडीने सुरु करावी यासाठी राज्याचे उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना निवेदन देण्यात आले आहे." मंत्री पाटील यांनी या दोन्ही पदावर अन्याय झाल्याचे बैठकीत मान्य केले; मात्र झालेला अन्याय मंत्री दूर करून आम्हाला न्याय देतील का, असा सवाल राज्यातील पात्रताधारक विचारत असल्याचे हिलाले यांनी सांगितले.

प्राध्यापकांच्या तुलनेत ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालकांची पदसंख्या ही कमी आहे. तरीही आमच्या भरतीकडे सरकारने दुर्लक्ष केले असून, यामुळे महाविद्यालयांना नॅकसारख्या मूल्यांकनात फटका बसू शकतो. नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर ग्रंथपालांची पदभरती आवश्यक असून, सरकारने याची दखल घ्यावी.
- **डॉ. रवींद्र भताने**, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघ

#### घटनाक्रम

- ३ नोव्हेंबर २०१८ : अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील विविध पदांच्या भरतीचा सरकारी निर्णय निर्गमित, यात ग्रंथपालांची व शारीरिक शिक्षण संचालकांचा समावेश नाही
- मार्च २०१९ : कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर या पदभरतीवर निर्बंध
- १२ नोव्हेंबर २०२१ - राज्य सरकारने पदभरतीचा निर्णय काढत २०८८ प्राध्यापकांच्या भरतीला हिरवा कंदील दाखवला

#### घोषणा झाली; मात्र निर्णय नाही

जून २०२२ मध्ये पदभरती संदर्भात बैठक झाली. यात ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक पदांच्या भरतीला हिरवा कंदील दाखवण्यात आला; मात्र या दोन पदांच्या भरतीचा सरकारी निर्णय निघण्याअगोदरच सत्ता परिवर्तन झाले व पुन्हा या दोन पदांच्या भरतीचा निर्णय रखडला आहे, असे संघटनेने सांगितले.

Pune, Pune-Today
20/10/2022 Page No. 8

सकाळ

### ॲडऑन कोर्स : नोकरीसाठी विद्यार्थ्यांचे प्राधान्य; शिक्षणसंस्थांना फायदा

# लघु अभ्यासक्रमांसाठी पुण्याकडे ओढा

**सम्राट कदम** : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १९ : लवकर नोकरी मिळावी म्हणून नियमित शिक्षणाबरोबरच विद्यार्थी आता रोजगाराभिमुख लघु अभ्यासक्रमांना (शॉर्ट टर्म कोर्सेस) प्रवेश घेत आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस अशा कौशल्याभिमुख अभ्यासक्रमांची संख्याही वाढत असून, यासाठी पुणे गाठणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही कोरोनानंतर वाढल्याचे निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदविले आहे.

पारंपारिक अभ्यासक्रमांची रोजगारक्षमता दिवसेंदिवस कमी होत असून, उद्योगांतील कौशल्य आत्मसात करण्यासाठी विद्यार्थी 'ॲडऑन कोर्सेस' करत आहेत. नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्सचे सहायक प्राध्यापक रामदास बडे सांगतात, "वाणिज्य शाखेत पदवी घेत असतानाच विद्यार्थ्यांचा बँकिंग आणि फायनान्स मधील डिप्लोमा करण्याकडे कल वाढला आहे. असे अभ्यासक्रम जरी राज्यभरात शिकविले जात असले, तरी पुण्यामध्ये थेट उद्योगांचा सहभाग असल्यामुळे विद्यार्थ्यांना नोकरीची शक्यता वाढते. त्यामुळे प्रामुख्याने अशा अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी पुण्याला पसंती देत आहेत." वाणिज्य आणि कला शाखेबरोबरच विज्ञान शाखेतील विद्यार्थीही आता याकडे वळले आहे. कोरोनामुळे मागील दीड वर्षात विद्यार्थ्यांमध्ये ॲड-ऑन कोर्सेसबद्दल जागृती वाढल्याने प्रवेशसंख्या वाढल्याचेही तज्ज्ञ म्हणतात.

#### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अभ्यासक्रम

| अ. क्र. | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १) | पदविका | १२५० |
| २) | पदव्युत्तर पदविका | ८०९ |
| ३) | प्रमाणपत्र | २२५० |

#### विद्याशाखानुसार काही प्रमुख अभ्यासक्रम

- विज्ञान आणि तंत्रज्ञान : जीआयएस, थ्रीडी ॲनिमेशन, ग्राफिक्स डिझाईन, जैववैद्यकीय अभ्यासक्रम, नर्सिंग
- माहिती तंत्रज्ञान : सॉफ्टवेअर कोडिंग, सॉफ्टवेअर टेस्टिंग, डेटा मॅनेजमेंट
- वाणिज्य : डिप्लोमा इन बँकींग ॲन्ड फायनान्स, डिजिटल मार्केटिंग, इन्व्हेस्टमेंट बँकींग, अकाउंटिंग, फायनान्स, टॅक्सेशन लॉ.
- कला : परदेशी भाषा, संस्कृत अध्ययन, हस्तलिखीतशास्त्र

सध्या अधिकाधिक विद्यार्थी कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमांसाठी पुण्यात येणे पसंत करत आहेत. विशेष करून ऑटोमोबाईल अभियांत्रिकी, मेकॅट्रॉनिक्स, सोलर, ब्युटी आणि वेलनेसमधील दीर्घकालीन आणि अल्प-मुदतीच्या शिक्षणासाठी अनेक विद्यार्थी सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेश घेतानाचा कल आम्हाला दिसतोय. अनके उद्योगांच्या मदतीने तयार केलेला अभ्यासक्रम, प्रत्येक वर्षी इंटर्नशिप अशा अनेक गोष्टी विद्यार्थ्यांना नोकरी तसेच उद्योगासाठी तयार करतात.
- **डॉ. स्वाती मुजुमदार**, प्र कुलपती, सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी

#### पुणेच का?

- औद्योगिक वसाहत, आयटी हब, वाणिज्य आस्थापनांची स्वतंत्र परिसंस्था
- रोजगाराभिमुख अभ्यासक्रम राबविणाऱ्या शैक्षणिक संस्थांची मोठी संख्या
- बहुतेक अभ्यासक्रमांत उद्योगांचा थेट सहभाग, त्यामुळे नोकरीची शक्यता वाढते
- दर्जेदार शिक्षण आणि शैक्षणिक राजधानी म्हणून पुण्याला पसंती

चाकण-भोसरीतील एमआयडीसी आणि हिंजवडी-खराडीतील आयटी हबमुळे पुणे शहरात रोजगारासाठी एक परिसंस्था विकसित झाली आहे. त्यात विद्येच्ये माहेरघर असलेल्या पुण्यात शैक्षणिक संस्थांनीही असे अभ्यासक्रम मोठ्या प्रमाणावर सुरू केले आहे. त्यामुळे इतर शहरांच्या तुलनेत पुण्याकडे येण्याचा ओढा वाढला आहे.
- **डॉ. मनोहर चासकर**, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
20/10/2022 Page No. 2

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

सकाळ

### विद्यापीठातील अंतर्गत कलहाचा विद्यार्थ्यांना फटका

#### शैक्षणिक शुल्काबाबत संभ्रमाची स्थिती ; प्रशासनाची टोलवाटोलवी

**पुणे, ता. १९ :** शुल्कवाढीचा आढावा घेण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने एका समितीचे गठण केले आहे. मात्र, त्याचवेळी परीक्षा शुल्काबाबत निघालेले परिपत्रक आणि एकंदरीत शुल्कवाढीच्या निर्णयाबद्दल विद्यापीठ प्रशासनामध्ये कमालीचा अंतर्गत कलह असून, याचा थेट तोटा विद्यार्थ्यांना होत आहे.

कोरोनानंतर विद्यापीठाच्या शैक्षणिक शुल्कात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचा आरोप करत विद्यार्थी संघटनांनी तीव्र आंदोलन केले. त्याची दखल घेत प्रशासनाने संपूर्ण शैक्षणिक शुल्काचा पुन्हा आढावा घेण्यासाठी समितीचे गठण केले. त्याच दरम्यान महाविद्यालये आणि संलग्न संशोधन केंद्रांनी २०१९-२० प्रमाणेच २०२२-२३ मध्येही परीक्षा शुल्क व आनुषंगिक शुल्क आकारावे, असे परिपत्रकही परीक्षा मंडळाने प्रसिद्ध केले. जर शुल्कवाढ झालीच नव्हती तर विभागांमधील परीक्षा शुल्क वाढले कसे, असा प्रश्न आता विद्यार्थी संघटना उपस्थित करत आहेत.

२०११ मध्ये प्रस्तावित असलेली शुल्कवाढ २०१९ मध्ये लागू करण्यात आली. आता त्याच निर्णयानुसार शुल्कवाढ झाल्याचे, विद्यापीठ प्रशासनाने सांगितले आहे. तर, दुसरीकडे परीक्षा शुल्कात मागील पाच वर्षात कोणतीच वाढ न केल्याचे परीक्षा मंडळाचे म्हणणे आहे. प्रत्यक्षात मात्र विद्यापीठातील विभागांमध्ये शुल्कवाढ झाली आहे. आता परीक्षा विभागाने शुल्कवाढ नसल्याचे परिपत्रक काढले आहे, त्याची अंमलबजावणी नक्की कशी होणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**अनुत्तरित प्रश्न...**

- **शुल्कवाढीचे काय होणार?**
- **शुल्कवाढ कशी झाली?**
- **वाढलेल्या परीक्षा शुल्काला जबाबदार कोण?**
- **शुल्कवाढ कमी झाल्यास शुल्क परत मिळणार का?**

> **परीक्षा मंडळाने २०१९-२० पासून परीक्षा शुल्कात कोणतीही वाढ केलेली नाही. उलट कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक सवलती देण्यात आल्या आहेत. संबंधित परिपत्रक महाविद्यालये आणि संलग्नीत संशोधन केंद्रासाठी आहे.**
> – **डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सा.फु. पुणे विद्यापीठ

> **शैक्षणिक शुल्काच्या आढाव्यासंदर्भात आम्ही एका समितीचे गठण केले आहे. त्याचा अहवाल लवकरच येईल. परीक्षा शुल्कासंबंधीत निर्णय परीक्षा मंडळाच्या वतीने घेण्यात येतो.**
> – **डॉ. संजीव सोनवणे,** प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> **विद्यार्थ्यांनी २०१९ मध्ये १९० रुपये परीक्षा शुल्क भरले तर २०२२ मध्ये याचसाठी एक हजार ७० रुपये घेतले. तर शुल्कवाढ झाली नाही, असे कसे म्हणता येईल.**
> – **राहुल ससाणे,** सदस्य, विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती

Pune, Main
20/10/2022 Page No. 2

सामना

### बोर्डाला महागाईची झळ

### दहावी–बारावी परीक्षा शुल्कात वाढ

**मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी)** – राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाला यंदा महागाईची झळ बसली असून दहावी–बारावीच्या परीक्षा शुल्कात प्रत्येकी २० ते ३० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. याआधी दहावीच्या विद्यार्थ्यांकडून (प्रात्यक्षिक परीक्षेसह) ४१५ रुपये तर बारावीच्या विद्यार्थ्यांकडून ४३५ रुपये शुल्क आकारण्यात येत होते, मात्र यंदाच्या वर्षी त्यात वाढ करण्यात आली आहे. मात्र वाढीव परीक्षा फीविषयीच्या सूचना शिक्षण मंडळाने उशिरा दिल्याचे ज्युनियर कॉलेजमधील लिपिक वर्गाचे म्हणणे आहे.

शिक्षण मंडळाने निकालानंतर विद्यार्थ्यांना देण्यात येणारी गुणपत्रिका आणि प्रमाणपत्राच्या लॅमिनेशनसाठी यंदा प्रत्येकी २० रुपये आकारले असल्याने परीक्षा फीमध्ये वाढ झाली आहे. याआधी दहावी–बारावीच्या विद्यार्थ्यांकडून त्यासाठी केवळ दहा रुपये आकारण्यात येत होते. दहावी–बारावीचे परीक्षा शुल्क अनुक्रमे ३७५ आणि ४०० रुपये इतके आहे. त्याचबरोबर प्रशासकीय शुल्कासाठी प्रत्येकी १० रुपये आणि दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी १० तर बारावीसाठी १५ रुपये असे आकारण्यात येत आहेत.

**एलिजिबिलिटी प्रमाणपत्र शुल्क यंदा दुपटीने वाढले**

बारावीची परीक्षा देणाऱ्या बिगर एसएससी विद्यार्थ्यांकडून एलिजिबिलिटी प्रमाणपत्रासाठी यंदा ५०० रुपये आकारण्यात येत आहे. याआधी ३०० रुपये घेण्यात येत होते. तसेच परीक्षा अर्ज शुल्क १०० वरून २०० रुपये आणि दैनंदिन विलंब शुल्कापोटी १० ऐवजी आता २० रुपये आकारण्यात येत आहेत.

**वाढीव फीच्या सूचना उशिराने**

राज्य शिक्षण मंडळाने २९ सप्टेंबरला लेखी सूचना जाहीर करून बारावीचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर केल्या. त्यानुसार १ ते २१ ऑक्टोबर यादरम्यान नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्याची मुदत देण्यात आली. बहुसंख्य विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरून फी घेण्याचे काम या मुदतीत पूर्ण झाले.असे असताना १८ ऑक्टोबरला शिक्षण मंडळाने वाढीव परीक्षा फी घेण्याचे आदेश दिले. त्यामुळे दिवाळीच्या सुट्टीनंतर परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांकडून ज्युनियर कॉलेजना वाढीव फी घ्यावी लागणार आहे.

Pune Edition
Oct 20, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

# तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या हिताच्या सर्व शिफारशी स्वीकारा

### महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेची मागणी

**पुणे :** घड्याळी तासिका तत्त्वावर (सीएचबी) काम करणाऱ्या प्राध्याकांची दरवर्षी नियुक्ती, त्यासाठीची कार्यपद्धती, मानधनाची रक्कम थेट बँक खात्यात जमा करण्याबाबत राज्य शासनाने नुकताच आदेश दिला. मात्र डॉ. माने समितीच्या अहवालातील सीएचबी प्राध्यापक पात्रताधारकांच्या हिताच्या सर्व शिफारशी स्वीकारण्याची मागणी करण्यात आली आहे.

राज्यातील महाविद्यालयांमध्ये काम करणाऱ्या सीएचबी प्राध्यापकांसंदर्भात धोरण निश्चित करण्यासासाठी उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सीएचबी प्राध्यापकांसाठीच्या धोरणाचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष डॉ. संदीप पाथ्रीकर म्हणाले, की शासनाने शिफारशी स्वीकारल्या असल्या तरी पात्रताधारकांच्या हिताच्या काही शिफारशी नाकारल्या गेल्याचे दुःख आहे. राज्यातील पात्रताधारकांचे व्यापक हीत लक्षात घेता. तासिका तत्त्व धोरणासंबंधी नाकारल्या गेलेल्या शिफारशी शासनाने स्वीकाराव्यात. तसेच १ ऑक्टोबर २०१७ चा आकृतिबंध, शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक, अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील सहाय्यक प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती या मागण्यांची सोडवणूक करावी. अन्यथा रस्त्यावर उतरून शासनाबरोबर संघर्ष करावा लागेल.

लोकसत्ता Thu, 20 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70597199

सकाळ

## राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा : ३ ते ८ वर्षे वयोगटावर लक्ष केंद्रित

# मुलांचा शैक्षणिक पाया होणार भक्कम



**नवी दिल्ली, ता. २० (पीटीआय) :** केंद्र सरकारने आज ३ ते ८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (एनसीएफ) जाहीर केला. मुलांचा शैक्षणिक पाया अधिक भक्कम करण्यासाठी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्यात आला असल्याचे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज जाहीर केले. या आराखड्यात बाल्यावस्थेतील काळजी आणि शिक्षण या दोन घटकांवर भर देण्यात आला आहे.

मंत्री प्रधान म्हणाले की, '' नवे शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने टाकण्यात आलेले राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. आता शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षणविषयक राष्ट्रीय परिषदेने (एनसीईआरटी) देखील पुढील वसंत पंचमीपर्यंत हा अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके पूर्ण करावीत असे आवाहन मी करत आहे. 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-२०२२' मध्ये चार घटकांचा समावेश करण्यात आला असून त्यात शालेय शिक्षण, बाल्यावस्थेतील काळजी अन् शिक्षण, शिक्षकांचे शिक्षण आणि प्रौढ शिक्षण यांचा समावेश आहे.

जगभरात शिक्षण, न्युरोसायन्स आणि अर्थशास्त्रामध्ये होत असलेल्या संशोधनाचा विचार करता एक बाब स्पष्ट होते की, उच्चदर्जाचे मोफत शिक्षण आणि बाल्यावस्थेतील काळजी यात गुंतवणूक करणे हा एक सर्वोत्तम मार्ग असतो. कोणताही देश स्वतःच्या भवितव्यासाठी याच मार्गाचा अंगीकार करेल. पहिल्या आठ वर्षांमध्ये मुलाच्या मेंदूचा सर्वाधिक वेगाने विकास होतो. त्यामुळे हा काळ महत्त्वपूर्ण असतो.''

### 'पंचकोश' संकल्पनेचा समावेश

मुलांच्या शिक्षणासाठी तयार करण्यात आलेल्या या आराखड्यामध्ये 'पंचकोश' संकल्पनेचा समावेश करण्यात आला असून त्यातील पाच घटकांमध्ये शारीरिक विकास, प्राणिक विकास, मानसिक विकास, बौद्धिक विकास आणि चैतसिक विकास (आध्यात्मिक प्रगती) यांचा समावेश आहे. या संकल्पनेच्या माध्यमातून मानवी शरीर आणि मन या दोहोंचा विचार करण्यात आला आहे. या 'पवित्र' शिक्षणाच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असेही 'एनसीएफ'मध्ये नमूद करण्यात आले आहे.

### 'विद्याप्रवेश' शाळा समजविणार

इयत्ता पहिलीत प्रवेश करणाऱ्यांसाठी 'एनसीईआरटी'ने 'विद्याप्रवेश' ही अभिनव संकल्पना तयार केली आहे. 'विद्याप्रवेश'च्या पहिल्या तीन महिन्यांत चार तास मुलांना शालेय वातावरणात रूळण्याचे प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच शाळेत वर्तन कसे असावे हे देखील शिकविण्यात येईल. नैतिक मूल्ये, सांस्कृतिक वैविध्य, सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणाची देखील त्यांना ओळख करून देण्यात येईल. नव्या आराखड्यामध्ये प्रामुख्याने याच घटकांवर भर देण्यात आला आहे.

### असेही पंचकोश

**योगशास्त्रानुसार मानवी शरीरामध्ये पाच कोश आहेत, त्यांना 'पंचकोश' असे म्हटले जाते.**

- **अन्नमय कोश :** अन्न तथा भोजनापासून निर्मिती
- **प्राणमय कोश :** प्राणवायूपासून निर्मिती, प्राणायामाच्या माध्यमातून प्राणमय कोश निरोगी ठेवता येतो
- **मनोमय कोश :** मनापासून निर्मिती, इंद्रियांकडून ग्रहण ज्ञानाद्वारे विचार तयार होतात
- **विज्ञानमय कोश :** अंतर्ज्ञान तसेच सहजज्ञानापासून निर्मिती
- **आनंदमय कोश :** आनंदानुभूती पासून निर्मिती

Pune, Main1
21/10/2022 Page No. 3

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# शिक्षण धोरणानुसारच महाविद्यालये

## नव्या मान्यतेविषयी चंद्रकांत पाटील यांचे सूतोवाच

एज्युकेशन स्पेशल

> "प्रत्येक जिल्ह्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालय-विद्यापीठांमार्फत कार्यशाळा आयोजित कराव्या लागतील. तसेच, प्रत्येक जिल्ह्यात १० ते १२ केंद्रे निर्माण करावी लागतील.
>
> - चंद्रकांत पाटील, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री



म. टा. प्रतिनिधी, पुणे

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून महाविद्यालयांची मागणी करणाऱ्या शिक्षण संस्थांनाच यापुढे नवे महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात येणार आहे,' अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी केली. राज्यातील विद्यार्थ्यांना बहुविद्याशाखीय शिक्षण घेता यावे, यासाठी जिल्ह्यातील दोन ते तीन महाविद्यालये किंवा विद्यापीठांचे क्लस्टर निर्माण करावे, असे आवाहनही पाटील यांनी संस्थाचालकांना केले.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'पुणे सुपरफास्ट' (एज्युकेशन स्पेशल) व्यासपीठावरून नव्या शैक्षणिक धोरणविषयी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. राज्यातील कुलगुरू, प्राचार्य, प्राध्यापक, संस्थाचालक, विद्यार्थी आणि पालक या शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांच्या नवीन शैक्षणिक धोरणाकडून असलेल्या अपेक्षा, त्यांना पडलेले प्रश्न आणि त्यांच्या अडचणींबाबत आयोजित कार्यक्रमात पाटील यांनी विविध मुद्द्यांवर सविस्तर भाष्य केले. 'महाराष्ट्र टाइम्स'चे निवासी संपादक श्रीधर लोणी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर सादरीकरण केले. त्यातील अनेक मुद्द्यांचा ऊहापोह पाटील यांनी भाषणादरम्यान केला. ते म्हणाले, 'देशातील युवा वर्गाला रोजगाराभिमुख करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रमाचा ७० टक्के भाग कौशल्यांवर आधारित शिक्षणाला, तर ३० टक्के भाग थेअरी अभ्यासक्रमाला देण्याची गरज आहे.'

नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात मागे पडणाऱ्या महाविद्यालयांना विद्यार्थी मिळणार नसल्याने, ही महाविद्यालये आगामी काळात बंद पडतील, अशी शक्यता त्यांनी वर्तविली.

◀ संबंधित वार्तांकन...II

Maharashtra Times 21.10.2022

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# शैक्षणिक आराखडा सादर

## तीन ते आठ वर्षे वयाच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या बाबींचा समावेश

**वृत्तसंस्था,** नवी दिल्ली

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी गुरुवारी तीन ते आठ वर्षे वयाच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा जाहीर केला. सुरुवातीच्या टप्प्यात विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती आणि त्यांचा सर्वांगीण विकास या मुद्द्यांवर या आराखड्यामध्ये प्रकाश टाकण्यात आला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी हा आराखडा महत्त्वाचा मानला जात आहे.

शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले, 'एनसीएफ अर्थात 'नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क' हे नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. मी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेला (एनसीईआरटी) आवाहन करतो की त्यांनी पुढील वसंत पंचमीपर्यंत अभ्यासक्रम, अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके पूर्ण करावीत.'

- राष्ट्रीय शिक्षण धोरण राबविण्यासाठी महत्त्वाची भूमिका
- शिक्षणाच्या प्राचीन विचाराला पुढे नेण्याचा विचार असल्याचे सरकारचे मत
- सर्व प्रकारच्या शालेय शिक्षणाला उपयुक्त ठरणार



**"देशातील ५० केंद्रीय विद्यालयांमध्ये आम्ही पहिल्यांदाच राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा राबविण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. अगदी लहान वयापासून हा बदल करण्याचा आमचा विचार आहे. उत्तराखंड सरकारने पूर्वप्राथमिक स्तरापासून या आराखड्याप्रमाणे अंमबलजावणी सुरू केली आहे. शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचे बदल करण्याचा आमचा विचार आहे.**

\- **धर्मेंद्र प्रधान,** केंद्रीय शिक्षणमंत्री

### काय आहे पंचकोष पद्धती?

- पंचकोष पद्धती ही प्राचीन संकल्पना आहे. शरीर आणि मन या दोन्ही पातळीवर विकासाची प्रक्रिया होणे अभिप्रेत आहे.
- मानवी विकासाकडे पाहण्याचा अद्वैतवादी दृष्टिकोन अधिक समग्र शिक्षणाच्या दिशेने स्पष्ट मार्ग आणि दिशा देतो.
- सुरुवातीच्या टप्प्यावरच शैक्षणिक प्रगतीवर लक्ष देणे, आवश्यक असल्याचे हा आराखडा सांगतो.

**चार महत्त्वाचे विभाग**

राष्ट्रीय शिक्षण धोरणात चार मुद्दे महत्त्वाचे मानले जात आहेत. शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, कमी वयाच्या मुलांसाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, शिक्षक शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा आणि प्रौढ शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, असे हे चार मुद्दे महत्त्वाचे आहेत. शिक्षण, मेंदूशास्त्र आणि अर्थशास्त्र या क्षेत्रांमध्ये जगभरात झालेल्या संशोधनातून काही बाबी अधोरेखित झाल्या आहेत. बालपणातच विद्यार्थ्यांना मुक्त, खुले आणि सर्वसमावेशक शिक्षण दिले, तर कोणताही देश भविष्यात उत्तम प्रगती करू शकतो. या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास हीच या क्षेत्रातील सर्वोत्तम गुंतवणूक आहे.

**पंचकोष पद्धती**

विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील पहिली आठ वर्षे अतिशय महत्त्वाची मानली जात असून, या काळात पंचकोष पद्धतीनुसार शिक्षण देणे आवश्यक असल्याचे हा आराखडा सांगतो. शारीरिक विकास, मानसिक विकास, बौद्धिक विकास, जीवनऊर्जेचा विकास आणि आध्यात्मिक विकास ही पंचकोष पद्धती निश्चित करण्यात आली आहे.

Maharashtra Times 21.10.2022

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*



पुणे । शुक्रवार, २१ ऑक्टोबर २०२२ पुणे

# विद्यार्थ्यांना डिजिटल पदवी

## 'डिजिलॉकर'मध्ये पदवी समाविष्ट; चंद्रकांत पाटील यांचे आश्वासन

'महाराष्ट्र टाइम्स'च्या वतीने 'पुणे सुपरफास्ट' उपक्रमाअंतर्गत गुरुवारी झालेल्या 'एज्युकेशन स्पेशल' कार्यक्रमात (डावीकडून) डॉ. विद्या येरवडेकर, डॉ. स्वाती मुजुमदार, डॉ. शां. ब. मुजुमदार, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कुश चतुर्वेदी आणि प्रा. राहुल कराड उपस्थित होते.

डॉ. स्वाती मुजुमदार यांनी चंद्रकांत पाटील यांची भेट घेतली.

महाराष्ट्र टाइम्स पुणे सुपरफास्ट भविष्याकडे मार्गाय! Education Special

Partners

AKI Learning Skill India Pvt. Ltd.

MIT-WPU MIT WORLD PEACE UNIVERSITY

Symbiosis Skills and Professional University (SSPU)

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'विद्यापीठांना सहा महिने पदवीप्रदान समारंभासाठी पाहुणे मिळत नाहीत; म्हणून विद्यार्थ्यांची पदवी रखडते. मात्र, विद्यार्थ्यांना आता 'डिजिटल' पदवी दिली जाईल. विद्यार्थ्यांच्या अंतिम परीक्षेचा निकाल लागताच त्यांच्या 'डिजिलॉकर'मध्ये 'पदवी'चा समावेश केला जाणार असून, यापुढे पदवीप्रदान समारंभ बंद केले जातील,' अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी केली.

'महाराष्ट्र टाइम्स'तर्फे 'पुणे सुपरफास्ट' या उपक्रमाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पाटील यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन पुण्यातील शिक्षणतज्ज्ञांच्या शंकांचे निरसन केले.

### 'ऑफलाइन शिक्षणाला पर्याय नाही'

'ज्या शिक्षणाला पर्याय नाही, तेवढेच शिक्षण ऑनलाइन पद्धतीने महाविद्यालयांनी द्यायला हवे. याव्यतिरिक्त सर्व शिक्षण भविष्यात ऑफलाइन पद्धतीनेच होईल,' असे पाटील यांनी गुरुवारी अधोरेखित केले. ''ऑफलाइन शिक्षणा'द्वारे प्राध्यापक विद्यार्थ्यांमध्ये जे बदल घडवू शकतो, ते ऑनलाइन शिक्षणातून शक्य नाही. करोनाकाळात याची प्रचिती शिक्षण क्षेत्राने घेतली आहे. यामुळे बहुतांश शिक्षण ऑफलाइन पद्धतीनेच होईल,' असे पाटील यांनी स्पष्ट केले.

या वेळी कार्यक्रमाचे प्रायोजक सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या प्र-कुलपती डॉ. स्वाती मुजुमदार, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड, व 'एकेआय लर्निंग स्कील इंडिया प्रा. लि.'चे संस्थापक कुश चतुर्वेदी यांचा सत्कार चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

'जून २०२३पर्यंत ही प्रणाली विकसित करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना डिजिटल पदवीसह त्याने सोडवलेल्या उत्तरपत्रिकाही 'डिजिलॉकर'वर उपलब्ध होऊ शकतील. यामुळे निकालानंतर लागणारा विलंब टाळता येईल. पुढील शिक्षणासाठी वा नोकरीसाठी विद्यार्थी मोकळा होईल,' असे पाटील यांनी स्पष्ट केले. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुणे आवृत्तीचे निवासी संपादक श्रीधर लोणी यांनी तज्ज्ञांकडून आलेले प्रश्न विचारून पाटील यांच्याशी संवाद साधला.

**'पुढील वर्षी प्रवेश परीक्षा वेळेत'**

करोनामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक कोलमडून गेले आहे. महाविद्यालये, विद्यापीठांच्या परीक्षांचे वेळापत्रकही विस्कळित झाले आहे. या संदर्भात नुकतीच 'सीईटी सेल' आणि संबंधित घटकांशी बैठक झाली असून, पुढील वर्षी सर्व परीक्षा आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक कोणत्याही परिस्थितीत सुरळीत करण्याचे आदेश दिले असल्याचे पाटील यांनी सांगितले.

**'गाव तसा अभ्यासक्रम'**

स्थानिक पातळीवरील गरज लक्षात घेऊन अभ्यासक्रम असावेत का, या प्रश्नावर उत्तर देताना पाटील यांनी सांगितले, की प्रत्येक पंचायत समिती, तालुका स्तरावरील व्यावसायिक गरज लक्षात घेऊनच यापुढे अभ्यासक्रम निर्मिती केली जाईल. यामुळेच गावाकडचे तरुण शहरात येणे कमी होईल.

**कौशल्यांशिवाय अभ्यासक्रम नाहीत**

'यापुढे कोणत्याही महाविद्यालयाला अभ्यासक्रम तयार करायचा असल्यास किंवा अभ्यासक्रमात बदल करायचा असल्यास त्यात कौशल्यांचा समावेश करावाच लागेल,' असे पाटील यांनी स्पष्ट केले. 'कौशल्यांच्या प्रशिक्षणामुळेच यापुढे रोजगार निर्मिती होणार असून, अधिकाधिक शिक्षण कौशल्याभिमुख असेल,' याकडे त्यांनी लक्ष वेधले.

**'मराठी विद्यापीठ लवकरच'**

'मराठी विद्यापीठासंदर्भात बरेचसे काम झाले असून, काही तांत्रिक त्रुटी आहेत. त्या सोडवण्यासाठी मराठीच्या तज्ज्ञांनी एकत्र येऊन पुढाकार घ्यावा. तातडीने हा प्रश्न मार्गी लावू,' असे आश्वासन पाटील यांनी दिले. विद्यापीठासाठी निधी आणि आवश्यक त्या गोष्टींची कमी भासू देणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासारख्या महत्त्वाच्या विषयावर कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल 'महाराष्ट्र टाइम्स'चे अभिनंदन! या कार्यक्रमात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांसारखे वक्ते लाभले. शिक्षण संस्थांच्या प्रश्नांवर त्यांनी तपशीलवार उत्तरे दिली. यामुळे शिक्षण क्षेत्रातील लोकांना उत्तम मार्गदर्शन मिळाले.

– डॉ. स्वाती मुजुमदार, प्र-कुलपती, सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी

'महाराष्ट्र टाइम्स'च्या वतीने आयोजित 'पुणे सुपरफास्ट' या उपक्रमाअंतर्गत झालेल्या 'एज्युकेशन स्पेशल'मध्ये शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर महाराष्ट्र टाइम्सकडून अतिशय उत्तम प्रेझेंटेशन सादर करण्यात आले. शैक्षणिक धोरणासारख्या महत्त्वाच्या विषयावर कमी कालावधीत आयोजित केलेल्या या कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी एकत्रित हजेरी लावली. यातून 'मटा'वरील विश्वासार्हता सिद्ध होते.

– प्रा. राहुल कराड, कार्याध्यक्ष, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी

Maharashtra Times 21.10.2022

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# तीन ते आठ वयाच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अभ्यासक्रम आराखडा

## विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सर्वांगीण प्रगतीसाठी 'पंचकोष पद्धती'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशातील तीन ते आठ वर्षे वयाच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकताच जाहीर केला. सुरुवातीच्या टप्प्यात विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती आणि त्यांचा सर्वांगीण विकास या मुद्द्यांवर या आराखड्यात भर देण्यात आला आहे. त्यासाठी पंचकोष पद्धतीची संकल्पना मांडण्यात आली असून, राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी हा आराखडा महत्त्वाचा ठरणार आहे.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा जाहीर केला. राष्ट्रीय शिक्षण धोरणात शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, कमी वयाच्या मुलांसाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, शिक्षक शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा आणि प्रौढ शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा या चार मुद्द्यांवर भर आहे. शिक्षण, मेंदुशास्त्र आणि अर्थशास्त्र या क्षेत्रांमध्ये जगभरात झालेल्या संशोधनातून काही बाबी अधोरेखित झाल्या आहेत. बालपणातच विद्यार्थ्यांना मुक्त, खुले आणि सर्वसमावेशक शिक्षण दिले, तर कोणताही देश भविष्यात उत्तम प्रगती करू शकतो. या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास हीच या क्षेत्रातील सर्वोत्तम गुंतवणूक आहे, असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील पहिली आठ वर्षे अतिशय महत्त्वाची मानली जात असून, या काळात पंचकोष पद्धतीनुसार शिक्षण देणे आवश्यक असल्याचे हा आराखडा सांगतो. शारीरिक विकास, मानसिक विकास, बौद्धिक विकास, जीवन ऊर्जेचा विकास आणि आध्यात्मिक विकास ही पंचकोष पद्धती निश्चित करण्यात आली आहे. प्राचीन संकल्पना असलेल्या पंचकोष पद्धतीमध्ये शरीर आणि मन या दोन्ही पातळीवर विकासाची प्रक्रिया होणे अभिप्रेत आहे.

लोकसत्ता Sun, 23 October 2022 https://epaper.loksatta.com/c/

पुढारी

# इंजिनिअरिंग, फार्मसी, एमबीए आता सहज सोप्या मराठीतून

## नागपूरमधील बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

- अभ्यासक्रमांचे भाषांतर करण्याच्या विद्यापीठांना सूचना
- २४ नोव्हेंबरपर्यंत आराखडा द्यावा लागणार

**नागपूर : पुढारी वृत्तसेवा**

मध्य प्रदेशात वैद्यकीय शिक्षण हिंदीतून उपलब्ध करण्याची घोषणा ताजी असतानाच आता इंजिनिअरिंग, फार्मसी आणि एमबीए या व्यवसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण सहज सोप्या मराठीतून घेता येणार आहे. नागपूरमध्ये उच्च शिक्षण विभागाची महत्त्वपूर्ण बैठक काल पार पडली. त्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या तिन्ही अभ्यासक्रमांचे इंग्रजीतून मराठीमध्ये भाषांतर करण्याच्या सूचना उच्च शिक्षण विभागाने विद्यापीठांना दिल्या आहेत. नागपूर, अमरावती आणि गडचिरोली या तीन विद्यापीठांवर हे अभ्यासक्रम मराठीत आणण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतील शिक्षणावर मोठा भर देण्यात आला आहे. धोरणात उच्च शिक्षणही मातृभाषेतच द्यावे, अशी आग्रही सूचना करण्यात आली आहे. त्या धर्तीवर आता महाराष्ट्रातही व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण मराठी भाषेतून देण्याकरिता पावले उचलण्यात येत आहेत.

हे भाषांतर कशाप्रकारे करण्यात येईल, याचा आराखडा २४ नोव्हेंबरपर्यंत सादर करावा, अशा सूचनाही उच्च शिक्षण विभागाने विद्यापीठांना दिल्या आहेत.

Pune Edition
Oct 23, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

# अभ्यासक्रमांना वर्षानुसार सर्वत्र समान 'क्रेडिट'

## राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रतेचा आराखडा प्रसिद्ध

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील; तसेच देशातील सर्व सरकारी, खासगी विद्यापीठांमध्ये चालवणाऱ्या जाणाऱ्या पदवी, पदविका, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची एका वर्षाची 'क्रेडिट' सारखीच असणार आहेत. यामुळे आता विद्यार्थ्यांना बहुशाखीय अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणे शक्य होणार असून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून हा बदल करण्यात आला आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रतेच्या आराखड्यामध्ये क्रेडिट सिस्टीममध्ये केल्या जात असलेल्या बदलांचा समावेश करण्यात आला असून, या आराखड्यावर ३० नोव्हेंबरपर्यंत सूचना व हरकती मागवण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये प्रमाणपत्र, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासंदर्भात अनेक बदल सुचवण्यात आले आहेत. पदवी घेत असतानाच विद्यार्थ्यांना शिक्षण सोडण्याची किंवा विद्याशाखा बदलण्याची सोय दिली आहे. यामुळे पदवीला प्रवेश घेतलेला विद्यार्थी काही विशिष्ट कालावधीनंतर दुसऱ्या विद्याशाखेकडे आकर्षित होऊ शकतो किंवा त्याने शिक्षण सोडल्यास त्याला प्रमाणपत्र, पदविका मिळू शकणार आहे. या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महाविद्यालयात एका वर्षी सारखीच क्रेडीट असणे अपेक्षित आहे. हाच धागा पकडून उच्च शिक्षण पात्रता आराखड्यामध्ये सर्व महाविद्यालये, विद्यापीठांनी एका वर्षाची किमान क्रेडिट सारखीच असावीत, असा आग्रह धरण्यात आला आहे. उदाहरणार्थ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शिकवल्या जाणाऱ्या एका पदवी अभ्यासक्रमाची एका वर्षाची किमान क्रेडिट, एमआयटी, भारती विद्यापीठासारख्या खासगी विद्यापीठांमध्ये शिकवल्या जाणाऱ्या त्याच अभ्यासक्रमाइतकी असणार आहेत.

विद्यार्थ्यांना या पद्धतीचा फायदा होणार असून, बहुशाखीय शिक्षण प्रणालीत एकसारखे क्रेडीट असल्याने विद्यार्थ्याला मधूनच कॉलेज बदलताना किंवा इतर विषय शिकताना 'क्रेडिट'च्या अडचणी येणार नाहीत. याशिवाय या आराखड्यात इतरही अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली असून, देशातील महाविद्यालये, विद्यापीठांमधून विद्यार्थ्यांना मिळालेली क्रेडिट परदेशातील अभ्यासक्रमांच्या क्रेडिट सिस्टीमशी समकक्ष असावीत, असाही प्रयत्न केला जाणार आहे. यामुळे हा आराखडा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरेल, असे मत शिक्षणतज्ज्ञांनी मांडले आहे.

> "राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रतेचा आराखडा विद्यार्थ्यांच्या क्रेडिट सिस्टीमच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. या आराखड्यात भारतातील व परदेशातील क्रेडिट व्यवस्था समकक्ष स्तरावर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने ही बाब अतिशय महत्त्वाची ठरणार आहे. यामुळे बहुशाखीय शिक्षण प्रणालीमध्येही विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सोपे होईल.
>
> - डॉ. पराग काळकर, अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



### अधिकची 'क्रेडिट' देता येणार

राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखड्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे देशातील सर्व विद्यापीठ, महाविद्यालयांनी एका अभ्यासक्रमाची एका वर्षाची किमान 'क्रेडिट' एकसारखीच ठेवणे अपेक्षित असणार आहे. उदाहरणार्थ : 'बी. कॉम' या अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाला किमान ३० क्रेडिट असतील, तर ती सर्व ठिकाणी सारखी असतील. या व्यतिरिक्त महाविद्यालये किंवा विद्यापीठांना अतिरिक्त क्रेडिट द्यायची झाल्यास ती देता येतील. ही क्रेडिट अतिरिक्त असतील पदवीवर त्याचा उल्लेख असेल; मात्र पदवीसाठी ती बंधनकारक नसतील, असेही आराखड्यात स्पष्ट करण्यात आले.

मटा विशेष

Maharashtra Times 23.10.2022

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

# राज्यातील तासिका प्राध्यापकांची दिवाळी अंधारातच!

**मंत्र्यांच्या आदेशानंतरही कार्यवाही नाही**

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

> **प्रशासनाच्या दिरंगाईमुळे तासिका प्राध्यापकांच्या पदरी वारंवार निराशा येत आहे. त्यामुळे शासनाने ११ महिन्यांसाठी साहाय्यक प्राध्यापकाचे समकक्ष वेतन महिन्याला द्यावे, तासिका धोरण पूर्णपणे बंद करून साहाय्यक प्राध्यापक (तासिका) हे धोरण आखावे.**
>
> **– डॉ. प्रमोद लेंडे,** अध्यक्ष महाराष्ट्र अंशकालीन प्राध्यापक संघटना.

**नागपूर :** उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी २१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत तासिका प्राध्यापकांचे वेतन वाढीव मानधनासह महिन्याला बँकद्वारे निश्चित करण्याचे आदेश दिल्यानंतरही प्रशासनाने आदेशाला हरताळ फासला आहे.

राज्य शासनाने नुकतेच तासिका प्राध्यापकांसाठी एक निश्चित धोरण ठरवले. असे असतानाही त्यांच्या पदरी मात्र निराशाच आहे. महाविकास आघाडी सरकारमधील तत्कालीन शिक्षणमंत्री उदय सावंत यांनी तासिकेत १२५ रुपयांची वाढ करून ६२५ रुपये तासिका अध्यापकाचे मानधन ठरवले. मात्र, त्यातही तास आणि तासिकेचा घोळ करून विभागीय सहसंचालकांनी फक्त ५०० रुपये तासिकेप्रमाणे मानधन देऊन मनमर्जी कारभारावर शिक्कामोर्तब केला. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तासिका प्राध्यापकांना प्रतितासिका १ हजार रुपयांचे मानधन देण्याची घोषणा केली. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्याचा शासननिर्णय मात्र प्रसिद्ध केला नाही. अशातच महाविकास आघाडी सरकार कोसळले आणि प्राध्यापक भरतीही बारगळली.

राज्यातील महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या हजारो जागा रिक्त असल्याने तासिका प्राध्यापकांच्या भरवशावर अध्यापनाचा डोलारा आहे. त्यामुळे त्यांची महिन्याला मानधन मिळावी अशी रास्त मागणी आहे. मंत्र्यांनीही प्रशासनाला तसे आदेश दिले. असे असतानाही प्रशासनाकडून यावर वेळेत कार्यवाही न झाल्याने प्राध्यापकांची दिवाळी अंधारात जाणार हे निश्चित झाले आहे.

लोकसत्ता Mon, 24 October 2022 https://epaper.loksatta.com/c/70656272

पुढारी

# शिक्षणासाठी राष्ट्रीय श्रेयांक आराखडा

## हरकती-सूचना नोंदवण्यासाठी ३० नोव्हेंबरची मुदत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**देशभरातील विद्यार्थ्यांचे मुख्य प्रवाहातील शिक्षण व्यावसायिक कौशल्य जोडण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय श्रेयांक आराखडा सादर केला आहे. या आराखड्याअंतर्गत शालेय शिक्षणापासून विद्यापीठीय शिक्षणापर्यंत श्रेयांक संकल्पना मांडण्यात आली असून हरकती, सूचना नोंदवण्यासाठी ३० नोव्हेंबरची मुदत देण्यात आली आहे.**

शिक्षण अधिक सर्वसमावेशक आणि परिणामकारक करण्यासाठी उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण एकत्र करण्यावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भर देण्यात आला आहे. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केंद्र सरकारकडून राष्ट्रीय श्रेयांक आराखडा तयार करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने तयार केलेला श्रेयांक आराखडा नुकताच प्रसिद्ध करण्यात आला. त्यानुसार राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्याअंतर्गत पूर्वप्राथमिक स्तरापासून ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांना श्रेयांक प्राप्त करता येतील. उदाहरणार्थ पाचवी ते पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात बाराशे तास पूर्ण करावे लागतील. त्यानंतर विद्यार्थ्यांना चाळीस श्रेयांक मिळतील. हे श्रेयांक विद्यार्थ्यांच्या श्रेयांक बँकेत साठवले जातील. अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्सच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांना त्यांनी साठवलेल्या या श्रेयांकाचा वापर त्यांच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी करता येईल. आठशे तासांसाठी २७ श्रेयांक, एक हजार तासांसाठी ३३ श्रेयांक या पद्धतीने श्रेयांकांची रचना करण्यात आली आहे. ऑनलाइन, डिजिटल आणि मिश्र शिक्षणासाठीही श्रेयांक दिले जातील. श्रेयांक मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन बंधनकारक आहे.

नियमित शैक्षणिक अभ्यासक्रमाइतकेच व्यावसायिक अभ्यासक्रमाला आराखड्यात महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे विज्ञान, सामाजिकशास्त्र, वाणिज्य, कला यातील भेदभाव खोडला जाईल. व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना नॅशनल स्कील क्वालिफिकेशन्स फ्रेमवर्कद्वारे अधिस्वीकृत केले जाईल. त्यामुळे विद्यार्थी अधिक रोजगारक्षम होतील, असे नमूद करण्यात आले आहे.

### मल्टिपल एंट्री, मल्टिपल एक्झिटचा पर्याय

श्रेयांक आराखड्यात मल्टिपल एंट्री, मल्टिपल एक्झिटचा पर्याय देण्यात आला आहे. त्यामुळे एखाद्या विद्यार्थ्याचा अभ्यासक्रमातील एखादा विषय सोडायचा असल्यास त्याला तो पर्याय उपलब्ध असेल. विद्यार्थ्यांनी मिळवलेले श्रेयांक आणि त्यांची शैक्षणिक पातळी यानुसार त्यांची क्रमवारी तयार केली जाईल. म्हणजे बारावीचा विद्यार्थी चौथ्या स्तरावर, तीन आणि चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेला विद्यार्थी अनुक्रमे साडेपाच आणि सहाव्या स्तरावर, पीएच.डी.चा विद्यार्थी सर्वोच्च आठव्या स्तरावर असेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### श्रेयांक आराखडा ठरणार 'गेमचेंजर'

देशातील शिक्षण क्षेत्र आमूलाग्र बदलण्यासाठी श्रेयांक आराखडा 'गेमचेंजर' ठरेल. या आराखड्यामुळे शैक्षणिक प्रक्रिया अधिक लवचिक होईल. विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी उपलब्ध अनेक पर्यायांतून मार्गक्रमण करता येईल, असे नमूद करण्यात आले आहे.

Pune Edition
Oct 24, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

नवभारत

# छात्राओं की सुरक्षा के नए दिशानिर्देश

## यूजीसी ने मांगे सुझाव

## महिला सुरक्षा सभी के लिए सर्वोपरि

■ **दिल्ली,** एजेंसियां. देश के उच्च शिक्षण संस्थानों में सभी छात्रों खास तौर पर लड़कियों, महिला कर्मचारियों के लिये सुरक्षित एवं हिंसा मुक्त वातावरण सुनिश्चित करने के लिये विश्वविद्यालय अनुदान आयोग (यूजीसी) ने राष्ट्रीय शिक्षा नीति के अनुरूप नये दिशानिर्देश तैयार किये हैं. आयोग ने इन पर सभी हितधारकों से 14 नवंबर तक सुझाव मांगे हैं. यूजीसी के सचिव प्रो. राजनीश जैन द्वारा जारी सार्वजनिक नोटिस में उच्च शिक्षण संस्थानों में महिला एवं महिलाओं की सुरक्षा, सुरक्षितत वातावरण को लेकर बुनियादी सुविधाएं और साधन के लिये दिशानिर्देश विकसित करने की बात कही गई है. आयोग ने कहा है कि इस पर सभी हितधारक 14 नवंबर तक विचार/सुझाव भेज सकते हैं.



दिशानिर्देश में कहा गया है कि उच्च शिक्षण संस्थानों में छात्रों को दाखिले के समय एक पुस्तिका दी जानी चाहिए जिसमें उपयुक्त व्यवहार एवं आचरण की अपेक्षा सहित नियमों एवं नियमन का विस्तृत ब्यौरा दिया गया हो. इसमें कहा गया है कि छात्रों की मनोवैज्ञानिक एवं भावनात्मक चिंताओं को ध्यान में रखते हुए परिसर में पेशेवर काउंसलिंग की सेवा उपलब्ध करायी जानी चाहिए. यूजीसी के दिशानिर्देशों में कहा गया है कि महिलाओं की सुरक्षा सभी के लिये सर्वोपरि है. ऐसे में उच्च शिक्षण संस्थानों के परिसरों में सुरक्षा के लिहाज से पूरी तरह से सुसज्जित होने चाहिए.

Pune Edition
25-october-2022 Page No. 12
epaper.enavabharat.com

# शालेय गुणवत्ता वाढविण्यासाठी 'विद्यांजली'

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २५** - शालेय शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी लोकसहभाग व स्वयंसेवी सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाच्या शिक्षण मंत्रालयाने 'विद्यांजली' ही स्वयंसेवक व्यवस्थापन प्रणाली विकसित केली आहे. या उपक्रमासाठी राज्यातील ५६ हजार ८३२ शाळांची नोंदणी झाली आहे. १ हजार १४८ स्वयंसेवकांनी सहभागाची तयारीही दर्शविली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीकोनातून खासगी क्षेत्राच्या सहभागाची आवश्यकता विषद केलेली आहे. त्यासाठीही विद्यांजली उपक्रम महत्वाची भूमिका बजाविणार आहे. यात भारतीय नागरिक, अनिवासी भारतीय व नोंदणीकृत संस्था या शासकीय व खासगी अनुदानित शाळांना कोणताही मोबदला, मानधन न घेता सेवा प्रदान करु शकतात. कृतीशील ज्येष्ठ नागरिक, माजी विद्यार्थी, स्थानिक समुदायातील व्यक्ती, गृहिणी, शिक्षित स्वयंसेवक, निवृत्त वैज्ञानिक, शासकीय, निमशासकीय अधिकारी, कर्मचारी, सशस्त्र दलातील व्यक्ती हे शाळांच्या विनंतीनुसार स्वयंसेवक म्हणून काम करु शकणार आहेत.




विषय अध्यापनात सहकार्य, कला, कार्यानुभव, योग, क्रीडा, भाषा, व्यावसायिक कौशल्ये यांचे अध्यापन करणे, दिव्यांग विद्यार्थ्यांना अध्ययनास सहकार्य करणे, प्रौढ शिक्षणात सहभाग, व्यवसाय मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, पौष्टिक आहार मार्गदर्शन करता येणार आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिबीरे, मुलींसाठी स्व-संरक्षण प्रशिक्षणही उपलब्ध करुन देण्याची संधी मिळणार आहे.

राज्यात एकूण ९१ हजार ३८४ शाळा आहेत. यातील ६२.१९ टक्के शाळांनी उपक्रमासाठी नोंदणी केलेली आहे. पुणे जिल्ह्यात एकूण ५ हजार ६७८ शाळा असून, १ हजार ५९० शाळांची नोंदणी झालेली आहे. यात केवळ ८४ स्वयंसेवकांनी नोंदणी केलेली आहे. उपक्रमात सहभागी होण्यासाठी स्वयंसेवक, संस्थांना विद्यांजली पोर्टलवर नोंदणी करण्याचे बंधन घालण्यात आले आहे.

प्रभात
PuneCity, 26 Oct 2022, Page:008
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

लोकमत

# कंत्राटी सहायक प्राध्यापक नियुक्ती कधी?

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील १३२ कंत्राटी सहायक प्राध्यापकांच्या नियुक्त्यांकरिता मुलाखती झाल्या. त्यालाही सुमारे दोन महिने उलटले तरीही अद्याप विद्यापीठाकडून निकाल जाहीर झालेला नाही. विद्यापीठात अनेक प्राध्यापक तासिका तत्त्वांवर शिकवत आहेत. तर काही ठिकाणी कंत्राटी सहायक प्राध्यापक शिकवत असलेल्या विषयांचे अध्यापनदेखील खंडित झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.

यंदा विद्यापीठाने कंत्राटी प्राध्यापकांच्या नियुक्त्यांचे केंद्रीकरण केले आहे. तसेच, यामध्ये आरक्षणाचे तत्त्व विद्यापीठीय पातळीवर लागू केले असल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. विद्यापीठातील ५२ विभागांमधील प्राध्यापकांची पदे रिक्त झाले आहेत. यामध्ये महाविद्यालयांमधील तसेच कृषी विद्यापीठांमधील प्राध्यापकांचा समावेश आहे.

काही महिन्यांपासून विविध विभागांतील विद्यार्थ्यांना शिकवण्यात अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळेच विद्यापीठाने कंत्राटी तत्त्वावर १३२ प्राध्यापकांची पदे भरण्याची प्रक्रियादेखील सुरू केली होती. या प्राध्यापकांना सप्टेंबर महिन्यातच नियुक्तिपत्र दिले जाणार होते. परंतु ते अद्याप दिलेले नाही. त्यामुळे मुलाखत दिलेल्या उमेदवाराकडून नियुक्ती आदेश केव्हा दिले जाणार याबाबत वारंवार विचारणा केली जात आहे.

## विद्यापीठाच्या तिजोरीवर ताण

राज्य शासनाने विद्यापीठातील रिक्तपदे भरण्यास मान्यता दिलेली नाही, तर काही विभागांवर तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांची नियुक्ती करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे विद्यापीठांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विद्यापीठ प्रशासनाने फंडातून प्राध्यापकांची नियुक्ती केली. त्यामुळे विद्यापीठाच्या तिजोरीवर त्याचा ताण पडत आहे.

येत्या १ नोव्हेंबरपासून संबंधित प्राध्यापकांना विद्यापीठात रुजू होण्यासाठीचे नियुक्तिपत्र दि. २९ ऑक्टोबरपासून दिले जाईल. विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार विविध विभागांमध्ये रिक्त पदांसाठी पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात आली होती. यानुसार उमेदवारांची अंतिम यादी निश्चित केली असून, सध्याच्या सुटीमुळे ते १ नोव्हेंबरपासून रुजू होतील.

**- डॉ. संजीव सोनवणे,**
प्र-कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



## समन्वय नसल्याची चर्चा

विद्यापीठाचे कुलगुरु कारभारी काळे यांच्या परस्पर काही निर्णय घेतले जात असल्याची माहिती अलीकडेच समोर आली आहे. प्र-कुलगुरु डॉ. संजीव सोनावणे आणि कुलसचिव प्रफुल्ल पवार यांच्यातील सुप्त संघर्षामुळे विद्यापीठाच्या कारभारामध्ये समन्वय नसल्याचेही बोलले जात आहे.

Hello Pune
Page No. 3 Oct 26, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

लोकमत

# यंदाची अकरावी प्रवेश प्रक्रिया संपली

### ३३ हजार जागा रिक्त : व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे ओढा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** यंदाची अकरावी प्रवेश प्रक्रिया संपल्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाने जाहीर केले आहे. या प्रवेश प्रक्रियेत यंदादेखील 33 हजार जागा रिक्तच राहिल्या आहेत. दरवर्षी २२ हजारांच्या आसपास जागा रिक्त राहतात. मात्र, यावर्षी विक्रमी 33 हजार जागा रिक्त राहिल्या आहेत, तर दुसरीकडे काही महाविद्यालयांमध्ये चुरस असल्याने त्यांचा कटऑफ ९५ ते ९८ टक्के इतका वाढल्याचे पाहायला मिळाले.

राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयातर्फे पुणे पिंपरी-चिंचवडसह मुंबई, नाशिक, अमरावती, नागपूर महापालिका क्षेत्रांतील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. याअंतर्गत तीन नियमित फेऱ्या, तीन विशेष फेऱ्या आणि २६ सप्टेंबर ते २१ ऑक्टोबरपर्यंत दैनंदिन गुणवत्ता विशेष फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले. प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांना संधी मिळावी यासाठी ही दैनंदिन गुणवत्ता फेरी म्हणजेच सतत विशेष फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर प्रवेश प्रक्रियेसंदर्भात कोणतीही प्रक्रिया करण्यात आली नाही.

दरम्यान, गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा विद्यार्थ्यांनी अपेक्षित प्रतिसाद दिला नाही असे दिसून आले.

### अशी झाली अकरावी प्रवेश प्रक्रिया

- एकूण महाविद्यालये - ३१९
- एकूण प्रवेशक्षमता - १११९९०
- एकूण नोंदणी - १०७९५३
- कोटा प्रवेशक्षमता - १५५५५
- कोटांतर्गत प्रवेश - १०२२०
- कॅप प्रवेशक्षमता - ९६४३५
- कॅप अंतर्गत अर्ज - ७६०४९
- एकूण प्रवेश - ७८९२४
- रिक्त जागा - ३३०६६



दरवर्षी प्रवेशाच्या साधारण २० हजारांवर जागा रिक्त राहतात. यंदा मात्र ३३ हजार जागा रिक्त राहिल्या. विद्यार्थ्यांनी यंदा दहावीनंतरचे डिप्लोमा कोर्सेस, आयटीआय, तंत्रशिक्षण आदींकडे प्रवेशासाठी पावले उचलल्यामुळे अकरावी प्रवेशाच्या जागा रिक्त राहिल्या. प्रवेश प्रक्रिया संपली असून प्रवेशासाठी कोणतीही फेरी होणार नाही, असे संचालक महेश पालकर यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 4 Oct 26, 2022
Powered by: erelego.com

# ऑनलाइन पीएच.डी.ला मान्यता नाही

### यूजीसीकडून स्पष्ट इशारा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** परदेशी शिक्षण संस्थांच्या सहकार्याने ऑनलाइन पीएच.डी. अभ्यासक्रमांची जाहिरात एज्युटेक कंपन्यांकडून करण्यात येत आहे. मात्र ऑनलाइन पीएच.डी.ला मान्यता नसल्याचा इशारा देत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यापूर्वी पडताळणी करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) स्पष्ट केले.

यूजीसीकडून या संदर्भातील निवेदन प्रसिद्ध करण्यात आले आहे. पीएच.डी.ची गुणवत्ता राखण्यासाठी यूजीसी (एम.फिल., पीएच.डी. पदवी देण्यासाठीचे किमान निकष आणि प्रक्रिया) अधिनियम २०१६ प्रसिद्ध करण्यात आले आहेत. देशभरातील सर्व उच्च शिक्षण संस्थांना या नियमांचे आणि त्यातील बदलांचे पालन करणे बंधनकारक आहे.

परदेशी शिक्षण संस्थांच्या सहकार्याने ऑनलाइन पीएच.डी. अभ्यासक्रमांबाबतच्या एज्युटेक कंपन्यांच्या जाहिरातींना विद्यार्थ्यांनी बळी पडू नये. अशा ऑनलाइन पीएच.डी. अभ्यासक्रमांना यूजीसीची मान्यता नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संबंधित अभ्यासक्रम यूजीसी अधिनियम २०१६ नुसार असल्याबाबत सत्यतेची पडताळणी केल्याशिवाय प्रवेश घेऊ नये, असे नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Sat, 29 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70706609

# ऑनलाइन पीएच.डी.ला मान्यता नाहीच : यूजीसी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २८ -** ऑनलाइन पीएच.डी. ला मान्यता नसल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) स्पष्ट केले आहे. सध्या परदेशी शिक्षण संस्थांच्या सहकार्याने ऑनलाइन पीएच.डी. अभ्यासक्रमांची जाहिरात एज्युटेक कंपन्यांकडून करण्यात येत आहे. मात्र ऑनलाइन पीएच.डी.ला मान्यता नाही, असेही 'यूजीसी'ने म्हटले आहे.

पीएच.डी.ची गुणवत्ता राखण्यासाठी युजीसी (एम.फिल., पीएच.डी. पदवी देण्यासाठीचे किमान निकष आणि प्रक्रिया) अधिनियम २०१६ प्रसिद्ध करण्यात आले आहेत. देशभरातील सर्व उच्च शिक्षण संस्थांना या नियमांचे आणि त्यातील बदलांचे पालन करणे बंधनकारक आहे. परदेशी शिक्षण संस्थांच्या सहकार्याने ऑनलाइन पीएच. डी. अभ्यासक्रमांबाबतच्या एज्युटेक कंपन्यांच्या जाहिरातींना विद्यार्थ्यांनी बळी पडू नये. अशा ऑनलाइन पीएच.डी. अभ्यासक्रमांना यूजीसीची मान्यता नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सत्यतेची पडताळणी केल्याशिवाय प्रवेश घेऊ नये, असे नमूद करण्यात आले आहे.

प्रभात PuneCity, 29 Oct 2022, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

# News Paper Clippings During October 2022

## Section: Education

# सहायक प्राध्यापक भरतीसाठी राज्यभरात 'सत्याग्रह'

### राज्य शासनाच्या नावाने रस्त्यावरच पेटवले दिवे

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २८** - राज्यभरातील वरिष्ठ महाविद्यालयात सहायक प्राध्यापकांची भरती बंद आहे. त्यामुळे नेट, सेट, पीएच. डी. धारक तरुणांनी सहायक प्राध्यापक भरतीसाठी राज्यभरात सत्याग्रह आंदोलन सुरू केले. नेट, सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समितीने उच्च शिक्षण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले असून, राज्य शासनाच्या नावाने रस्त्यावरच दिवे पेटवण्यात आले.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्देशांनुसार शंभर टक्के सहायक प्राध्यापक भरती, तासिका तत्त्व धोरण बंद करून समान काम समान वेतन, तीन हजार पदांसाठी सुरू असलेली प्राध्यापक भरती गतिमान करून पुढील शंभर टक्के सहायक प्राध्यापक भरती सुरू करावी, विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये कायमस्वरूपी पूर्णवेळ सहायक प्राध्यापकांची नेमणूक करावी या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येत आहे. प्राध्यापक भरती करण्यावरून केवळ आश्वासन देण्या येत आहे. मात्र कृती होत नाही. दैनंदिन जीवनाचा गाडा चालवणे अशक्य झाल्याने रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय राहिला नाही. आता शासनाने तातडीने प्राध्यापक भरती करण्याची मागणी समितीने केली.

प्रभात PuneCity, 29 Oct 2022, Page:003
https://epaper.dainikprabhat.com

# प्राध्यापक भरतीच्या मागणीसाठी उच्चशिक्षितांची रस्त्यावर दिवाळी

### नेट, सेट, पीएच.डी.धारक संघर्ष समितीचे आंदोलन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : राज्यभरातील वरिष्ठ महाविद्यालयात साहाय्यक प्राध्यापकांची भरती बंद असल्याने नेट, सेट, पीएच.डी. धारक तरुणांनी साहाय्यक प्राध्यापक भरतीसाठी राज्यभरात सत्याग्रह आंदोलन सुरू केले आहे. नेट, सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समितीने पुण्यातील उच्च शिक्षण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले असून, राज्य शासनाच्या नावाने रस्त्यावरच दिवे पेटवण्यात आले.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्देशांनुसार शंभर टक्के सहायक प्राध्यापक भरती, तासिका तत्त्व धोरण बंद करून समान काम समान वेतन, २ हजार ८८ पदांसाठी सुरू असलेली प्राध्यापक भरती गतिमान करून पुढील शंभर टक्के सहायक प्राध्यापक भरती सुरू करावी, विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये कायमस्वरूपी पूर्णवेळ सहायक प्राध्यापकांची नेमणूक करावी, या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येत आहे. प्राध्यापक भरती करण्याच्या आश्वासनावर उच्चशिक्षित बेरोजगारांची केवळ बोळवण करण्यात आली. दैनंदिन जीवनाचा गाडा चालवणे अशक्य झाल्याने रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय राहिला नाही. आता शासनाने तातडीने प्राध्यापक भरती करण्याची मागणी समितीने केली.

लोकसत्ता Sat, 29 October 2022
https://epaper.loksatta.com/c/

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

सकाळ

# विविध मागण्यांसाठी 'नेट-सेट'धारकांचे आंदोलन

**पुणे, ता. २८ :** केंद्र सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आदेशानुसार १०० टक्के प्राध्यापक भरती करणे, तासिका तत्त्व धोरण बंद करून 'समान काम समान वेतन' लागू करावे, अशा मागण्यांसाठी नेट-सेट पीएचडीधारक संघर्ष समितीच्या वतीने 'सत्याग्रह ०३' हे आंदोलन उच्च शिक्षण संचालक कार्यालयासमोर गुरुवारपासून सुरू करण्यात आले.

केंद्र सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आदेशांना हरताळ फासणाऱ्या राज्य सरकारच्या धोरणांविरोधात समितीतर्फे तीन दिवसीय आंदोलन मध्यवर्ती कार्यालयासमोर सुरू आहे. विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये कायमस्वरूपी पूर्णवेळ सहायक प्राध्यापकांची नियुक्ती करणे, सुरू असलेली प्राध्यापक भरती गतिमान करून वेळेत पूर्ण करणे, अशा प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. समितीच्या वतीने 'उच्च शिक्षितांची संघर्ष पदयात्रा' शनिवारी (ता. २९) काढण्यात येणार आहे. उच्च शिक्षण संचालक कार्यालय, जुना बाजार, महापालिका, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुख्य इमारत या मार्गे ही पदयात्रा जाणार असून, त्यानंतर कुलगुरू कार्यालय आणि सेट भवन येथे आंदोलक जाणार आहेत, अशी माहिती समितीतर्फे देण्यात आली.

राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिवाळीपूर्वी विद्यापीठात नेट-सेटधारकांची आणि विविध संघटनांची बैठक घेतली होती. या बैठकीला चर्चेच्या स्वरूपापेक्षा मेळाव्याचेच स्वरूप होते. तसेच, सध्या मंत्री महोदय पुण्यात असून दिवाळी फराळाचे कार्यक्रम करत आहेत. त्याऐवजी त्यांनी आपल्या खात्याशी संबंधित संघटनेच्या आंदोलकांना भेटणे अपेक्षित होते, असे नेट-सेट, पीएचडीधारक संघर्ष समितीचे राज्य समन्वयक प्रा. सुरेश देवढे-पाटील यांनी सांगितले.

Pune, Pune-Today
29/10/2022 Page No. 1

# News Paper Clippings During October 2022

## Section: Education

# STUDENTS, YOU HAVE BEEN 'MARKED'!

**NEP for complete overhaul of grading from school level; evaluation based on overall achievements by pupils in orals, practicals, classroom studies & self-studies, not just on what they score in written exams, say experts**

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

Students will no more be marked on the basis of how they perform mainly in the written exams and partly in orals and practicals, but their overall performance in orals, practicals, classroom studies and self-studies will be taken into consideration, as per the National Credit Policy Framework (NCPF), say education experts.

"Moreover, the students' achievements in tests like the Maths Olympiad, sports and art competitions will be graded," education experts told *Mirror*.

The NCPF, announced by the Centre recently as a part of the New Education Policy (NEP) 2020, will mean revolutionary steps in the education system.

Although these changes are currently being implemented at a slow pace, the plans for changes in different subjects in accordance with the basic policy plan explain the changing direction of education.

The current assessment system in the education journey from pre-primary to PhD is likely to change completely under this new policy. It is recommended that the merit evaluation system, which is currently in force at the higher education level, should now be implemented from the school level.

Education expert Siddharth Meshram, who is working on the central government project, said that currently, the credit evaluation system is in force in higher education. "Although the students are given grades currently, it is done according to the marks they obtain. Evaluation at the school level, that is up to Class XII, is preferably done on the basis of marks scored in written, oral and practical exams. According to the recently announced National Merit Plan, the Centre wants to implement the Merit Evaluation System from the school level," he said.



Students' performance in tests like Maths Olympiad, sports and art competitions will also be graded

According to Meshram, the new evaluation system will be implemented from the pre-primary classes itself and self-study is expected. Each year, there will be an assessment of 1,000 hours of classroom teaching and 200 hours of self-study. From classes IX to XII, 1,080 hours out of 1,200 hours will be taught in class and 120 hours will be classified as self-study.

"Each year, from Class VI onwards, there will be 40 credits and at least five subjects have to be studied. Accordingly, each subject will be of eight credits. Along with classroom studies, self-study of students, success in competitions like Maths Olympiad, sports and art competitions will be taken into consideration. During the evaluation, special provisions are recommended for students participating in various activities and competitions. At the same time, students will get credit marks even if they do a skills development course."

Vikram Adsul, national teacher and ITC 2018 award winner, said that according to the NEP, school education is structured as five years from pre-primary to Class II, three years from classes III to V, three years from classes VI to VIII and four years from classes IX to XII (5+3+3+4).

"In the first phase, there will be a structure of 800 hours of teaching and 27 credits for it every year. In the second phase, the teaching hours will be 1,000 and the total number of credits will be three each year. From the third phase that is from class VI, the teaching hours will be 1,200. From this stage, practicals, projects and self-study are expected to be done along with classroom teaching," he said.

Adsul said that each year from Class VI onwards, there will be 40 credits and at least five subjects will have to be studied. Accordingly, each subject will be of eight credits. Along with classroom studies, self-study of students, success in competitions like Olympiads, sports and art competitions will also be taken into account.

### CREDIT RATING SYSTEM

Flexibility is the basic principle of this system. The credit system has been adopted so that the student can learn the subjects he/she likes and the same should be taken into account during the evaluation. Students are assessed through a combination of classroom teaching, hands-on work and the application of learning skills. The level of progress of the students is determined by taking into account the skills acquired beyond the answers written in the two-three hours of exams. Students are graded on the basis of credit scores, rather than on percentage or marks statistics to measure their skills.

Veteran education expert A L Deshmukh said the flexibility expected from the school level can be achieved under the new evaluation system. "It was suggested that students should be given more subject options from the school level and should be allowed to study the subjects of their interest," he said.

"Additionally, students will receive credit for the skills they have acquired at each level. Accordingly, students will be allowed to change courses, drop out or get re-admitted at any stage. A provision has been made in the credit scheme to implement this change at the school level."

Deshmukh said that for example, if a Class V student leaves school after obtaining the required credit, he/she re-qualifies for admission to Class VIII through a skills development course. "There will be equality in the evaluation of all education boards and states across the country."

Educationist Heramb Kulkarni said the goal of universalisation of education along with quality improvement has always been a priority in the Indian education system. "These challenges have to be considered while implementing the new assessment system. Basically, there is a lot of confusion at the level of school education over the conduct of exams and evaluation. It has been almost a decade since the credit system was implemented in higher education. However, there are still difficulties in its implementation. Many universities have not fully implemented it yet."

Pune Mirror 29.10.2022

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Education*

सकाळ

### विद्यापीठ : सहा जागांसाठी २७ नोव्हेंबरला मतदान

# 'व्यवस्थापन'ची निवडणूक जाहीर



**पुणे, ता. २९ :** दोन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अखेर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकांचे पडघम वाजले असून, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांतील व्यवस्थापन परिषदेच्या सहा सदस्यांची निवडणूक सूचना जाहीर करण्यात आली आहे. २७ नोव्हेंबरला मतदान तर मतमोजणी २९ नोव्हेंबरला करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) सदस्यांचा कार्यकाळ ऑगस्ट २०२२ मध्ये पूर्ण झाला होता. त्यानंतर अधिसभेच्या निवडणुका या ओबीसी आरक्षणासह घ्यायच्या की आरक्षणाशिवाय याविषयी विद्यापीठामध्ये संभ्रमाचे वातावरण होते.

दोन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर आता निवडणूक जाहीर झाली आहे. पुणे, अहमदनगर आणि नाशिक अशा तीन जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या विद्यापीठात पदवीधर, व्यवस्थापन प्रतिनिधी यासह प्राध्यापक, प्राचार्य गटातील प्रतिनिधींची निवड करण्यासाठी निवडणूक होणार आहे. सहा जागांपैकी एक जागा महिला तर एक जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे.

#### नेत्यांच्या नातेवाइकांचे स्वारस्य

**नोव्हेंबर २०१७ मध्ये झालेल्या या निवडणुकीत प्रगती पॅनेल व एकता पॅनेलमध्ये लढत रंगली होती. राज्यातील सर्वपक्षीय नेत्यांच्या नातेवाइकांनी बाजी मारल्यामुळे राज्याचे लक्ष या निवडणुकीकडे होते. यात प्रामुख्याने माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे चुलत बंधू प्रसेनजित फडणवीस, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे चुलत बंधू अनिल विखे-पाटील या निवडणुकीत विजयी झाले होते.**

#### महत्त्वाच्या तारखा

- अर्ज दाखल करणे : १० नोव्हेंबर
- अर्ज मागे घेणे : १२ नोव्हेंबर
- मतदान : २७ नोव्हेंबर
- मतमोजणी आणि निकाल : २९ नोव्हेंबर

#### मतदान केंद्र

- पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड
- नगर : सारडा महाविद्यालय
- नाशिक : एच.पी.टी. महाविद्यालय

Pune, Main
30/10/2022 Page No. 3

सकाळ

### यूजीसीची मार्गदर्शक तत्त्वे; १४ नोव्हेंबरपर्यंत मागविल्या सूचना

# महाविद्यालयांत आता 'महिला कक्ष'

**पुणे, ता. २८ :** विद्यार्थिनींची सुरक्षितता आणि त्यांच्या संदर्भातील धोरणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी महाविद्यालयांत आता 'महिला कक्षा'ची स्थापना करण्यात येणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) यासंबंधीचे मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून, या संबंधी १४ नोव्हेंबरपर्यंत सूचनाही मागविल्या आहे.

उच्च शिक्षण संस्थांमधील महिला सुरक्षेच्या धोरणाचा आढावा घेण्यासाठी यूजीसीने नुकत्याच एका समितीचे गठण केले होते. त्या समितीच्या अहवालाच्या आधारे हे तातडीचे निर्देश दिले आहे. विद्यार्थिनींमध्ये जागृती आणि संवेदनशीलता निर्माण करण्याबरोबर, आपत्कालीन प्रसंगी मार्गदर्शन पुरविण्यासाठी विशेष महिला कक्षाची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर महाविद्यालयांमध्ये महिलांसाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधांबरोबरच सुरक्षित वातावरण पुरविण्याचे निर्देशही देण्यात आले आहे. महाविद्यालयांच्या आवारात किंवा बाहेरही विद्यार्थिनींवर अत्याचार झाल्यावर, त्या संबंधी तक्रार करण्याची प्रमाण कमी असल्याचे दिसून आले आहे. अशा तक्रारींसदर्भातील शांतता आणि महाविद्यालयांची बोटचेपी भूमिका यूजीसीला खटकली म्हणूनच मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत.

> **सर्वच उच्च शिक्षण संस्थांमध्ये महिलांची सुरक्षितता आणि पायाभूत सुविधांच्या सुनिश्चिततेसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने काही ठोस पावले उचलल्याचे दिसत आहे.**
> - **डॉ. पराग काळकर**, अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

#### समितीचे मार्गदर्शक तत्त्वे..

- प्रवेशावेळी विद्यार्थ्यांना वर्तनासंबंधीची मार्गदर्शक पुस्तिका देण्यात यावी
- भावनिक प्रसंगांना हाताळण्यासाठी महाविद्यालयांत तज्ज्ञांची समिती असावी
- विद्यार्थिनींसाठीच स्वच्छतागृह, आराम कक्ष, सॅनिटरी पॅड डिस्पोजल सुविधा अनिवार्य
- महाविद्यालया, वसतिगृहे, मैदानात पुरेसा उजेड राहील, अशी व्यवस्था आवश्यक
- महिला सुरक्षा रक्षकांची पुरेशी कुमक असावी
- प्राथमिक आरोग्य केंद्र, आवारास सुरक्षा भिंत, सीसीटीव्ही कॅमेरे सुस्थितीत असावेत

Pune, Main
29/10/2022 Page No. 2

## *News Paper Clippings During October 2022*

### *Section: Education*

### महाविद्यालयांत महिला कक्ष स्थापन करा : यूजीसी

**पुणे, दि. ३० -** विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी महाविद्यालयांत महिला कक्ष स्थापन करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहे. यूजीसीने याबाबतचे मार्गदर्शक तत्वे प्रसिद्ध केली असून, त्यावर सूचनाही मागविल्या आहेत.

उच्च शिक्षण संस्थांमधील महिला सुरक्षेच्या धोरणाचा आढावा घेण्यासाठी यूजीसीने नुकत्याच एका समितीचे गठण केले होते. त्या समितीच्या अहवालाच्या आधारे हे तातडीचे आदेश दिले आहेत. विद्यार्थिनींमध्ये जागृती निर्माण करण्याबरोबर, आपत्कालीन प्रसंगी मार्गदर्शन पुरविण्यासाठी विशेष महिला कक्षाची तरतूद आहे.

प्रभात PuneCity,
https://epa

# News Paper Clippings During October 2022

## Section: Research

# क्वांटम क्षेत्रातील संशोधनाचा सन्मान

## ॲस्पेक्ट, क्लॉजर आणि झायलिंगर यांना भौतिकशास्त्राचे नोबेल



**स्टॉकहोम, ता. ४ :** एन्क्रिप्शन क्षेत्रात अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या क्वांटम इन्फॉर्मिशन विज्ञानावर आधारित संशोधनासाठी तीन शास्त्रज्ञांना संयुक्तपणे भौतिकशास्त्रासाठी नोबेल पुरस्कार जाहीर झाला. ॲलन ॲस्पेक्ट (फ्रान्स), जॉन क्लॉजर (अमेरिका) आणि अँटोन झायलिंगर (ऑस्ट्रिया) अशी त्यांची नावे आहेत. दोन फोटॉनमध्ये मोठे अंतर असूनही ते एकमेकांशी कसे जोडलेले असतात, ते शास्त्रज्ञांनी शोधून काढल्याचे रॉयल स्वीडिश अकादमीने पुरस्कार जाहीर करताना सांगितले.

'क्वांटम इन्फॉर्मिशन विज्ञान हे वेगाने विकसित होणारे क्षेत्र असून माहितीचे सुरक्षित आदानप्रदान आणि सेन्सिंग तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रांच्या विस्तारामध्ये या विज्ञानाचा मोठा वाटा असेल. यामुळे संशोधनाचे एक नवे दालन उघडले गेले असून अंतराचे मोजमाप म्हणजे काय, याबाबतच्या आपल्या आतापर्यंतच्या समजूतीलाच त्यामुळे धक्का बसला आहे,' असे समितीने म्हटले आहे. एकमेकांत गुंतलेले फोटॉन, याबाबतच्या प्रस्थापित नियमांमधील त्रुटी शोधणे आणि क्वांटम इन्फॉर्मिशन विज्ञानाची पायाभरणी केल्याबद्दल तिघांना नोबेल जाहीर करत असल्याचे या समितीने सांगितले. या क्षेत्रातील संशोधनासाठी नोबेल जाहीर झाल्याचे समजताच आनंदाचा धक्का बसल्याची प्रतिक्रिया झायलिंगर यांनी दिली. झायलिंगर हे ७७ वर्षांचे असून ते व्हिएन्ना विद्यापीठात संशोधन करतात. ॲलन ॲस्पेक्ट, जॉन क्लॉजर आणि अँटोन झायलिंगर या तिघांना २०१० मध्ये इस्राईलमधील प्रतिष्ठेचा 'वूल्फ' पुरस्कार मिळाला होता. तेव्हापासूनच त्यांचे नाव चर्चेत होते. याबाबत प्रयोग सुरू केला त्यावेळी तो केवळ संकल्पनेच्या पातळीवर होता.



ॲलेन ॲस्पेक्ट जॉन क्लॉजर अँटोन झायलिंगर

### विजेत्यांनी केलेले काम

विजेत्या शास्त्रज्ञांनी स्वतंत्रपणे काम करत विविध प्रयोग केले. सध्या ७९ वर्षे वय असलेल्या जॉन क्लॉजर यांनी क्वांटम थिअरी विकसित केली आणि त्यांचे प्रयोग सुरु केले. ॲस्पेक्ट यांनी त्यातील त्रुटी शोधून काढल्या तर झायलिंगर यांनी, क्वांटम टेलिपोर्टेशनमुळे दूर अंतरापर्यंत माहितीची देवाणघेवाण प्रभावीपणे शक्य आहे, हे सिद्ध करून दाखविले. फोटॉन एकमेकांमध्ये अडकवून सूक्ष्म कणांमध्ये असलेली माहिती दुसऱ्या ठिकाणी पाठविता येते आणि त्या दुसऱ्या ठिकाणी ते सूक्ष्म कण पुन्हा एकजीव होतात. हा प्रयोग केवळ सूक्ष्म कणांपुरताच मर्यादित आहे, असे झायलिंगर यांनी स्पष्ट केले.

Sakaal 5.10.2022

# News Paper Clippings During October 2022

## Section: Research

पुढारी

# फ्रेंच लेखिका ॲनी यांना साहित्यातील नोबेल

## सोप्या भाषेत मांडले अत्यंत गंभीर विषय

**स्टॉकहोम : वृत्तसंस्था**



यंदाचे साहित्यासाठीचे नोबेल पारितोषिक फ्रेंच लेखिका ॲनी ॲरनॉक्स (८२) यांना जाहीर करण्यात आले आहे. सोप्या भाषेत गंभीर विषय मांडण्याची ॲनी यांची हातोटी आहे. त्यांच्या लिखाणात धाडस आहे, असे नोबेल निवड समितीने म्हटले आहे.

ॲनी यांनी सुमारे ४० पुस्तके लिहिली आहेत. बहुतांश सर्वच पुस्तके फ्रेंच भाषेत आहेत. त्यापैकी काहींचे इंग्रजीत अनुवाद झाले. 'पॅशन सिंपल', 'ला प्लेस', 'द इयर्स', 'अ फ्रोझन वुमन' ही त्यांची पुस्तके चर्चेचा विषय ठरली.

### रसायनशास्त्रातील नोबेल तिघांना

अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या कॅरोलिन बर्टोझी, डेन्मार्कमधील कोपनहेगन विद्यापीठाचे मॉर्टन मेडेल आणि अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथील स्क्रिप्स रिसर्चचे बॅरी शार्पलेस यांना रसायनशास्त्रासाठीचे नोबेल जाहीर झाले आहे. एकाच वेळी अणूंचे विखंडन करण्याची पद्धत त्यांनी विकसित केली.

Pune Edition
Oct 7, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

---

### 'बँका आणि आर्थिक संकट' यावरील संशोधनाचा सन्मान

# अमेरिकेचे बर्नांके, डायमंड आणि डिब्विग यांना अर्थशास्त्राचे नोबेल

**पीटीआय, स्टॉकहोम**

**'बँका आणि** आर्थिक संकट' या संशोधनासाठी यंदाचे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हचे माजी अध्यक्ष बेन एस. बर्नांके, अर्थशास्त्रज्ञ डग्लस डब्ल्यू. डायमंड आणि फिलिप एच. डिब्विग यांना जाहीर झाले.

''बँकांच्या अस्तित्वाचे महत्त्व काय, त्यांना संकटातही कसे सुरक्षित ठेवता येईल आणि बँकांची दिवाळखोरी आर्थिक संकट कसे गडद करते, या संशोधनाचा पाया बेन बर्नांके, डग्लस डायमंड आणि फिलिप डिब्विग यांनी १९८०च्या दशकाच्या सुरुवातीला घातला. वित्तीय बाजारांचे नियमन आणि आर्थिक संकटांना तोंड देण्यासाठी या तिन्ही अर्थशास्त्रज्ञांच्या विश्लेषणाला खूप व्यावहारिक महत्त्व आहे, असे 'रॉयल स्वीडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेस'ने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. स्टॉकहोम येथील 'रॉयल स्वीडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेस'च्या नोबेल समितीने सोमवारी अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्काराची घोषणा केली. बँक अवसायनात जाण्यापासून रोखणे का महत्त्वाचे आहे, हे या तिघांनी आपल्या संशोधनातून दाखवून दिले. सुमारे नऊ लाख अमेरिकी डॉलर आणि सन्मानचिन्ह असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. येत्या १० डिसेंबर रोजी नोबेल पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.

२००७-२००८च्या आर्थिक संकटानंतर अमेरिकी अर्थव्यवस्थेला पुनरुज्जीवित करून आर्थिक महामंदीतून बाहेर पडण्यासाठी फेडरल रिझर्व्हचे तत्कालीन अध्यक्ष बेन एस. बर्नांके यांच्यासह डग्लस डायमंड आणि फिलिप डिब्विग यांनी आपले संशोधन कौशल्य पणाला लावले, अशा शब्दांत नोबेल समितीने या संशोधकांचा गौरव केला आहे.

बँकिंग क्षेत्राची पडझड टाळणे कसे महत्त्वाचे आहे, हे या संशोधक त्रयीने आपल्या संशोधनातून दाखवून दिले. १९८०च्या प्रारंभी त्यांच्या संशोधनाद्वारे वित्तीय क्षेत्रातील व्यवहारांचे नियमन आणि आर्थिक संकटांचा सामना करण्यासंदर्भात पायाभूत काम झाले. आर्थिक संकटाच्या काळात बँकिंग क्षेत्र सुधारण्यासाठी या तिघांनी संशोधन केले आणि आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी चांगले पर्याय सुचवले होते, असेही नोबेल समितीने म्हटले आहे.



" अमेरिकेला २००७-२००८च्या आर्थिक मंदीतून बाहेर पडण्यासाठी फेडरल रिझर्व्हचे तत्कालीन अध्यक्ष बेन. एस. बर्नांके यांच्यासह डग्लस डब्ल्यू. डायमंड आणि फिलिप एच. डिब्विग यांनी आपले संशोधन कौशल्य पणाला लावले. - नोबेल समिती

### संशोधन काय?

बर्नांके हे सध्या वॉशिंग्टनमधील ब्रुकिंग्स संस्थेत कार्यरत आहेत. बर्नांके १९३०च्या आर्थिक महामंदीचा अभ्यास केला आहे. धास्तावलेले बँक ठेवीदार जेव्हा ठेवी काढून घेतात, तेव्हा बँकांना नेमक्या कोणत्या धोकादायक स्थितीला सामोरे जावे लागते, हे त्यांनी आपल्या संशोधनातून दाखवून दिले. शिकागो विद्यापीठातील डग्लस डायमंड आणि सेंट लुईस येथील वॉशिंग्टन विद्यापीठाच्या फिलिप डिब्विग यांनी ठेवींच्या सुरक्षेची हमी सरकारने घेतली, तर आर्थिक संकटाची वाढ कशी रोखता येते हे आपल्या संशोधनाद्वारे सिद्ध केले.

लोकसत्ता Tue, 11 October 2022
https://epaper.loksatta.com/c/70469148

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Miscellaneous*



पुढारी

पुढारी INFO

# तरुणाईचा ई-बुक्स वाचनाकडे कल

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात वावरणाऱ्या तरुणाईचा ई-बुक्सच्या वाचनाकडे कल आहे. संगणक, मोबाईल आणि लॅपटॉपच्या माध्यमातून तरुण-तरुणी विविध विषयांवरील ई-बुक्स वाचताना पाहायला मिळतील. त्यामुळे सध्याच्या घडीला छापील पुस्तकांसह ई-बुक्स प्रकाशित करण्याचेही प्रमाण वाढले आहे. म्हणूनच दिग्गज लेखकांसह नवोदितांच्या ई-बुक्सचाही वाचकवर्ग वाढत आहे. शनिवारी (दि.१५) माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा केला जात असून, यानिमित्ताने ई-बुक्सबद्दल घेतलेला हा आढावा.

### काय आहेत फायदे ?

- मोबाईलमध्ये एकाचवेळी आपण अनेक ई-बुक डाऊनलोड करून वाचू शकतो.
- विविध संकेतस्थळांसह मोबाईल ॲपवरून पीडीएफ स्वरूपातील ई-बुक डाऊनलोड करून वाचू शकतो.
- नामवंत लेखकांची छापील पुस्तके ई-बुक स्वरूपात असल्याने ती कधीही, कुठेही वाचता येते.

### ई-बुक म्हणजे काय ?

ई-बुक म्हणजे इलेक्ट्रॉनिक बुक...एखाद्या छापील पुस्तकाचे डिजिटल किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील रूपांतर. मोबाईल, संगणक आणि लॅपटॉप अशा विविध माध्यमांच्या इलेक्ट्रॉनिक स्क्रीनवर पुस्तक वाचण्यासाठी ई-बुक ही संकल्पना उद्यास आली आहे. छापील पुस्तकाची आवृत्ती जशीच्या तशी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध करून देण्याला ई-बुक असे म्हणतात. ज्याप्रकारे महत्त्वाची कागदपत्रे स्कॅन करून जतन केली जातात, त्याचप्रकारे छापील पुस्तक हे ई-बुकच्या स्वरूपात जतन केले जात आहे. केव्हाही, कुठेही हे ई-बुक सोशल मीडियाद्वारे वाचता येतात.

### असे असते स्वरूप

बहुतांश ई-बुक पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत. ती मोबाईल ॲप, संकेतस्थळावरून डाऊनलोड करून वाचता येतात. एकावेळी आपण अनेक लेखकांच्या पुस्तकांचे ई-बुक डाऊनलोड करून वाचू शकतो. अनेक ई-बुक्स मोफत किंवा कमी शुल्कात उपलब्ध आहेत. विविध मोबाईल ॲप, संकेतस्थळांवर ई-बुक वाचण्याचे किंवा खरेदी करण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. छापील पुस्तकांप्रमाणेच ई-बुकचे स्वरूप असते, पण ती छापील पुस्तकाची ई-आवृत्ती असते. मनोरंजन, साहित्य, कला, संस्कृती, क्रीडा, आरोग्य, मोटिव्हेशल अशा विविध विषयांवरील ई-बुकला प्रतिसाद आहेत.

### लेखकांसाठी नवा पर्याय

गेल्या काही वर्षांपासून आपल्या छापील पुस्तकांच्या ई-बुक आवृत्तीकडेही लेखकांचा कल वाढला आहे. दिग्गजांसह नवोदित लेखक ई-बुककडे वळले आहे. जगभरात राहणाऱ्या तरुण वाचकांना आपले पुस्तक उपलब्ध व्हावे, यासाठी छापील पुस्तकांसह ई-बुक आवृत्ती करण्यावरही भर दिला जात असून, प्रकाशन संस्थांकडूनही ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हल्ली पुस्तक प्रकाशन कार्यक्रमांमध्ये छापील पुस्तकांसह ई-बुक आवृत्तीही प्रकाशित केली जात आहे.

### तरुणांचा वाढतोय कल

व्यावसायिक, नोकरदार आणि महाविद्यालयीन तरुणाईला छापील पुस्तकांच्या वाचनासाठी हल्ली वेळ मिळत नाही, त्यामुळेच आता संणक, मोबाईल आणि लॅपटॉपवर ई-बुक डाऊनलोड करून ते कधीही, कुठेही वाचन करतात. त्यामुळे वाचनाशी तरुणाई नक्कीच जोडली गेलेली आहे. रोज किमान दोन ते तीन तास तरुण-तरुणी मिळालेल्या वेळेत ई-बुकचे वाचतात. खासकरून १८ ते ३५ वयोगटातील तरुणांचा ई-बुक वाचनाकडे कल आहे.

My Pune Edition
Oct 17, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2022*

## *Section: Miscellaneous*

लोकमत

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात वाचनसंस्कृती निश्चितच वाढलेली आहे; परंतु सामाजिक माध्यमातून मिळालेली माहिती ही पुरेशी नसून तिच्यात सत्यतादेखील कमी जाणवते. अशा प्रकारे वाचकवर्ग फक्त माहिती मिळावी ह्याच हेतूने वाचन करताना दिसतो म्हणजेच वाचकवर्गाचे 'सखोल वाचन' हे नक्कीच कमी झालेले दिसून येते.

# वाचन वरवरचे, तर जीवनही वरवरचेच

माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात अनेक प्रकारचे माहितीचे स्रोत, माध्यमे व साधने उपलब्ध असल्याने निश्चितच वाचनसंस्कृती वाढलेली दिसून येते. सर्व प्रकारची माहिती तितक्याच वेगाने वाचकांपर्यंत पोहोचविली जाते. विविध माध्यमांतून विशेषतः सोशल मीडियाद्वारे वाचकवर्ग मोठ्या प्रमाणात वाचन करताना दिसतो. मात्र त्यांच्या वाचनात आलेल्या मजकुराविषयी सत्यता पडताळनेही तेवढेच महत्त्वाचे वाटते. समाजात अनेक प्रकारच्या विकृती आहेत. त्या सोशल मीडियाचा आधार घेऊन समाजात तेढ निर्माण करणारी चुकीची माहिती पसरवितात; आणि बऱ्याच वेळेस अशा माध्यमातून केलेल्या वाचनात सत्यता कमी जाणवते, त्यामुळे वाचन मनापासून न करता फक्त वरवरचे केले जाते.

### ग्रंथालयांची बदलती भूमिका

बदलत्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात वाचकवर्गास वाचन साहित्य उपलब्ध व्हावे म्हणून ग्रंथालयांनी आपली भूमिकादेखील बदलली आहे. वाचकवर्गाची गरज लक्षात घेऊन महाविद्यालयीन ग्रंथालयांनी वाचकांसाठी ई-पुस्तके व ई-जर्नल्स उपलब्ध व्हावेत म्हणून डेटाबेस खरेदी केले आहेत. प्राध्यापक व विद्यार्थीवर्ग यांना ऑनलाइन पद्धतीने वाचनसाहित्य उपलब्ध व्हावे म्हणून वेब-पोर्टल तयार केले आहेत. वाचक वर्गाकरिता डिजिटल ग्रंथालयदेखील महाविद्यालयीन ग्रंथालयांनी उपलब्ध करून दिले आहेत, तिथे येऊन विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने वाचन व अभ्यास करू शकतात.



### वैयक्तिक अनुभव काय आहे?

१ महाविद्यालयीन जीवनात अवांतर वाचन करताना एखादी कादंबरी, चरित्रग्रंथ ग्रंथालयातून मिळावे म्हणून ग्रंथालयात नंबर लावावा लागायचा व त्याकरिता प्रतीक्षेत राहावे लागायचे. म्हणजेच तेवढ्या प्रमाणात अवांतर वाचनाच्या पुस्तकांची विद्यार्थ्यांकडून मागणी असायची.

२ हल्लीच्या काळात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून अवांतर वाचन फार कमी प्रमाणात केले जाते. विद्यार्थ्यांची नजर अवांतर वाचनाच्या पुस्तकांवर पडावी व ती घेऊन वाचावी या हेतूने आम्ही पुस्तके 'बुक डिस्प्ले'ला ठेवतो; परंतु खूप कमी विद्यार्थी त्यास प्रतिसाद देतात. याउलट क्रमिक पुस्तके 'बुक डिस्प्ले'ला न ठेवताही त्याची मागणी मोठ्या प्रमाणात असते.

### विद्यार्थ्यांचा ट्रेंड काय?

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची क्रमिक पुस्तकांना पसंती असते. प्रत्येक ठिकाणच्या वातावरणानुसार वाचकवर्ग आढळून येतो. जसे की संशोधन केंद्र म्हटले की संशोधक वर्ग हा वाचक वर्ग म्हणून दिसून येतो. शाळा, महाविद्यालय व विद्यापीठ म्हटले की निश्चितच वाचकवर्ग वेगळा दिसून येतो.

महाविद्यालयातील जास्तीतजास्त विद्यार्थ्यांचा ग्रंथालयात येण्याचा उद्देश म्हणजे अभ्यासक्रमानुसार पुस्तकांची मागणी केली जाते. त्यात प्राधान्याने क्रमिक पुस्तकांना पसंती, स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची पुस्तकांची मागणी व शिक्षकांनी दिलेला होमवर्क ग्रंथालयातील वाचन कक्षात पूर्ण करणे अशा प्रकारे दिसून येतो.

परीक्षा जवळ आली की ग्रंथालयात गर्दी वाढायला लागते, याचे कारण म्हणजे आजचा विद्यार्थी हा फक्त परीक्षेपुरताच वाचक बनलेला दिसून येतो. त्यामुळे वाचनदेखील परीक्षेपुरतेच मर्यादित झालेले दिसून येते.

आणखी एक बाब प्रखरतेने जाणवते ती म्हणजे ग्रंथालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी फार कमी विद्यार्थी वर्तमानपत्रे, कथा, कादंबऱ्या, चरित्र-आत्मचरित्र, ऐतिहासिक पुस्तके यांची मागणी करताना दिसतात.



### गरज काय?

ज्ञानप्राप्ती व बौद्धिक विकासासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी फक्त परीक्षार्थी न बनता, सर्व प्रकारचे सखोल वाचन करावे.

**ग्रंथ हे गुरु आहेत. पुस्तके वाचल्याने बुद्धीची मशागत होऊन ज्ञानात वाढ होते, व्यक्तिमत्त्व घडते, जीवन समृद्ध होते. शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी हा फक्त परीक्षांपुरता वाचक न बनता त्यांनी अवांतर वाचन करावे.**

अवांतर वाचन करताना कथा, कादंबऱ्या, चरित्र, आत्मचरित्र वाचल्यास महापुरुषांचे प्रेरणादायी विचार समजतात, त्यातून ऊर्जा व नवीन दिशा मिळते.

**अशी पुस्तके वाचल्यास त्यामधील भूमिका, साहित्यातील विचार, समाज कळणे, आपले आत्मभान जागृत होते आणि मानवाची वाटचाल विकासाच्या दिशेने होते.**



लेफ्टनंट डॉ. विठ्ठल नाईकवाडी
ग्रंथपाल आणि अभ्यासक

● संपादन : उद्धव धुमाळे ● मांडणी व सजावट : संदीप वाघमारे ● यशस्वी करिअरसाठीच्या आपल्या टिप्स आणि अनुभव पाठवा. : jmedit@gmail.com (9752417184)

Hello Pune
Page No. 7 Oct 20, 2022
Powered by: erelego.com

# *Condolence Message*

आपल्या महाविद्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी **सुभाष इनामदार, कनिष्ठ लिपिक** यांचे दि.२९.१०.२०२२ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. मॉडर्न महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.






# *Condolence Message*

आपल्या महाविद्यालयातील संगणक विभागामध्ये काम करीत असलेले टेक्निशियन **ऋषिकेश मांडके** वय ४५ यांचे दि . २९.१०.२०२२ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून श्रद्धांजली.





# *Upcoming Events*

## November 2022

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 *Pandit Nehru Jayanti*  | 15 *Birsa Munda Jayanti*  | 16 | 17 | 18 | 19 *Indira Gandhi Jayanti va Rashtriya Ekatmata Din*  |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 *Samvidhan Diwas*   |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*